Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ४ माहे सप्टेंबर सन १९१६ इ० [ अंक ३५


# हिंदुस्थान सरकार.

—:※:-:※:-:※:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे अंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

ज्या अर्जदारांना पूर्वीचे कर्जरोखे बदलून नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा आपला हक्क चालविण्याची इच्छा नसेल त्यांस तो हक्क चालू बाजार भावानें पोष्ट आफिस मार्फत इतरांस विकतां येतो.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.

मी ______________________ अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं __________ रुपये कर्ज मजपासून घ्यावें. ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये __________ / चेकनें रुपये __________ } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये __________ काढून घेण्याचा मी अधिकार देत आहे.

__________

(रोख रकम किती दिली, चेक किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून किती रकम दिली असल्यास ती ती त्या रकमा त्याकरिता रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. मजकूर अनवश्यक असेल खोडून टाकावा.)

एकूण रुपये........

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) __________ पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर __________ यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) __________ पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज __________ ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहों-तून एक पारिग्राफ भ[रावा] दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६–१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्ह[र्शन] लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा [३॥] अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधि[कार] देणारें वारंटही मला द्यावें.

नांव __________

पत्ता __________

तारीख __________

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख __________
( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर __________
( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालावया[चा] )

हेड आफिसचा छाप.

नो. नं. २४१

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## ोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या
ोसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील.
ं येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ाम्हण लोकांकरितां

—:*:०:*:०:*:—

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची ल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि ०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्टी रितां तयार करावयाची आहे. या पैकीं मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व ोचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे ृत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामि- र यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, गांव व वाशीम सब डिव्हिजन मधील कानीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफी- कडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर ा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्या- रतां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण र झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें ार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू तांना लष्करी खात्यांत नोकरी केली ल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत ते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत ा असेल तो काळ वयाच्या मुदतींतून ा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ , छाती ३१ इंच ( आवस्तृत ) आणि इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ णि २६ या दरम्यान असावें व त्यास गतेही शारीरिक व्यंग नसावें व तो क्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं भत्ता दक्षिणेंत १ ५ रु ८ आ. आहे. जे शिपायास एकंदर वेतन १६ रु. आ. मिळते या शिवाय दर वर्षी ड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून ाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. तीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ ठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सर- वर बन्नु येथें आहे.

ो नं २४२

---

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुप- याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नो. नं १ } Lyon Scott एजंट

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट- लीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हे औषध घेतल्यानें मागचा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार (बडतोत्र) दूर होतात किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं काहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. कि ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नें. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे- खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे मुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा- जोड, गुलाबाचीफुले, बिल्वदळी टीका, मुद्रा अश्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकरणीं, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शेंमर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर व्हाईट निघण्याची भीति बाळगण्या- चें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन साची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबा- बदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.
नो नं. २७२

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबुस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

---

## चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रका- रचीं मुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५ शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी, गिरगांव मुंबई.

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १४३ आणि १४७ तो. खालिस कस्तुरी रु २९ तो. शुद्ध शिलाजीत ४९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

## नोटीस

चिरंजीव बाळकृष्ण भवानी सोनार रा० आकोला शहर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुं माझा मुलगा असून बेइमान लोकांच्या नादी लागून नुकसान इच्छितोस. व तूं मागें ता. १७-१२-१९१४ सन इ. रोजीं बेमान लोकांच्या सांगण्यावरून नोटिस खोटी दिली. व ता. २९ माहे ७ सन १९१० इ० सालीं तुझे मतानें विठोबास नोटिस दिली. त्या नोटिशींत ता. १७ माहे १२।१८९१ इ० सालीं विठोबानीं व पंचानीं आपसांत वाटणीं करून दिली. त्यानंतर विठोबाची व माझी आज तारखे पावेतों कोणतेही प्रकारचा आप- सांत देवघेव व शेती संबंधीं समजूत होऊन प्रॉमेसरी नोट लिहून देण्यास व कोणते ही प्रकारचा लेख करून घेण्यास व देण्यास मी तुला व वडील मुलगा सखाराम यांस सांगितले नाहीं. व उभयताचे मुखत्यारपत्र रद्द केल्यानंतर ही मागील सालचे मला बुडविण्याकरितां बना- वटी प्रॉमेसरी नोटा लिहून देता येतात व तूं बनावटी प्रॉमेसरी नोट तीन हजार रुपयांची विठोबास लिहून दिली. ती मजला कबूल नाहीं, त्या बोजा तुझे शिरावर राहील. ता. २०-८-१९१६ इसवी

सही भवानी लक्ष्मण सोनार दस्तुर खुद

नो.नं. ३२६

वाचा आणि मित्र मंडळीला दाखवा.

## सुबोधमाला.

सद्य:स्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

आपलेपणाची खरी ओळख पटविणाऱ्या बोधपर गोष्टी, नामांकित लेखकांचे विचारपरिप्लुत निबंध, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी, अकलेचे हिशोब व कूटप्रश्न वगैरेंनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥≈

**मालेच्या वर्गणीदारांस बक्षिस.**

वार्षिक परिक्षेंत पास होणाऱ्या कोणत्या ही इयत्तेंतील विद्यार्थी वर्गणीदारांस दरसाल बक्षिस रुपये १००

अकलेचे हिशोब किंवा कूटप्रश्न सोडविणाऱ्या वर्गणीदारास दरमहा बक्षिस रुपया १

या संबंधाची तपशीलवार माहिती माहे मे १९१६ च्या अंकांत पहा. श्री एल. आर. बाक्रेकर हे आकोल्याचे एजंट आहेत.

गांवोगांवीं एजंट पाहिजेत—कमीशन भरपूर देऊं.

के. बी. देशमुख
संपादक—सुबोधमाला
उमरावती.

नो० नं० ३१८

---

## पाहिजे.

खामगांव (वऱ्हाड) येथील म्युनिसिपल मुलांचे मराठी शाळे करितां तीन वर्षांचा ट्रेनिंगचा कोर्स पुरा केलेला हेड मास्तर पाहिजे. पगार दरमहा रुपये ३५ इंग्रजीचें ज्ञान व शिक्षणाचा अनुभव याचा ही विचार केला जाईल. अर्जदारांनीं आपले अर्ज वरिष्ट अधिकाऱ्यांचे मार्फत दाखल्यासह तारीख १५ सप्टेंबर १९१६ पर्यंत पाठवून द्यावेत.

N. Y. Tipnis.
ता. २९-८-१९१६ प्रेसिडेंट
स्कूल बोर्ड खामगांव
(वऱ्हाड)

नो० नं० ३१९

---

### नोटीस

सुपडी मर्द रघु बगाडे माळी राहणार हिवर ता. खामगांव

इजला:—

खालीं सही करणार राहणार अत्रंज ता. खामगांव यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी लग्नाची बायको आहेस. २-३ वर्षे झालीं तूं आपले भावाचे घरीं मुलगा आजारी होता म्हणून त्यास घेऊन गेली होतीस. तो मुलगा ही मरण पावला आहे, तेव्हांपासून परत घरीं आली नाहीं. २-३ वेळां मी घेण्याकरितां आलो तरी आली नाहींस. तरी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत तूं माझे घरी येऊन राहावें. याप्रमाणें न केल्यास तुजला ताब्यांत घेण्याकरितां कोर्ट मार्फत दावा केला जाईल कळावें. ता. २६-८-१९१६ द. त्रिंबक बळवंत पी. रा. आकोला.

सही
रघु वा॥ शिवरामजी नि॥ खुद आंगठा

नो० नं० ३२०

---

### नोटीशीचें उत्तर

आपरु मर्द मल्हारी राउत रा. मंगरूळ पोष्ट शेलगांव ता. चिखली

ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीचें उत्तर देण्यांत येते कीं, तूं मजला वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटिस नंबर २६० ची दिली. ती मला ता. २३-८-१९१६ रोजीं मिळाली. तूं नोटीशींत मजकुर जो लिहीला तो सर्व खोटा आहे. कारण तुझे माझेशीं गंधर्व लागून सुमारें वीस वर्षे झालीं असून आज पावेतों तूं माझे घरीं नांदली. आतां सरासरी सात आठ महिन्या पूर्वी आपले बापाचे घरीं गेली. तुजला तुझे बापानें आपले घरीं नेले. दरम्यान तुजला नेण्याकरितां मी पाठविले असतां तूं आली नाहीं. मी तुजला वागविण्यास तयार आहे. तुझे मनांतून माझ्याशीं संसार करण्याचा नसल्यास तुझे अंगवर असलेले दागिने सोन्याचे नथ १ बाळ्याजोड १ व पुतळ्या ३ एकंदर वजन तोळे ३ चांदीचे हास तोळे २० गोफ तोळे २० कोरवाल्या जोड १ तोळे ३२ कडे व पाटल्या तोळे ३२ गुंडवाळ्याचा जोड १ वजन तोळे ७० याप्रमाणें दागिने शिवाय तुझे गंधर्वास लागलेला खर्च सरासरी रुपये २५० असें मजला देऊन माझी पावती घ्यावी. म्हणजे तुजला माझी मोकळीक होईल, तो पावेतो माझी मोकळीक नाहीं. कळावें. ता. २६ माहे आगष्ट सन १९१६ इसवी

सही
मल्हारी वा सखाराम राउत निशाणी आंगठा

नो० नं०३२१

---

### नोटीस

रा. रा. हरी वा नारायण डाहाके कुणबी रा. मौजे टाकरखेडा ता. मलकापूर जि. बुल्ठाणा पोष्ट मोताळाबाजार

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नारायणदास यानें माझे घरांतून पेटीतून सोन्याचा गोफ वजन तोळे १६ सोळा चार मासयाचा जडाइ रुपये पंन्नास देऊन सोनारा पासून तयार करून घेतलेला, अनमासे दोन महिने झाले, मजला न कळत नेला, त्याचा तपास मी करीत असतां मजला अशी बातमी लागली कीं, तो तुह्मी घेतला आहे. तर तो माझी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत मजला देऊन माझे सहीची पावती घ्यावी. याप्रमाणें न कराल तर मी तुमचेवर गोफ चोरीची फौजदारींत फिर्याद करीन. व शिवाय गोफाची किंमत एकंदर रुपये ४९१ चारशे एक्याण्णऊ ची दिवाणींत फिर्याद करून खर्च नोटीशीसमेत जो होईल त्याचा हुकूमनामा मिळवीन. ही नोटिस दिली सही. मुक्काम आकोला ता. ३१-८-१९१६

सही
कन्हयालाल गुलाबचंद दस्तुर खुद

नो० नं० ३२२

---

### नोटीस

रा. रा. व्यंकटराव जानराव पाटील रजपुत राहणार मौजे टाकरखेडा ता. मलकापूर पोष्ट मोतळा बाजार

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा मुलगा नारायणदास यानें रा. रा. ननाशिवसिंग राहणार मौजे टाकरखेडा यास त्याजपासून कर्जाचा एक पैसा न घेतां हजार रुपयाचा पुर्जा लिहून दिला, या खोट्या पुर्ज्याची हकीकत मी तुझे बापास सांगितो अशी तुह्मी माझे मुलास धास्ती घालून त्याजपासून एकोण चाळीस रुपये लुचपत घेतली आहे. तर तुह्मी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत एकोणचाळीस रुपये आणून देऊन माझी पावती घ्यावी. याप्रमाणें तुह्मी केलें नाहींतर आह्मी तुमचेवर विश्वासघाताची फौजदारींत फिर्याद करूं, आणि दिवाणी कोर्टांतून नोटिशीचे खर्चासुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां हुकूमनामा मिळवून रकम वसूल करूं, ही नोटिस दिली सही मुक्काम आकोला तारीख ३१-८-१९१६

सही
कन्हयालाल गुलाबचंद दस्तुर खुद

नो० नं० ३२३

---

### नोटीस

चिरंजीव राजश्री नारायणदास कन्हयालाल महेश्वरी मारवाडी राहणार टाकरखेड ता. मलकापूर

यांस:—

तुह्मी माझ्या हुकुमा बाहेर वागतां आणि तुमची बुद्धि ठिकाणावर नसल्याकारणानें तुह्मी वाटेल त्याप्रकारें स्वतांस फसवीत आहां. दुनियेदारीच्या सावकारीपणाला तुह्मी अपात्र आहा, ही गोष्ट जेव्हां तुह्माला १००० एक हजार रुपये देऊन निराळा व्यापार करण्यास सांगितले, व तुह्मी रुपये गमावून टाकले तेव्हांच कळून चुकली. पितृधर्माप्रमाणें मी तुह्माला अन्नवस्त्र पुरवित आहे. परंतु तुह्मी फंदी लोकांच्या नादानें वाटेल तेव्हां वाटेल तितकी कर्जे काढतां असें ऐकतों. इतकेंच नाहींतर माझ्या आजारीपणांत पेटींतली १६ तोळ्याची कंठी व ८। तोळ्याची साखळी, असे दोन सोन्याचे दागिने तुह्मी मला न विचारतां नेले. व ते हरी वा नारायण डाहाके कुणबी आणि कृपाराम राऊतमल महेश्वरी मारवाडी राहणार टाकरखेडे ता. मल्कापूर पोष्ट मोतळा बाजार यांस अनुक्रमें दिले आहेत असें कळलें. सर्व मिळगी माझी स्वकष्टार्जित आहे. तुमचा मिळगीवर कांहींच हक्क संबंध नाहीं. तुह्मी असेंच वागाल व शुद्धीवर न याल तर मला तुह्माला स्थावर जंगम मिळगीपैकीं सुतळीचा तोडा मिळूं नये अशी मृत्यूपत्रानें व्यवस्था करावी लागेल. तुमच्या देवघेवीचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. व माझ्या स्थावर जंगम मिळगीवर त्याचा कांहीं बोजा बसणार नाहीं. हें मी निराळी जाहीर खबर देऊन प्रसिद्ध करीत आहे. कळावें. ता. ३१-८-१९१६

सही मारवाडींत
कन्हयालाल गुलाबचंद दस्तुर खुद

नो० नं०३२४

---

### नोटीस

रा. रा. कृपाराम राउतमल केसरी मारवाडी रा. टाकरखेडा ता. मल्कापूर जि. बुलडाणा पो. मोताळा बाजार.

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नारायणदास यानें मजला नकळत अजमास तीन वर्षे झालीं सोन्याची साखळी अजमास तोळे ८। ची पेटीतून काढून नेली तीचा तपास मी आजपावेतों करीत आहे. आतां मजला असें समजलें कीं तो वरील नग तुमचे पाशी आहे. तर तो ही नोटिस पावतांच आठ दिवसाचे आंत मजला आणून देउन माझे सहीची पावती घ्यावी या प्रमाणें तुह्मी न केल्यास मी तुमचेवर कंठीची चोरीची फिर्याद फौजदारीत करीन आणि शिवाय २७ सतावीस रुपये तोळ्याप्रमाणें एकंदर २२२॥१२ दोनशे बाविस बारा आणे घडाई सुद्धां होतात. त्याची दिवाणींत फीर्याद करुन कोर्टखर्चा सुद्धां व या नोटिशीचे खर्चासुद्धां हुकूमनामा मिळविन ही नोटीस दिली सही मुक्काम आकोला तारीख ३१-८-१६

सही.
कन्हयालाल गुलाबचंद दस्तुर खुद

नो. न. ३२५

---

**वऱ्हाडसमाचार**

मित्ति भाद्रपद शुद्ध ७ शके १८३८

## इंग्लंडांतले शिक्षणविषयक प्रश्न.

कोणतीही सुधारणा इंग्लंडांत सुरू झाल्यानंतर अर्धपाव शतकानें ती हिंदुस्थानांत सुरू व्हावयाची असा बहुधा नेम आहे. तेव्हां प्रस्तुतचें युद्ध संपल्यांनतर जे सुधारणेचें नवयुग सुरू होणार आहे त्यांत कोणकोणत्या शिक्षणविषयक सुधारणा करण्याचा इंग्लंडचा विचार आहे वें त्या संबंधानें प्रमुख मुत्सद्दी व अध्यापक यांचे अभिप्राय कशा प्रकारचे आहेत हें आपणांस कळणें अवश्य आहे असें पुष्कळांस वाटेल यांत शंका नाहीं. शिक्षणविषयावर इंग्लंडांत सध्या लॉर्ड हार्डेन यांच्या इतका

अधिकार युक्त वाणीनें बोलणारा कोणी मुत्सद्दी नाहीं. त्यांनीं इंग्लंडांतल्या शिक्षण पद्धतींतले जे कित्येक ठळक दोष दाखविले त्यापासून हिंदुस्थानांतल्या शिक्षणाधिकाऱ्यांना पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. इंग्लंडांत एकंदर मुलांच्यां संख्येच्या दशांश संख्ये इतकीं मुलें चौदा वर्षांच्या वया नंतर शाळेंत जाणारीं आहेत ही गोष्ट ऐकून आपल्या लोकांना आश्चर्य वाटेल. इंग्लंडांत दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या शाळांची स्थिति जर्मनींतल्या सारखी इंग्लंडांत चांगली नाहीं. इंग्लंडांतल्या शाळांतून मुत्सद्दी तयार होऊं शकतात पण शास्त्रज्ञ तयार होत नाहींत, याबद्दल जर्मन लोक इंग्लंडला हंसत आहेत. साऱ्या इंग्लंडांत दीड हजारावर रसायनशास्त्रज्ञ नाहींत. इंग्लंडच्या कारखान्यांना शास्त्रज्ञांचें साह्य नसल्यामुळें कारखान्यांत खर्च होणारा अर्धा कोळसा निष्कारण फुकट जातो. शास्त्रज्ञांच्या अभावामुळेंच रंगांचा उद्योग इंग्लंडच्या हातांतून गेला. तेव्हां एकंदरींत शास्त्रीय विषयाचें शिक्षण नसल्यामुळें इंग्लंडची मोठी हानि होत आहे व ती भरून काढण्यास हल्लींची शिक्षणपद्धति असमर्थ आहे हें सिद्ध झालें. आतां विशिष्ट शिक्षणाची काय स्थिति आहे पहा. कैंब्रिजयुनिव्हर्सिटींतील लष्करी शिक्षणखात्याचे डायरेक्टर ले. क. शर्टले ह्मणतात कीं गेल्या चौदा वर्षांत लष्करी शाळेंतून जेवढे विद्यार्थी गेले त्यांतल्या बहुतेकांचें इतिहास, भूगोल, अर्वाचीन भाषा, इ. विषयांचें फार काय पण स्वतःच्या मातृभाषेचें सुद्धां अज्ञान अत्यंत विस्मयजनक होतें. विषयांचें ही ज्ञान नाहीं आणि जें आहे तें स्वतःच्या भाषेंत ही व्यक्त करतां येत नाहीं, मग या विद्यार्थ्यांनीं शाळेंत जाऊन केलें काय? आपल्या आयुष्याचीं इतकीं वर्षें फुकट दवडलीं असाच त्याचा अर्थ होत नाहीं काय? असें विचारणारे आईबाप व पालक इंग्लंडांत निघाले व अशी शिक्षणपद्धति असल्यावर युद्धसमाप्तीनंतर जर्मनीशीं व्यापारवृद्धीशीं स्पर्धा कोणत्या उमेदीवर लावतां येईल अशी पृच्छा करणारे उभे राहिले, तेव्हां इंग्लंडांतल्या युनिव्हर्सिट्यांचे चालक व पाब्लिक स्कूलचे हेड मास्तर यांचें एक कान्फरन्स शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठीं भरलें होतें. या कान्फरन्सपुढें एकेका विषयावर एकेका विद्वानाचें भाषण होऊन त्या विषयांत इंग्लंडांतल्या विद्यार्थ्यांचें अज्ञान किती गाढ असतें व तें सुधारण्यास काय केलें पाहिजे याचें विवेचन करण्यांत आलें. हिंदुस्थानच्या लोकांना इंग्रजी बोलतां किंवा लिहीतां येत नाहीं, ह्मणून त्यांच्या कॉलेजांतल्या शिक्षणक्रमाचें एक वर्ष हायस्कूल मध्येंच ढकलणाऱ्या किंवा देशी पदवीधरांच्या मोडक्या तोडक्या इंग्रजीचा उपहास करणाऱ्या प्रोफेसरांना खुद्द इंग्रज विद्यार्थ्यांना स्वतःच्या भाषेंत धड लिहितां येत नाहीं अशी या कान्फरन्सपुढें तक्रार मांडण्यांत आल्याचें ऐकून काय वाटेल? प्रो. सेवर्ड (कैंब्रिज येथील डाउनिंग कॉलेजचे अध्यापक) हे ह्मणाले कीं अंडरग्राज्येटांपैकीं फारच थोड्यांना लहानसें सुद्धां पत्र नीट नेटक्या इंग्रजी भाषेंत लिहितां येतें असें मला आढळून आलें आहे. पण जे इंग्रज प्रोफेसर खुद्द विलायतेंतल्या इंग्रज पदवीधरांची ही स्थिति अनुभवून इकडे प्रोफेसर होऊन आलेले असतात तेच हिंदी पदवीधराकडून इंग्रजी सारखी परकी भाषा अतिशय शुद्ध व अस्खलित रीतीनें लिहिली जावी अशी अपेक्षा करतात; इतकेंच नाहींतर इंग्रजींत चांगलें बोलतां व लिहितां आल्या शिवाय विद्यार्थ्यांना इंजिनियरिंग, शेतकी, किंवा वैद्यक यांसारख्या शाखांत सुद्धां विद्यार्थ्यांचा प्रवेश होऊं देऊं नये असा हट्ट धरतात, तेव्हां या लोकांचें ह्मणणें किती गैरवाजवी आहे याची खरी कल्पना करतां येते. आणि या हट्टाच्या मुळाशीं कांहीं स्वार्थमूलक हेतू आहे कीं काय अशी शंका घेण्यास जागा होते. सारांश, इंग्लंड शिक्षणाचे संबंधांत हिंदुस्थानाचे पुढें असतां, तेथें उत्तमोत्तम शिक्षक उपलब्ध असतां व द्रव्याची अनुकूलता असतां ही तेथें जर दुय्यम प्रतीचें शिक्षण इतक्या भिकार स्थितींत आहे कीं तेथील विद्यार्थी व्यवहाराला बहुतेक नालायक ठरतात असें खुद्द तिकडील शिक्षकांचेंच सार्टीफिकेट आहे, तर हिंदुस्थानांत जेथें परक्या भाषेच्या द्वारें सगळें शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावें लागतें, जेथें विलायतेंहून उत्तम प्रतीचे शिक्षक ही येत नाहींत, व जेथें द्रव्याची अनुकूलता बेताबाताचीच, त्या हिंदुस्थानांत दुय्यम शिक्षणाची शोचनीय दुर्दशा असल्याचें नवल काय?

---

## धर्मदायाचा दुरुपयोग.

धार्मिक प्रवृत्तीचे आणि भोळ्या लोकांनीं एखाद्या भूतदयेच्या किंवा धर्मपर कार्यासाठीं देणग्या द्याव्या आणि लुच्चे किंवा फसवेगिरींत अट्टल असलेल्या लोकांनीं त्या पैशाचा अपहार किंवा अपव्यय करावा असा प्रकार हिंदुस्थानांतच आहे असें नाहीं हिंदुस्थानचे लोक अशिक्षित असल्यामुळें त्यांच्यांत भोळेपणा ज्यास्त आहे ह्मणून ते अधिक फसत असतील इतकेंच, बाकी अशा फसवेगिऱ्या पाश्चात्य देशांतून आणि त्या ही मोठ्या प्रमाणावर चालत आलेल्या पाहिल्या ह्मणजे मनुष्यस्वभावाच्या वैचित्र्याचें मोठें कौतुक वाटतें. अलीकडे युद्ध सुरू झाल्यापासून लुच्चे लोकांना युद्धाचे नांवावर निरनिराळे फंड काढून लोकांकडून पैसे उकळण्याला आयतीच संधी मिळत असते. कोणी जखमी झालेल्या सर्वियन शिपायांच्या मदतीसाठीं फंड उभारतो, आणि मदतीसाठीं अत्यंत करुणरसोत्पादक विनंतिपत्र काढून द्रव्याची याचना करतो. सर्वियाविषयीं मित्र राष्ट्रांतल्या लोकांत जो आदर आहे त्यामुळें या फंडाच्या मुळाशीं काय आहे याचा शोध न करतां लोक भराभर वर्गण्या देतात. इंग्लंडांत असाच एक फंड निघाला होता. या फंडाच्या प्रामाणिकतेविषयीं इसका बोभाट झाला कीं शेवटीं याची चौकशी करण्यासाठीं सरकाराला कमिटी नेमावी लागली. या कमिटीनें बारकाईनें तपास केला तेव्हां सगळें कारस्थान बाहेर आलें. फंडाचे सेक्रेटरी व खजीनदार यांनीं आलेल्या वर्गण्या फंडाचे नांवावर जमा न करतां स्वतःच्याच नांवानें ब्यांकेंत ठेविल्या. कित्येक फंडाच्या हिशोबांचा पत्ताच लागेना. आपल्या इकडे दोन वर्षांपूर्वीं ब्यांकेच्या डायरेक्टरांत आपलें नांव घालून ब्यांकेची व्यवस्था मात्र न पाहणारे वजनदार गृहस्थ निघाले तसेच फंड काढणारे, सेक्रेटरी खजिनदार वगैरे लोक कितपत प्रामाणिक आहे याची चौकशी न करतां त्या फंडाच्या विनंतिपत्रावर सह्या करणारे भोळेसांब, किंवा आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव नसलेले बडे लोक तिकडे ही आढळून आले. असे प्रकार बंद व्हावे ह्मणून युद्धासंबंधाचे सगळे फंड राजिस्टर केले जावे, व जे राजिस्टर केले जाणार नाहींत ते बेकायदेशीर समजावे अशा अर्थाचे एक बिल लवकरच पार्लमेंट पुढें येणार आहे. इंग्लंडपेक्षां इकडे अज्ञान व अर्थात भोळेपणा ज्यास्त असल्यामुळें अशा लुच्चेगिऱ्यांचें प्रमाण ज्यास्त असलें तर आश्चर्य नाहीं. पण इंग्लंड सारखी एखादी कमिटी नेमून तिच्याकडून रिपोर्ट मागविण्याची व त्या रिपोर्टाच्या आधारावर वरच्यासारखें एखादें बिल कौन्सिलपुढें आणण्याची तजवीज कोणी कां करूं नये तें कळत नाहीं.

---

## मध्यप्रांताचें कायदे कौन्सिल.

या संस्थेच्या नुकत्या झालेल्या बैठकींत एकंदर ६२ प्रश्न विचारले गेले व त्यांतले सुमारें एक तृतीयांश शिक्षणाविषयक होते. या एका गोष्टीवरून शिक्षणाची तृष्णा लोकांना किती लागली आहे याचें अनुमान करतां येतें. पण दुःखाची गोष्ट ही वाटते कीं ही तृष्णा भागविण्याचे उपाय लवकरच करण्यांत येतील अशा प्रकारचें कांहीं आश्वासन सरकारला या वेळीं देतां आलें नाहीं. जागा नाहीं या सबबीवर शेकडों तरुणांना दुय्यम शिक्षणाच्या शाळांच्या उंबऱ्या बाहेर ठेवण्यांत येतें हें पाहून जसा त्या मुलांच्या आईबापांच्या मनाला पीळ पडत असेल तसा इतक्या जणांची निराशा करतांना अधिकाऱ्यांच्या ही मनाला पडत असला पाहिजे. पण विशिष्ट परिस्थितीच्या अडचणींमुळें उपाय सुचत नाहीं ही स्थिति खेदजनक आहे. खर्च न वाढवितां सध्याच्याच सांपत्तिक स्थितींत सगळ्या खात्यांच्या खर्चाची त्यांच्या उपयुक्ततेच्या व अवश्यकतेच्या मानानें योग्य वाटणी केली, व शिक्षणखात्यांत ही मोठ्या पगाराचे युरोपियन हेड मास्तराच्या किंवा इन्स्पेक्टराच्या जागेवर ठेवण्याचा नाद सोडून कमी पगाराचे पण खरोखरी लायक असे देशी गृहस्थ नेमण्याची सुधारणा अंमलांत आणिली तर ही अडचण दूर होण्यासारखी आहे. बडोद्यासारख्या शिक्षणाचे प्रगतींत ब्रिटिश सरकारच्या ही पुढें दोन पावलें टाकलेल्या रियासतींत जर शिक्षणखात्याचीं सूत्रें उत्तम रीतीनें चालविणारे देशी गृहस्थ मिळतात, तर आमच्या प्रांताला तसे मिळणार नाहींत अशी शंका घेणें व्यर्थ आहे. यवतमाळ जिल्ह्यांतल्या इजाऱ्याच्या प्रश्नाचा निकाल लावण्या करितां सरकारानें कमिटी नेमावी ही ना. मि. दामले यांची सूचना वाजवी होती. पण तिला ही वाटाण्याच्या अक्षता मिळालेल्या पाहून पुष्कळांची निराशा झाली. मध्यप्रांताला वऱ्हाड प्रांत जोडल्यानें वऱ्हाड प्रांताचें अनेक प्रकारें नुकसान होत आहे, तेव्हां त्याची व्यवस्था स्वतंत्र ठेवावी ही ना. रा. ब. मुधोळकर यांची सूचना मध्यप्रांतांतल्या नामदार सभासदांना नापसंत वाटावी यांत आश्चर्य नाहीं. पण दुसऱ्याच्या नापसंतीमुळें वऱ्हाडच्या लोकांचें नुकसान होऊं देणें न्यायाचें होईल कीं काय याचा विचार सरकारानें अवश्य करावयास पाहिजे होता. बिगारीच्या प्रश्नासंबंधानें ना. मि. केळकर यांनीं आणिलेल्या ठरावांतल्या सूचनांपैकीं कित्येक लवकरच अंमलांत येतील असें सरकारी अधिकाऱ्यांच्या भाषणांवरून दिसतें. याच प्रमाणें जिल्हा दरबार भरविण्याबद्दलच्या ना. मि. केळकर यांच्या ठरावाचा ही कांहीं उपयोग होईल अशी आशा करण्यास जागा झाली आहे. हे दरबार हळूहळूं परिणत होऊन पुढें मागें डिस्ट्रिक्ट कौन्सिलें होतील असें आशावाद्यांना वाटत आहे. ती त्यांची इच्छा कालांतरानें कां होईना पण सफळ होवो असें आह्मी इच्छितों.

---

## सोनारांनीं कान टोंचले!

आज कित्येक वर्षें पर्यंत लोक पक्षांतील पुढारी आमचे शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें पाहिजे अशा संबंधाची चळवळ करीत आले आहेत, परंतु ती गोष्ट अजून ही सरकारास कांहीं तंतोतंत पटली नाहीं. सरकारचेंच मत थोडेंसें प्रतिकूळ आहे इतकेंच नव्हे तर आमच्यांतील कांहीं दुखखुळ्या लोकांना शिक्षण हें इंग्रजींतून दिल्या वांचून राष्ट्राचा तरणोपाय नाहीं असें अजून ही वाटत आहे! या लोकांस परवा मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर डॉ. मॅकिकन यांनीं पदवीदान समारंभाचे वेळीं ता. १९ आगष्ट रोजीं केलेलें भाषण वाचण्याची आह्मी शिफारस करतों.

मुंबई युनिव्हर्सिटी ही ज्या कांहीं अल्पशा प्रमाणावर लोकमताचा दाब असलेल्या थोड्याशा युनिव्हर्सिट्या हिंदुस्थानांत आहेत त्यापैकीं एक आहे. तिची अलाहाबाद किंवा मद्रास युनिव्हर्सिटी याच्याशीं तुलना होणें शक्यच नाहीं. दादाभाई नौरोजी, मेथा, गोखले यांच्या सारखीं कर्तीं माणसें शिक्षणास वळण देणारीं असतांना सुद्धां चाळीस वर्षांत या विश्वविद्यालयानें किती पाऊल पुढें टाकलें आहे व जगाच्या ज्ञानांत किती भर टाकली आहे असा जेव्हां चाळीस वर्षांचा अहवाल चाळून डॉ. मॅकिकन पाहूं लागले तेव्हां त्यांस काय आढळून आलें? साठ वर्षें पर्यंत ज्या विश्वविद्यालयावर परिश्रम केले गेले आहेत त्यानें परिश्रमांचे काय चीज केलें आहे? डॉ मॅकिकन ह्मणतात— आपण आपल्याशींच हा प्रश्न केल्यास आपल्यास निराशेनें हेच उद्गार काढावे लागतात कीं आमच्या आकांक्षा, आमच्या इच्छा निष्फळ झाल्या! आमच्या भ्रमाचा भोपळा आतां फुटला आहे! नवीन नवीन शोध लावणारीं कल्पक बुद्धीचीं विद्वान माणसें तर बाजूलाच राहू द्या परंतु रानडे, मेथा, तेलंग यांच्या सारखीं विद्वद्रत्नें तरी हल्लींच्या पदवीधरामध्यें कितीशीं दाखवितां येतील! आणि असें

कां? डा. मॅकिकन या प्रश्नाचें उत्तर देतात कीं याचें कारण **आमच्या शाळामध्यें कोमल बुद्धीच्या बाल विद्यार्थ्यांना वाजवीपेक्षां फाजील विषय इंग्रजींतून शिकविण्याची फाजील घाई करतात हेंच होय!**

इतिहास, भूगोल, गणित, शास्त्रीय विषय संस्कृत या सारखे मातृभाषेमध्यें थोडक्या वेळांत व थोड्या परिश्रमानें समजले जाणारे व ध्यानांत धरण्यास सोपे जाणारे विषय इंग्रजीमधून घोकण्यामध्यें ज्या विद्यार्थ्यांस हाडांचीं काडें करावीं लागतात त्यास स्वतंत्र विचार करण्याची व जगाचे ज्ञानांत भर घालण्याची शक्ति तरी कशी रहावी! हल्लींच्या शिक्षण पद्धतीमुळें मातृभाषेमधून शिक्षण न मिळाल्यामुळेंच विषय अर्धवट समजलेले, निःसत्व, निरुपयोगी व कर्तव्यशून्य पदवीधर बाहेर पडले तर दोष कोणाचा ? इंग्रजींतून भूगोल घोकून घेतला, इंग्रजींतूनच इतिहास पाठ करायला लावला, संस्कृतचा अर्थ इंग्रजींतूनच केला तर विद्यार्थी त्या त्या विषयांत ज्यास्त तरबेज होतात कीं काय?

मुंबईकडे हे विषय मातृभाषेंतून शिकविण्याचे प्रयत्न चालू आहेत व सरकारची हे विषय मातृभाषेतून शिकवावे अशी इच्छा आहे, परंतु आमचे इकडे वऱ्हाड नागपूर प्रांतात पहावे तर सर्वच कांहीं अजब! जो भूगोल विषय कमी महत्त्वाचा ह्मणून मुंबई युनिव्हर्सिटीनें त्याची परिक्षा घेण्याचे सुद्धां शाळांकडे सोपविलें आहे तो विषय हा आमच्या अलाहाबाद युनिव्हर्सिटी मध्यें अतीशय महत्वाचा आहे ! व तो इतका महत्त्वाचा समजला जातो कीं आमच्या इकडील सर्व इंग्रजी शाळा विद्यार्थ्यांना भूगोलांत तरबेज करण्यांत गुंग झाल्या आहेत ! व इंग्रजी ३ तिसऱ्या इयत्तेपासून निरनिराळ्या देशच्या शहरांच्या व नद्यांच्या नांवाचे इंग्रजी स्पेलिंग घोकून घेऊन कोवळ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा ऱ्हास करीत आहेत!

डॉ. मकिकन यानीं वर लिहिलेले स्पष्ट विचार प्रगट केले ह्मणून आह्मी त्यांचें अभिनंदन करतों. परंतु लगेच आह्मी त्यांस असें विचारतों कीं कॉलेजातील शिक्षण मात्र इंग्रजीतूनच दिलें पाहिजे असा जो त्यांचा अट्टाहास आहे तो कां? ज्या जर्मनीच्या शास्त्रीय शोधाकडे पाहून तो आपला शत्रु आहे तरी इंग्रज लोक आश्चर्यानें तोंडांत बोट घालतात त्या जर्मनीमध्यें कॉलेजांतील शिक्षण इंग्रजी मधूनच दिलें जातें काय? ज्या जपाननें थोडक्या मुदतींत आपली कर्तबगारी जगास दाखविली त्या जपान मध्यें कॉलेजांतील शिक्षण इंग्रजींतूनच दिलें जातें काय ?

शाळामध्यें मातृभाषेंतून शिक्षण दिल्याशिवाय आपले कोणत्याही दिशेनें पाऊल पुढें पडणार नाहीं. हें समजण्यास डॉ. मॅकिकन यांस चाळीस वर्षें लागलीं ! तितकींच वर्षे जर आणखी डॉ. मॅकिकन जगले तर खात्रीनें तेही असे ह्मणतील कीं कॉलेजांतील शिक्षण सुद्धां मातृभाषेंतूनच दिलें पाहिजे [illegible]

डॉ. मॅकिकन सारख्या सर्व [illegible] शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च केलेल्या सोनाराचें [illegible] वर्षांच्या अनुभवानें स्पष्ट मत [illegible] विद्यालयाच्या न्यासपीठावरून [illegible] कान टोंचले आहेत त्यांचा [illegible] मध्यप्रांतांतील सरकार करणार [illegible] व आमच्या विद्याखात्यांतील जबाबदार अधिकारी इतिहास, भूगोल, गणीत, शास्त्रीय विषय व संस्कृत वगैरे दुसरी भाषा मातृभाषेतूनच शिकविण्यासंबंधाचा हुकूम शाळांतील शिक्षक लोकांस करणार नाहींत काय? करण्यासारखी गोष्ट असून ही सरकारास जर कांहीं अडचणी वाटत असतील तर लोकहो, तुह्मी आतां किती दिवस गप्प बसणार ! कोमल बुद्धीच्या बाल विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेच्या ऱ्हास होत आहे याकडे तुमचें केव्हां लक्ष पोंचणार !

---

## जातीभेद आणि मि. गांधी.

जातिभेदाची शृंखला तोडून हिंदुलोकांना बंधमुक्त करण्याचे आतांपर्यंत पुष्कळ प्रयत्न झाले, पण आमच्या लोकांची स्मरणशक्ति इतकी कोती आहे कीं त्या प्रयत्नांचे परिणाम काय झाले त्याचें त्यांना स्मरण राहत नाहीं, आणि ते पुनः पुनः तसेच प्रयत्न करून आपलें जगांत हंसें मात्र करून घेतात. जातिभेद मोडण्याचा प्रयत्न दोन हजार वर्षांपूर्वीं गौतमबुद्धानें केला होता. त्याचा काय परिणाम झाला? कांहीं थोडे निरनिराळ्या हलक्या जातीचे लोक आपणास समाजांत वरच्या दर्जास चढण्याला ही चांगली संधी आहे असें पाहून बौद्धसंघांत प्रथम प्रविष्ट होऊन नंतर योग्य संधी पाहून पुनः हिंदुसमाजांत वरच्या दर्जावर आले. पण जातिभेद मोडण्याऐवजीं याच्या योगानें उच्चवर्णाला मात्र संस्कारहीन लोकांच्या संसर्गामुळें निकृष्ट दशा प्राप्त झाली! जैनतीर्थंकर महावीर याचे पंथांत जातीभेद नव्हता. त्याचा परिणाम काय झाला तोंही पहा. जैन हीच एक स्वतंत्र जात होऊन बसली, आणि त्या जातींत ही मागाहून कडक निर्बंध उत्पन्न झाले. बुद्ध, महावीरासारखे सुधारक विरांनीं जेथें हात टेकले, तेथें आमच्या सहभोजनाच्या द्वारें ही सुधारणा घडवून आणणाऱ्या जिलबीवीरांच्या प्रयत्नास यश कसें यावें? मि. गांधीं सारख्या खऱ्या देशभक्तांना या जिलबीवीरांचे प्रयत्न हास्यास्पद वाटत आहेत यांत नवल नाहीं. थोड्या दिवसापूर्वी अमदाबाद येथें एका ज्ञातीपरिषदेंत भाषण करतांना ते ह्मणाले कीं, सहभोजनानें जर माणसांत मैत्री व एकी उत्पन्न होती तर युरोपांत सध्यां जी कापाकापी सुरू आहे ती कधीं झालीच नसती. हिंदुसमाजाचीच काय, पण एंकदर जगांतल्या समाजाची रचना कोणत्याना कोणत्या तरी प्रकारच्या जातिभेदावर ( मग त्याला तुह्मी हवेंतें नांव द्या ) च झालेली आहे. प्राच्य आणि पाश्चात्य सुधारणेंत फरक येवढाच आहे कीं, पाश्चात्यभेद हे सांपत्तिक स्थितीवर [illegible] आहेत, आमच्या इकडे ते धार्मिक [illegible] निरनिराळ्या पायऱ्या ठरून त्या- [illegible] ते झाले, आणि पुढें ते जन्म- [illegible] बसले. असले भेद हे अनादि [illegible] आले आहेत व ते जगाच्या [illegible] च.

## एक नवी अडचण

हिंदुस्थानांत काचेचे कारखाने काढण्याकडे अलीकडे लोकांचें लक्ष लागत चाललें आहे. अंबाला, तळेगांव, किर्लोस्करवाडी, फिरोजपूर वगैरे ठिकाणीं असलेले कांचेचे कारखाने वाढविण्याचे विचार चालले आहेत, तों इतक्यांत एक अकल्पित अडचण त्यांचे मार्गांत उपस्थित होत आहे. रंगीत कांच तयार करण्यास आक्साइड द्रव्यांची अवश्यकता असते; पण हे ऑक्साईड अद्याप इकडे तयार होऊं लागले नाहींत व विलायतेहून आणावें तर बोटींचें भाडें मनस्वी वाढलें आहे. तशीच गोष्ट भट्टीची ही आहे. काचेचा रस करण्यास फायरप्रुफ मातीच्या भट्ट्या लागतात. या आतांपर्यंत जपानहून येत व एकेका भट्टीला २५ रु. पडत. एक भट्टी दोन महिने जाई आतां जपानहून येणाऱ्या मालाला ही बोटीच्या भाड्याच्या सबबीवर अधिक किंमत पडते. इतकेंच नाहीं, तर आपण भट्या दिल्या नाहींत तर हिंदुस्थानचे काचेचे कारखाने बसतील या समजुतीनें जपानी लोक भट्ट्यांची किंमत भलती चकडे चढवीत आहेत. यःकश्चित मातीकरितां आमच्या देशाला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागतें! आमच्यांतले विलायतेहून भूगर्भविज्ञान शिकून आलेले लोक जागे आहेत काय ? हिंदुस्थानांत कोठेंच भट्टी करण्यासारखी फायरप्रुफ माती त्यांना आढळत नाहीं काय ? जयपूरकडे आक्साईड तयार करण्यासारखे पुष्कळ अशोधित धातु आहेत असें ऐकतों. आमच्या एका स्नेह्यानें त्याचे नमुनेही आह्माला दाखविले होते. जयपूर दरबार सुषुप्त आहे कीं जागृत आहे कांहीं कळत नाहीं. इतके खनिज पदार्थ उशाशीं घेऊन स्वस्थ घोरत पडलेल्या या दरबाराला जागें करण्याचें श्रेय हिंदुस्थान सरकार घेईल काय? हॉलंड कमिशन काय करतें पहावें.

---

## साखरेच्या कारखान्यास उत्तेजन.

ब्रिटिश साम्राज्यांतल्या लोकांची नजर आपापल्या उद्योगधंद्यांची वाढ करण्यासाठीं इंग्लंडकडे कशी लागून राहिली आहे पहा! ब्रिटिश वसाहतीवाल्यांनीं साम्राज्य सरकारांशीं प्रथम राजकीय प्रश्नांची चर्चा करून आतां ते आपल्या उद्योगधंद्यांना अनुकूळ अशा सवलती मिळविण्याच्या खटपटींत आहेत. सध्यां साखरेच्या उद्योगाचा विकास करण्यासाठीं विलायतेंत पुढील योजना तयार होत आहे. (१) ब्रिटिश साम्राज्यांत तयार झालेल्या साखरेवर आयात जकातींत शेंकडा ५० टक्के पर्यंत सूट द्यावी. व ही सूट साखरेवर दर पौंडाच्या मागें अर्धा आण्याहून कमी नऱ्हावी. (२) मित्र राष्ट्रांतून येणाऱ्या साखरेवर ब्रिटिश राज्यांत १२॥ टक्यांहून अधिक सूट देऊं नये. (३) तटस्थ राष्ट्रांतून येणाऱ्या साखरेवर नेहमीची ठराविक जकात घ्यावीच पण हीं राष्ट्रें ब्रिटिश राज्यापेक्षां इतर राष्ट्रांशीं अधिक अनुकूळ वर्तन ठेवतील तर त्यांचे जवळून वाढविलेल्या दराप्रमाणें जकात घ्यावी. (४) शत्रुराष्ट्रांतून येणारी साखर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें पांच वर्षेंपर्यंत आयात होऊं देऊं नये. त्या नंतर दीडपट जकात घेऊन येऊं द्यावी. स्वदेशांत उत्पन्न होणाऱ्या साखरेची उपज वाढविण्यासाठीं आणि शत्रूच्या मालाचा खप कमी करण्यासाठीं देशी मालाला पूर्ण उत्तेजन द्यावें, व शत्रूच्या मालाला निर्बंध घालावे; आणि त्यासाठीं देशांत होणाऱ्या साखरेवरची जकात आणि साम्राज्यांतल्या साखरेवरची जकात यांच्यांत दर टनामागें २५ रुपयांचा फरक ठेवावा. या सवलतीचा फायदा हिंदुस्थानाला मिळेल काय?

---

## युद्धाची प्रगति.

दोस्त राष्ट्रांनीं युद्ध एकमतानें चालविण्याकरितां कांहीं दिवसापूर्वीं एक युद्धमंडळ नेमलें होतें. या युद्धमंडळानें फार महत्वाची सुधारणा घडवून आणली आहे असें आतां स्पष्ट दिसूं लागूं लागलें आहे. युद्ध मंडळाच्या पूर्वीं दोस्त राष्ट्रें दुसऱ्या दोस्तास न विचारतां आपल्याच मतानें वाटेल त्या वेळीं व वाटेल त्या ठिकाणीं चढाई किंवा अन्य उपाय योजीत असत परंतु आतां लढाईच्या सर्व बाजूंच्या तोंडास दोस्त राष्ट्रांची चढाई दिसून येत आहे व हे वरील युद्धमंडळानें घडवून आणलें आहे. असें जरी आहे तरी पश्चिम युद्धक्षेत्रांत लढाईचा जोर गेल्या आठवड्यांत झाला व तो तसाच कायम राहील. जर्मनीचे दोन त्रितीयांश सैन्य फ्रेंच व आपल्या साम्राज्यसेनेच्या चढाईमुळें गुंतून गेलें आहे. इतकें प्रचंड सैन्य जरी शत्रूनें जमविले तरी दोस्त राष्ट्रांनीं पश्चिम क्षेत्रामध्यें जर्मनीस बरेच मागें हटाविलें आहे. ब्रिटिशानीं थीपवाल जवळ जवळ वेढून टाकलें आहे. गीलेमांट या शहराचा कांहीं भाग काबीज केला गेला. गीलेमांट जवळ सतरा मैलांच्या अघाडीवर ब्रिटिश सैन्य २-३ मैल चढाई करून गेलें आहे. बॅझेन्टनिच्या पश्चिमेसही कांहीं जागा सर केली आहे. सोम नदीजवळ निकराचे हल्ले झाले तरी गेल्या शुक्रवारीं जी जागा सर केली गेली ती शत्रूला परत घेऊं दिली नाहीं. थीपवळच्या दक्षिणेकडील शत्रूच्या खंदकाचा नाश केला. सर्व अघाडीवर ब्रिटिशांच्या तोफांचा मारा बिनचुक व भयंकर विनाशकारक होता.

फ्रेंच सैन्यानें देखील या सर्व बाजूंच्या चढाईमध्यें फार महत्वानें काम केलें आहे. व्हर्डूनजवळ शत्रूचे निकराचे हल्ले थोपवून सोम नदीच्या आघाडीवर सरशी केली फ्लूरी हस्तगत करून जर्मनांचे ते परत घेण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ केले. गिलेमांट व मारेपास याच्या मधील एक तटबंदीचें ठिकाण हस्तगत केलें.

पश्चिमेकडील चढाईस इटलीनें आपल्या यशस्वी हल्यानें मदत केली. पुढें आलेल्या आस्ट्रियन फौजेस मागें रेटून तीस पूर्वींच्या आघाडीच्या मागें हाकलून दिलें आहे.

या सर्व प्रयत्नास राशियानें राशियन दुजोरा देऊन आस्ट्रियन फौजेस मागें

पिटाळून कार्पेथियन पर्वतापर्यंत धडक नेउन पोंचावली आहे.

सॅलेनिकामध्यें विलक्षण प्रकार दिसून पडत आहे. येथें फ्रेंच व ब्रिटिश सैन्य आहेच परंतु या आठवड्यांत राशियन व इटालियन फौज उतरली आहे. यामुळें बल्गेरिया व कॉन्स्टांटिनोपल यांस प्रचंड शह लागला आहे. अशा प्रकारें सर्व बाजूस दोस्त राष्ट्रांची चढाईस सुरुवात होऊन लढाईस तोंड कोठें द्यावें हें त्यांच्या इच्छेनुरुप होणें शक्य झालें आहे. आतां अशा संधींत रोमानिया दोस्त राष्ट्रांना मिळाला आहे ही जर्मनीवर व आस्ट्रियावर निराळी गदाच होय. आतां जर्मनीस आपली बाजू कोठें संभाळावी व हल्ला कोठून येईल याची भीती वाटूं लागली आहे. पश्चिम आघाडीवर हें स्पष्ट दिसून आलें. जेथें ब्रिटिशानीं हल्ला केला तेथें जर्मनीची तयारी नव्हती. जर्मनानीं दुसरीकडेच फौजांचे एकीकरण केलें होतें. तें मोडून पुन्हा ब्रिटिश हल्याच्या जागीं सैन्य आणण्यास वेळ लागून मागें हटणें भाग पडले. अशा प्रमाणें सर्व बाजूची चढाई चालू आहे व ती कांहीं काळपर्यंत तशीच पुढें चालू राहील असा संभव आहे.

---

## योग्य प्रशंसा.

मध्यप्रांत व वऱ्हाडच्या सरकारोंन सी. पी. च्या स्थानिक स्वराज्य बिलाचा मसुदा तयार करण्यासाठीं जी कमिटी नेमिली आहे तींत सरकारी कामदारांबरोबर बिन-सरकारी गृहस्थ ही आहेत या गोष्टीबद्दल उल्लेख करतांना मद्रासचे ‘कामनविल’ पत्र ह्मणतें- ‘अशा प्रकारच्या प्रश्नावर वाद व्हावयाचाच, तेव्हां सी. पी. सरकारनें वरच्या सारखी कमिटी नेमण्यांत मोठा शहाणपणा दाखविला आहे यांत शंका नाहीं. संयुक्त प्रांताच्या सरकारनें केलेल्या चुकीवरून मध्यप्रांताचें सरकारनें धडा घेतला आहे. मध्यप्रांत एका व्यक्तिच्या तंत्रानें चालणारें आहे अशी लोकांची समजूत आहे. पण कधीं कधीं एका व्यक्तींच्या तंत्रनें चालणारा कारभार चार व्यक्तीच्या तंत्राच्या कारभारापेक्षां चांगला ठरतो. मद्रास सरकारानें मद्रास कार्पोरेशनच्या सभासदांचा विचार घेण्याचें सुद्धां नाकारलें. त्या मानानें पाहतां सी. पी. सरकारची वर्तणूक विलक्षण व्यत्यास दाखविणारी आहे.’ सरकारी अधिकाऱ्यांवर अतिशय कडक टीका करणारी ह्मणून ज्या बाईवर मुंबई व मद्रास सरकारचा येवढा रोष झाला आहे त्याच बाईच्या पत्रानें आमच्या प्रांताधिपची केलेली ही प्रशंसा पाहून आह्मांस अधिकच समाधान वाटतें.

---

## आशा शिखरें.

दोन हजार रुपये सरकारजमा झाल्यामुळें न डगमगतां “न्यू इंडियाच्या” जग प्रसिद्ध वर्तमानपत्रकर्त्री श्रीमती बिझांटबाई यांनीं पुनः दहा हजाराचा जामीन भरून तें स्वराज्यवादी दैनिक पत्र चालू ठेविलें आहे. सत्य संकल्पाचा दाता भगवान पुण्य कार्यांतलीं विघ्नें जीं प्रचंड काळ्या कुट्ट डोंगराप्रमाणें खडतर दिसतात तीं सत्यनिष्ठेच्या व स्वातंत्र्य सूर्याच्या तेजोमय प्रभेमुळें सुंदर रमणीय व आशा मंदिराची शिखरेंच अशीं दिसूं लागतात.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— गेल्या आठवड्यांत कांहीं दिवस स्वच्छ ऊन पडत असे. शुक्रवारीं व शनिवारीं जोराचा पाऊस पडला. रविवार दुपार पर्यंत एकंदर पाऊस ३० इंच झाला.

कालरोजीं रा. मोरो बाळकृष्ण परांजपे वकील यांचे ६ वाजतां स्वराज्य या विषयावर लायब्ररींत व उमरावतीचे रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांचें ७ वाजतां राजेश्वराच्या देवळांत, अशीं दोन व्याख्यानें झालीं.

नामदार स्लॅडन कमिशनर साहेब यांची स्वारी काल रात्रीं येथें आली असून त्यांचा बराचसा मुक्काम होणार आहे.

खान बहादुर सोराबजी शापुरजी ए. अ. कमिशनर हुशंगाबाद यांस कांहीं दिवसाकरितां हुशंगाबादचे जिल्हासाहेब नेमण्यांत आले आहेत. हें ऐकून वऱ्हाडचे मंडळीस आनंद वाटेल.

रा. रा. गणेश माधवराव टिकले प्रोबेशनरी ए. अ. क. यवतमाळ यांस एक महिना दहा दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली.

रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट यांस खांडव्याहून यवतमाळास बदलण्यांत आलें. आणि यवतमाळचे रा. रा. रामचंद्र मोरेश्वर पारधी ए. अ कमिशनर यांची बदली आकोल्यास करण्यांत आली आहे.

रा. रा. लक्ष्मीकांत सदाशिव सुभेदार ए. अ. कमिशनर यांस बुलठाण्यास नेमण्यांत आलें.

कुमारी आदा हर्न असि. इन्स्पेक्ट्रेस नागपूर यांनीं राजीनामा दिल्याकारणानें श्रीमती सौभाग्यवती तापीबाई हर्डीकर एम. ए. बी. एस. सी यांस २०० रुपये पगारावर नागपुरास नेमलें हा शुभमूहूर्त होय.

रा रा. दत्तात्रय वासुदेव गोखले सब रजिस्ट्रार आकोला यांस ६ महिन्याकरितां पश्चिम वऱ्हाडचे इन्स्पेक्टर नेमण्यांत आले आहे.

**जिल्हा कांग्रेस कमिटी**—गेल्या ३१ व्या तारखेस आकोल्यास जिल्हा कांग्रेस कमिटी स्थापण्यांत आली. आणि त्या वेळीं नामदार रा. ब. मुधोळकर यांनीं भावी प्रांतिक परिषदेसंबंधानें लोकांस चांगली महत्वाची माहिती दिली. बुलढाण्यास ही आतां कांग्रेस कमिटी लवकरच स्थापित झाली पाहिजे. ह्मणजे स्वराज्याच्या ध्येयाचें काम अधिक नेटानें चालविण्यास ठीक पडेल.

**मराठी ज्ञान कोश मंडळाचे** डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकर हे मध्यंतरीं खामगांवास गेले होते. त्यांच्या या मोठ्या उद्योगाविषयीं लोकांची जशी सहानुभूती व द्रव्यद्वारा मदत व्यापारी तत्वावर मिळत आहे तसा राजाश्रय ही मिळाला पाहिजे. किंबहुना अशा मंडळाचे कार्य खुद्द मराठी भाषा चालणाऱ्या प्रांताच्या विद्याधिकाऱ्यानीं आधार देऊन सांपें केलें पाहिजे. असल्या शुद्ध ज्ञानविषयक कार्यास उत्तेजन मिळाल्यास सरकारची हिंदुस्थानच्या प्रगतीविषयींची कळकळ कार्यरूपानें व्यक्त होऊन लोकांस आनंद होईल.

डा० केतकर हे नागपुरास जाऊन तारीख ८ ला यवतमाळ येथील श्री गणेश उत्सवापुढें हिंदू लोकांची पुनर्घटना या विषयावर तीं व्याख्यानें देणार आहेत. त्यांच्या कल्पना पुष्कळशा दुरवर पसरल्या आहेत व त्या आतां इतक्या सिद्धांतरूपी झाल्या आहेत कीं त्यांनीं त्यांचीं संस्कृतांत सूत्ररूपानें माला बनविलेली आहे.

**आरोग्य शास्त्राचीं मूलतत्वें** (अथवा निरोगी कसे व्हावें) यावर एक सुंदर ११० पानांचा लहानसा ग्रंथ डाक्टर सी. एल. मुळे सब असिस्टंट सर्जन एलिचपूर यांनीं लिहिलेला आहे. हें पुस्तक प्रत्येक गृहामध्यें ठेवण्यासारखें असून सर्व शाळांच्या लायब्ऱ्यां मधून याचा अवश्य संग्रह झाला पाहिजे. कलकत्ता युनिव्हर्सिटीनें मान्य केलेल्या कर्नल बेडफर्ड यांच्या पुस्तकाच्या आधारें हें लिहिलें आहे. तथापि पुस्तकाच्या अतररचनेवरून पाहतां आपल्या व्यवहारांतील अनुभवाच्या गोष्टी अगदीं सोप्या पद्धतीनें यांत मांडलेल्या आढळतात. नेहमींच्याच गोष्टी या पुस्तकांतील लेखकांच्या दृष्टीनें पाहतां पुष्कळच मौजेच्या व ज्ञानबोधक वाटतील. याच्या प्रारंभीची अर्पणपात्रिका नामदार कर्नल डेनिस सॅनिटरी कमिशनर यांच्या नांवानें असून त्यांच्या विषयीं ग्रंथकर्त्यानीं पराकाष्ठेचा आदरभाव दाखविला आहे. पुस्तकाची किंमत ·॥· आहे.

---


Oriental Government Security
Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

**FUNDS exceed 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,0[illegible]0,950 |
| 1888 | 8668 | 2 63,[illegible]38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37[illegible],26,354 |
| 1906 | 48,147 | 9,4[illegible],63 407 |
| 1915 | 64 138 | 12,2[illegible]3,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

*SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

*Influential and active agents wanted Terms Liberal*

:0 -

Full particulars, prospectus [illegible] proposal forms on application to:—

R. Paterson B[illegible]
Manag[illegible]

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

V. N. 22


---

हें [illegible] कडके यांच्या वऱ्हाडसमाचार
छाप[illegible] शिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.-N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ], आकोला--सोमवार तारीख ११ माहे सप्टेंबर सन १९१६ इ० [ अंक ३६

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

ज्या अर्जदारांना पूर्वींचे कर्जरोखे बदलून नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा आपला हक्क चालविण्याची इच्छा नसेल त्यांस तो हक्क चालू बाजार भावानें पोष्ट आफिस मार्फत इतरांस विकतां येतो.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणा

मी ———————— अक्षर वाचतां असें स्वच्छ लिह

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर कारित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

———— ————

रोख रकम किती दिली, चे किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें सलेल्या ठेवींतून काढून रकम दिली असल्यास तो ती त्या रकमा त्याक रिकाम्या सोडलेल्या वेगवेगळ्या नमुद कराव्यात मजकूर अनवश्यक असे खोडून टाकावा.

एकूण रुपये........

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

(अ) किंवा (ब) ह्या दो तून एक पारिग्राफ दुसरा खोडून टाकाव

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकड अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा आ देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————

पत्ता ————

तारीख ————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ———— रजिस्टर नंबर ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची ) ( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावया

नो. नं. २४१ हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इनफन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील रहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कमिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविले जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवंस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. म्हणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. कींमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पल्टण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बन्नु येथें आहे.

नो नं २४२

---

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षांचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा पापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर पापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०१ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १९८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नं. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, विस्वदळी टीका, मुदा अग्रफुलें सांखी व पायल्यांची वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, त्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन साची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।||, १, १|, १||, २, २|| ते ५ रु. प. बुद्धीबळ जोड लांकडी— किंमत ।||। १, १||, २ ते ४ रु. प. सोंगट्या जोड— किंमत ।।, ।|।, ।||।, १, १||, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. २७२

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, पात भरण्याचे, लिस्टफार्म पर्व्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३|| रु. शेर नं. २ रा २|| रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबुस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवनी मोहला नागपूर शहर सर्केल नं ६

## चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने,

चंद्रहार किं रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १||, २, २||. पाटल्या जोडीची किं. रु. १||, २, २||. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १||, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १||. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १||. बांगड्या जोडीची किं रु. १||,२,२||.

कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १४३ आणि १४७ तो. खालिस कस्तुरी रु २५ तो. शुद्ध शिलाजीत ४९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

वाचा आणि मित्र मंडळीला दाखवा.

## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

आपलेपणाची खरी ओळख पटविणाऱ्या बोधपर गोष्टी, नामांकित लेखकांचे विचारपरिप्लुत निबंध, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी, अकलेचे हिशोब व कूटप्रश्न वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १||=

**मालेच्या वर्गणीदारांस बक्षिसे.**

वार्षिक परिक्षेंत पास होणाऱ्या कोणत्याही इयत्तेंतील विद्यार्थी वर्गणीदारांस दरसाल बक्षिस रुपये ५००

अकलेचे हिशोब किंवा कूटप्रश्न सोडविणाऱ्या वर्गणीदारास दरमहा बक्षिस रुपया १

या संबंधाची तपशीलवार माहिती माहे मे १९१६ च्या अंकांत पहा. श्री. एल. आर. बावडेकर हे आकोल्याचे एजंट आहेत. गांवोगांवीं एजंट पाहिजेत— कमीशन भरपूर देऊं.

के. बी. देशमुख
संपादक—सुबोधमाला
उमरावती.

नो० नं० ३१८

लो. टिळकाच्या गीतारहस्याचें

-रहस्य-

कसलेल्या लेखकानें थोडक्यांत पण गोड भाषेंत काढलेलें

छापत आहे.

आगष्ट अखेरपर्यंत नांवें नोंदविणारांस
——फक्त चार आणे किंमत——
म्यानेजर— "भगिनीसमाचार"
पुणें शहर.

नो. नं. ३२६

## जाहीर नोटीस

रा. रा. गोपाळ यज्ञेश्वर जोशी व खीवराज प्रतापचंद मारवाडी आणि हरी मारुती पाटील रा. पिंपळगांवकाळे

यांसः—

नोटिस देणार गोविंद पुरुषोत्तम पिंपरीकर रा. व ता. जळगांव (वऱ्हाड) यांजकडून तुह्मास या नोटिशीवरून असें कळविण्यांत येते कीं, आह्मी तुह्मा त्रिवर्गाकडेस रुपये १००० एक हजार धर्मांत (श्री दत्तात्रयाचे) ठिकाणीं दरसाल दत्त जयंतीचे वेळीं ब्राह्मण भोजन करण्या करितां ठेव दरमहा दरशेकडा १ रुपया व्याजानें ठेऊन त्या व्याजाचे उत्पन्नांत किंवा एक शेत विकत घेऊन त्या शेतांतील दरसाल उत्पन्नांत ब्राह्मण भोजन करीत जावें. व ते वेळीं आह्मास बोलावून आमचे हातानीं संकल्प सोडवीत जावा. या करारावर गोपाळ यज्ञेश्वर याजपाशीं रु. ४०० चारशे, खीवराज प्रतापचंद याजपाशीं रु. ३०० तिनशे व हरी मारुती याजपाशीं रु. ३०० तिनशे एकूण रुपये १००० एक हजार तुह्मा तिघापाशीं १९०९ सालांत ठेवून वर लिहिले प्रमाणें तुह्मी ५ वर्षे पावेतों व्यवस्था ठेवावी असा करार ठरला होता जर या प्रमाणें तुमचे कडून व्यवस्था न राहिली तर तुमचे कडून व्यवस्था काढून आमचे इच्छेप्रमाणें या धर्मार्थ कृत्याची आह्मी व्यवस्था ठेवूं असा ठराव चार संभावित लोकांसमक्ष झाला होता. तुह्मी मात्र पहिलीं २ वर्षे आह्मास कराराप्रमाणें बोलावून ब्राह्मण भोजन केलें. परंतु त्यानंतर आजपर्यंत ह्मणजे ५ पांच वर्षांत तुमचे कडून कराराप्रमाणें कांहीं एक व्यवस्था झाली नाहीं. पैशाचें शेत घेतले नाहीं, व्याजांतून ब्राह्मण भोजन केलें नाहीं त्याचप्रमाणें व्याजाचे उत्पन्नही दाखवित नाहीं. रुपयांची मागणी करावी तर देऊं ह्मणून ह्मणतां. सबब या लेखावरून तुह्मा त्रिवर्गास असें कळविले जात आहे कीं, ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत आमची रक्कम व्याजासह तुह्मी त्रिवर्गांनीं जळगांव येथें आणून द्यावी व रक्कम पावल्याबद्दल आमची पावती घ्यावी. याप्रमाणें मुदतींचे आंत तुमचे कडून न घडून आल्यास तुमचेवर फौ. को. खामगांव येथें दगलबाजी केल्याबद्दल फिर्याद केली जाईल. हें पक्कें समजावे कळावें. ता. १-९-१६

सही

गोविंद पुरुषोत्तम पिंपरीकर राहणार
जळगांव ( जामोद )

नो० नं० ३२७

## नोटीस

नोटिस बेशमी गणेशराम छप्पनभोगी (दाढीवाला) पंड्या श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी

यांसः—

रूपराव राजाराम देशमूख रा. माना ता. मुर्तिजापूर जि. आकोला पोष्ट ऑफिस माना यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी जगन्नाथ येथें आलो असतां आमची खर्ची कमी पडल्यावरून तुमचे कडून रुपये ४५ रोख घेतले. आणि त्याऐवजीं आमची रकम दागिना तांदळीपोत सोन्याची व त्यांत असलेले सोन्याचे मणी व पुतळ्या ३ सह अंदाज वजन तोळे २ ही धरवर ठेविली. आह्मी घरीं येऊन दाखल झाल्यावर लागलीच ता. ४-५-१९१५ रोजीं ४५ रुपयांची मनीऑर्डर पाठविली तिची पोंच आली. आमचा डागिना तुह्मी परत केला नाहीं. वरून रजिष्टर नोटिस ता. २८-६-१९१५ रोजीं केली. ती ही आपणास मिळाली ह्मणून सही आली. परंतु आजपर्यंत डागिना पाठविला नाहीं, वरून पुन्हा तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत आमचा दागिना पोष्ट मार्फत इनशुअरंस रजिष्टर पार्सल करून रवाना करावा. तसें न केल्यास मग आह्मी आपलेवर विश्वासघाताबद्दल फौजदारींत फिर्याद दाखल करूं. ता. १७-८-१९१६

सही

रूपराव राजाराम देशमुख राहणार
माना दस्तुर खुद

नो. नं. ३२८

## जाहीर नोटीस

१ राघो वा। भुराजी खाटीक राहणार व पोष्ट कामरगांव ता. मुर्तिजापूर

२ बन्या वा। भुराजी खाटीक राहणार कारंजा लाडाचा दिल्ली दरवाज्या जवळ पोष्ट कारंजा ता. मुर्तिजापूर

यांसः—

या उभयतास या जाहीर नोटिशीनें खालीं सह्या करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, कजबे कारंजा ता. मुर्तिजापूर येथील कच्छी आळींतील वडिलोपार्जितची स्थावर इस्टेट दुकान आकु कच्छी यास दरसाल रुपये १०० शंभर भाड्यानें तुह्मी उभेतां व आमचा बाप असे त्रिवर्गांनीं मिळून अजमासें ६ वर्षांपासून दिली आहे. सदरहू वडिलोपार्जित इस्टेटींत आमचे बापाचा व त्याचे मरणानंतर आमचा वारश्याच्या नात्यानीं हक्क आहे. व त्या हक्काचे तिसऱ्या हिश्याचे आह्मास दरसाल रकम रुपये ३३८५८४ मिळाले पाहिजेत. ही रकम सालोबाद आमचा बाप जिवंत होता तो पावेतों व त्याचे मरणानंतर आमची पालन करणारी जन्म देती आई सिताबाई ही मागण्यास कच्छयाचे येथें गेली असतां कच्छी सर्व भाड्याची रकम तुह्मांस अदा केली असें कळवितो. यावरून तुह्मांस ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आमचे हिश्यास दरसाल येणारी रकम एकंदर ६ वर्षांची २०० दोनशें रुपये घेणें निघत आहे. ते आह्मास ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत कच्छयापासून तुह्मी वसूल केले असल्यास आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. व यापुढें आमचा समाईक वडिलोपार्जित तिसरा हिस्सा आह्मी दुसऱ्यास भाड्यानीं देऊं. तुह्मास त्याची जरूर नाहीं. ही नोटिस दिली सही. ता. १५ माहे आगष्ट सन १९१६ इसवी दस्तुर लालखां झब्रेखां पी. रा. मुक्काम आकोला

सह्या

शिवराम वा। धणु खाटीक
१ नारायण वा। धणु खाटीक
१ मुली वा। धणु खाटीक
वरील तिन्हीं मुलें अ. पा. आई सिताबाई
मर्द धणु खाटीक इची नि॥ आंगठा

नो० नं० ३२९

## नोटीस

मेहरबान काजी सयद इनायतुल्ला वा। सयद कुदरतुल्ला राहणार मंगरूळपीर

यांसः—

खालीं लिहिलेले जुमा महेजतीचे कमेटी मेंबर यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपण पूर्वीं या कमेटीचे मेंबर असून कमेटीनें सभेची तारीख नमुद करून त्या तारखेवर सर्व मेंबर हजर होऊन नोटीस केली असतां त्या नोटीशिवर असलेले मेंबर नी सही करून हजर झाले व प्रोसीडिंग झाले परंतु आपण नेमलेले सभेचे तारखेवर जुमा महेजतीच्या कमेटींत हजर नसून सभेचें नमुदी तारखेचे नोटीस आपण वाचून पाहून मला या कमेटींत कोणतेच प्रकारची गरज नसून मी मुळींच येत नाहीं. मला या कामाची गरज नाहीं. तसेंच या कमेटींत पैश्याच्या बाबतींत आपणाकडे असलेली शिल्लक बाकीचा जमाखर्च कमेटींत दाखवून समजून देण्याकरितां नोटिशीनें खबर केली असतां त्या तारखेवर आपण हजर न होऊन हिशेबही दाखविला नाहीं व कमेटीचे मागील प्रोसीडिंगात असे लिहिले आहे कीं जो मेंबर बरोबर तीन वेळ सभेंत हजर न राहील त्या मेंबरास कमेटींतून काढून टाकण्याचे व त्या जागेवर योग्य असल्या दुसऱ्या मेंबराची नेमणूक करावी, सबब आपण कमेटींत हाजर राहत नाहीं व कमेटीचे मागील हिशेब ता० ३०-४-१९१५ पासून ता० १३-७-१९१५ पावेतों जे हिशेब आपण दिले नाहीं व सभेंत मुळींच येत नाहीं सबब आपलें नांव या कमेटींतून सर्व मेंबराचे मतानें व सभेंत हजर असलेले संमतीत गांवचे लोकांचे मतानें ता० २५-१-१९१६ इसवी रोजीं कमी केले आहे ह्मणजे कमेटींतून रद्द केले आहे याबद्दल नोटिशीनें खबर केली आहे, अशी ही नोटीस केली असतां तीं ही नोटीस आपण वापस केली. करितां ही नोटीस टपाल मार्गानी देण्यांत येते कीं आपलें नांव जुमा महेजत कमेटीचे मेंबरांतून कमी केलें आहे. सबब ता० १६ सप्टेंबर सन १९१३ इसवी रोजीं लिहून दिलेला सर्वे नंबर ९९ व १०१ हीं दोन्ही शेतें आणि त्यातील निम्मे आंब्याचे बारासमेत २५० रुपये स्वामित्वानें अब्दुल्लाखां वा। मेराजखां व गुलाबखां वा। महेबुबखां यांस पांच वर्षांकरितां वहितांस दिलें असून त्यांतील सन १३२४ फसली सालचे साऱ्याबद्दल जो हुकूमनामा झाला त्याबद्दलचे २९१। रुपय आपण घेतले आहेत ते रुपये ता. १ आक्टोबर सन १९१६ इसवी रोजीं शुक्रवारीं दोन वाजतां जुमा महेजतींत हाजर करावे हाजर न केल्यास योग्य रितीनें बंदोबस्त केले जाईल. आपण कमेटींतून खारज केले गेले आहेत सबब आपणाकडून तो पैसा घेणे आहे सबब आज पासून तो. पैसा किंवा जुमा महेजतींत वकफी केलेला कोणतेही प्रकारचा पैसा मुळींच घेण्यास अगर जुमा महेजतींत खर्च करण्यास अधिकार नसून घेऊं नये व खर्च करू नये. ह्मणून या नोटिशीनें आपणांस खबर केली आहे. असें न केल्यास पुढें योग्य रीतिनें बंदोबस्त केला जाईल ता. १-९-१९१६

सह्या

नुरुल्लाखां मंगरूळपीर बकलम खुद
शेख महिबुब वा। शेख मलंग
बकलम खुद
शेख महेबुब वा। नजरमहमद द. खु.
शेखलाल वा। शेख चांद
महमद अमीनोद्दीन वा। महमद अजमोद्दीन मॅनेजर जुमा मसजित
कमेटी.
मुजातखां वा। छोटेखां द. खु.
महमद ऐनोद्दीन वा। महमद
हयात दर्गा मंगरूळपीर

नो. नं. ३३०

## नोटीस

नोटिस बेशमी केशव तुकाराम पाटील रा. पीलकोंडी ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, आह्मी तुह्मास ता. १५-११-१९१२ इसवी रोजीं गहाणखत रुपये ७५० चे लिहून दिले त्या गहाणाचा हिशोब माहे जून सन १९१५ इ. महिन्यांत करून तुह्मी मजपाशीं ७०० रुपयाचा नवीन पुर्जा करून घेतला. व तो पुर्जा करून घेते वेळीं मी तुह्मास विचारिले कीं. रु. ७०० चा पुर्जा कसा लिहून घेतला तरी तुह्मी सांगितले कीं, गहाणखताचे व्याज व रु. २० चा पुर्जा त्याची व्याजासुद्धां रकम व कांहीं रुपये गहाणखताचे राहिलेले मुद्दल पैकीं ही आले. आतां व्याज जाऊन गहाणाचे मुद्दल रुपये वजा होऊन आतां मुद्दल थोडे राहिले. त्याबद्दल मी रुपये ७०० चा

पुर्जी करून दिला. त्यांत काय तुह्मी लिहून घेतले हें मजला कांहीं समजलें नाहीं. व दस्तैवज साधा लिहून घेतल्यानंतर एक महिन्यानीं तुह्माकडे मी आलो व राहिलेले गहाणाचे रकमेचा निकाल करा तर तुह्मी तंटा करण्यास सिद्ध झाला. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, ही नोटिस पावताच तुह्मी रुपये ७५० चे गहाणखतांत रु. ७०० चे पुर्ज्याची रकम हिशोबाअन्वयें वजा करून वेऊन बाकी जी रकम गहाणखताचे रुपयाप्रमाणें मजकडे रकम राहिली असेल ते रुपये ही नोटिस पावतांच आठ दिवसांत चिहू वा वनसिंग पाटील राहणार चांदूर ता. आकोला यांचे दुकानांतून ध्यावे व पावती द्यावी, तसें न केल्यास मग मी तुह्मास पुढें व्याज वगैरे देणार नाहीं हे पक्कें समजावे कळावें. ता. ६-९-१६

सही

सयदरसुल वा सयदनसरू मुसलमान राहणार चांदूर ता. आकोला मु॥ आकोला नि॥ कथ्यार

नो. नं. ३३१

---

वऱ्हाडसमाचार

मित्ति भाद्रपद शुद्ध १५ शके १८३८

## सरकार आणि उद्योगधंदे.

देशांतल्या उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करण्यासाठीं सरकारानें नवे कारखाने काढणें किंवा जुन्या कारखान्यांत भांडवल गुंतवून त्यांच्या जीर्णोद्धार करणें, अथवा लोकांना अल्पस्वल्प व्याजानें भांडवलाचा पुरवठा करून अवश्य त्या इतर सवलती देणें या पैकीं कोणता मार्ग अधिक श्रेयस्कर आहे याविषयीं कदाचित् एकमत होणार नाहीं, पण यापैकीं कोणत्याही एक किंवा अनेक मार्गांनीं अथवा याहून अन्य मार्गांनीं पण उद्योगाभिवृद्धीस मदत करणें हें सरकारचें एक अवश्य कर्तव्य आहे याविषयीं आतां वाद राहिलेला नाहीं. कित्येक उद्योग सरकारनें हातीं धरल्यामुळेंच उत्कर्षाला पावले अशीं उदाहरणें दाखवितां येतील. उदाहरणार्थ असामांतली चहाची लागवड. या धंद्याला उत्तेजन देण्यासाठीं सरकारला मळेवाल्यांच्या उत्तेजनार्थ अनेक सवलती द्याव्या लागल्या, कायदे करावे लागले, लोकापवाद सहन करावा लागला, पण इतक्या गोष्टी केल्या तेव्हां तो धंदा बद्धमूल व फायदेशीर होऊन भरभराटीला आला. क्विनीनचेही उदाहरण या संबंधांत देण्यासारखें आहे. क्विनीनच्या कारखान्यांत सरकारनें बरेंच मोठें भांडवल गुंतविलें व शास्त्रज्ञांची मदत मिळविली, तेव्हां आतां तो कारखाना यशस्वी होऊन मलेरियासाठीं झगडण्यासाठीं लागणारे क्विनीन त्यांना स्वतःच्या कारखान्यांत तयार करतां येऊं लागलें. सीलोन व मलाया येथील सरकारनें रबराच्या झाडांच्या लागवडीला अशीच मदत केल्यामुळें जगांत निर्माण होणाऱ्या रबरापैकीं तीन चतुर्थांश भाग या दोन देशांतून तयार होऊं लागला आहे. वर निर्दिष्ट केलेल्या कारखान्याकडे जसें सरकारनें लक्ष दिलें तसें इतर कारखान्याकडे दिले नाहीं हा टीकाकारांचा त्यांच्यावर एक मोठा आक्षेप आहे. सध्या युद्धामुळें सरकारचाही निरुपाय झाला आहे, पण युद्धकालापूर्वी सरकारनें उद्योगधंद्यांविषयीं जें औदासीन्य दाखविलें त्याचें समर्थन कोणत्याही प्रकारें करतां येणें शक्य नाहीं. या औदासीन्यामुळेंच हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतींत मोठा व्यत्यय येऊन हिंदुस्थानचा व्यापारी वर्ग, कारागीर, आणि मध्यम स्थितींतला वर्ग यांना निकृष्ट दशा आली आणि जपानला हिंदुस्थानावर व्यापारी वर्चस्व मिळवितां आलें. गेल्या दहा वर्षांत जपानच्या मालाची आयात जवळ जवळ तिप्पट वाढली १९०३-४ सालीं १,२८,२४,६९९ रुपयांचा माल आयात झाला होता, तो १९१२-१३ सालीं ४,०६,६६,९८० रुपयांचा व १९१५ सालीं सुमारें ७ कोट रुपयांचा माल भाला. १९१३ सालीं जपानहून २८७५५ रुपयांची साखर हिंदुस्थानांत आली होती १९१३-१४ सालीं ती ३७,२०,३७१ रुपयांचा आली! जपाननें जें हें वर्चस्व मिळविलें त्याला इतर पुष्कळ कारणें असलीं तरी त्यांतलें एक मुख्य कारण येथील सरकारची उद्योगधंद्याला मदत हें आहे हें प्रत्येकास कबूल करावेंच लागेल. जपानचें हें उदाहरण पाहून आमचे सरकारही जागें झाल्यासारखें दिसत आहे, व सर टॉ० हालंड यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमलेलें कमिशन हें त्या जागृतीचें एक ठळक चिन्ह आहे. पण अद्यें तेल नमनाखालींच या म्हणीप्रमाणें उद्योगवृद्धीला सर्वस्वी अनुकूळ असा जो सध्याचा युद्धकाळ तो सगळा कमिशनामार्फत चौकशी करण्यांतच खर्च होईल कीं काय अशी भीति वाटते.

असो. सरकारनें उद्योगधंद्यांना मदत करण्याचें मनांत आणिलें तर त्याला ती किती निरनिराळ्या प्रकारें करतां येईल हे अलाहाबाद युनिव्हर्सिटी मार्फत प्रकाशित होणाऱ्या इंडियन जर्नल ऑफ एकॉनॉमिक्स या त्रैमासिकाच्या एका अंकांत मि. पी. मुकर्जी यांनीं चांगल्या प्रकारें दाखविलें आहे. त्या मार्गांचा नामनिर्देशच आह्मी येथें करतों. (१) ज्या प्रमाणें शेतकऱ्यांना तगाई देण्यांत येते त्याप्रमाणें कारखानदारांना स्वल्प व्याजाच्या दरानें कर्जाऊ भांडवल देण्यांत यावें. या कामी सहकारी पतपेढ्या जशा शेतकऱ्यांसाठीं झालेल्या आहेत तशा घरगुती धंद्यांसाठीं स्थापन झाल्या असत्या तर त्यांची पुष्कळ मदत झाली असती. पण त्यांच्या अभावीं सरकारनें हें कर्तव्य केलें पाहिजे. (२) प्रेसिडेन्सी ब्यांकांकडून असें कर्ज देवविणें हें तत्त्व सरकारनें ही मान्य केलें आहे हें सर विल्यम क्लार्क यांच्या कौन्सिलांतल्या भाषणावरून व्यक्त झालें आहे. (३) कांहीं धंदे सरकारानें स्वतः हातीं घेऊन चालवून दाखविणें व लोकांना औद्योगिक शिक्षणाचे वस्तुपाठ देणें. हें ही तत्त्व कित्येक प्रांतिक सरकारांना पसंत पडलें आहे मद्रास सरकारानें कोको नार येथें पेनसिलीचा, व मद्रास येथें कांचेचा कारखाना काढला आहे त्याच प्रमाणें भुईमुगाचें तेल काढण्याचे संबंधांत प्रयोग करून पाहण्यासाठीं त्या सरकारानें १ लक्ष रुपयांची रकम काढून ठेविली आहे. (४) संरक्षक जकात बसविणें. हा प्रश्न फार मोठा आहे, व त्याचा विचार घाईघाईनें करतां येणार नाहीं, तथापि केव्हां तरी तो केला पाहिजे. लवकर केला तर चांगलाच. (५) कारखानदारांना व्याजाची हमी देणें. रेल्वे कंपन्यांना सरकार अशी हमी देतेच. तीच कारखानदार मागत आहेत. जुन्याच तत्त्वाचा उपयोग नवीन तऱ्हेनें करावयाचा आहे इतकेंच. (६) मालाच्या नेआणीचे बाबतींत सवलती देणें. टाटाच्या लोखंडाच्या कारखान्यांतून दरसाल २० हजार टन लोखंडी आगगाडीचे रूळ घेण्याबद्दलचा १० वर्षांचा करार सरकारनें करून दिला आहे, व त्या बरोबरच कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या नेआणीच्या दरांत ही सवलत ठेविली आहे. सरकारनें दाखविलेल्या या मेहेरबानीचा पुष्कळ परिणाम त्या कारखान्यावर झाला आहे. हाच फायदा सरसकट सगळ्या देशी कारखान्यांना सरकारनें द्यावा (७) देशी मालाला गिऱ्हाईक मिळविण्याची खटपट करणें. बंगाल सरकारनें या साठीं व्यापारी वस्तुसंग्रहालय काढलें आहे. देशोदेशीं इंग्रज सरकारचे वकील आहेत. त्यांचे मार्फत त्या त्या देशांतून हिंदुस्थानचा माल खपविण्याची खटपट सरकारला करतां येईल. (८) कलाशिक्षणाच्या व व्यापारी शिक्षणाच्या शाळा काढणें या विषयीं विशेष कांहीं लिहावयास पाहिजे असें नाहीं. सारांश, सरकारला अनेक मार्ग खुले आहेत. त्यांचा उपयोग करण्याचे कामीं औदासीन्य टाकून सरकारनें उत्साह दाखविला पाहिजे.

---

## दरिद्री हिंदुस्थान.

दोघांचें भांडणामध्यें तिसऱ्याचा लाभ होतो, ही ह्मण लोकांचे अनुभवास वेळोवेळीं आलीच आहे. परंतु अलिकडे कराचीचे मि. वेब साहेब व मुंबई कौन्सिलचे सभासद व अगदीं अलीकडे अनिबेझंट बाई विरुद्ध लिहून बरेच प्रसिद्धीस आलेले मि. जे. डी. किन्स यांच्या वादामध्यें जी माहिती बाहेर आली आहे त्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांचा खरोखरच फायदा झाला आहे. दादाभाई नौरोजी किंवा कै. नामदार गोखले यांनीं इंग्रजी साम्राज्याखालील कोणत्याही भागांतील लोकांपेक्षां हिंदुस्थानच्या लोकांचें उत्पन्न फारच कमी ह्मणजे माणसीं सरासरी सालीना ३० रुपयांचें आहे असें सिद्ध करून दाखविलें आहे. परंतु ही माहिती हिंदुस्थानचे दारिद्र्याचा उगाच डांगोरा पिटणाऱ्या लोकांकडून आलेली आहे. ह्मणून त्यांत तथ्यांश नाहीं असें सांगण्यांत येत होतें. परंतु मि. वेब व जेंकिन्स साहेबांच्या लढाईंत आपल्या प्रतिपक्षाचा पाडाव करण्याकरितां जी माहिती प्रसिद्ध झाली आहे त्यावरून हिंदुस्थानच्या लोकांचें उत्पन्न दरमाणसीं दर साल ३० रुपयांपेक्षां जास्त नाहीं हें जे किन्स साहेबांनीं तज्ञ लोकांचे रिपोर्ट देऊन सिद्ध केलें आहे. व हेच तज्ञ असें सांगतात कीं आस्ट्रेलिया व कानडा येथील दर माणसीं सालीना उत्पन्न ७२० रुपयांचें आहे व विलायतेंत तेंच ६३० रुपयांचें आहे. मात्र लढाईमुळें तेंच दर माणसीं उत्पन्न फारच कमी ह्मणजे ७८० रुपयांवर गेलें आहे.

कोणत्याही देशाची सांपत्तीक स्थिती मापण्याचें प्रमाण ह्मणजे त्या देशामध्यें उद्योग धंद्यांत किती भांडवल गुंतलें आहे व त्यापासून उत्पन्न किती होतें यावर ठरविण्याचा सांप्रदाय आहे. त्या वरून पाहतां हिंदुस्थान हा एवढा मोठा प्रदेश ३० तीस कोटी लोकांनीं गजबजलेला असतांना त्याचा नंबर ब्रिटीश साम्राज्यांतील इतर देशांमध्यें सगळ्यांत खालीं लागतो या संबंधाचे आकडे सर रावर्ट गिफेन या महाविद्वान तज्ञ गृहस्थानीं दिले असल्या कारणानें ते ग्राह्य मानलेच पाहिजेत. ह्या गिफेन साहेबानीं खालीं दिल्या प्रमाणें भांडवलाची व उत्पन्नाची निरनिराळ्या देशांची १९०३ सालीं कशी स्थिती होती हें दिलें आहे.

| | भांडवल | उत्पन्न |
|---|---|---|
| कानडा | रु. २०२५०,०००,००० | रु. ४०५०,०००,००० |
| आस्ट्रेलिया | रु. १७२५०,०००,००० | रु. ३१५०,०००,००० |
| दक्षिण आफ्रिका | | रु. १५००,०००,००० |
| ग्रेट ब्रिटन खेरीज करून ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देश | रु. १८०००,०००,००० | रु. ३०००,०००,००० |
| हिंदुस्थान | रु. ४५०००,०००,००० | रु. ९०००,०००,००० |

सन १९०३ सालीं हिंदुस्थानचें भांडवल वसाहती व साम्राज्याचे इतर देश यांच्यापेक्षां १८३००,०००,००० रुपयांनीं कमी होतें.

आपल्यास असें ही सांगण्यांत येतें कीं हिंदुस्थानची भरभराट कानडा व आस्ट्रेलिया या देशापेक्षां फार झपाट्यानें होत आहे परंतु (सर गिफेन) साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं या दोन देशांचे भरभराटीचें पाऊल जितक्या वेगानें पडतें तितक्याच वेगानें हिंदुस्थानचें ही पाऊल पडत आहे असें ह्मणणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा होय!

हिंदुस्थानचे लोकांजवळ अतोनात पैसा आहे परंतु त्यांना सरकारास महायुद्धाच्या या बिकट प्रसंगीं मदत करण्याची इच्छा नसल्यामुळेंच वेब साहेबांच्या मतें शेंकडा

५ टक्के व्याज ब्रिटिश एक्सचेकर बाँडस घेण्यास लोक पुढें सरसावत नाहींत त्यालाच जेकिन्स साहेबांनीं वर लिहिलेल्या गिफीन साहेबांच्या माहिती वरून असें उत्तर दिलें आहे कीं हिंदुस्थान देश खरोखरच दरिद्री असल्या कारणानें त्याला हे वेब्र साहेबांचे बाँन्डस घेतां येत नाहींत ! व सरकारनें नुकत्याच जाहीर केलेले कर्जाचे रकमेची भरती दारिद्र्यामुळेंच निम्म्याच्या वरती गेली नाहीं ! आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ जेकिन्स साहेबांनीं या सर्व देशांतील बँकांतील ठेवींचे आंकडे दिले आहेत ते खरोखरच मननीय आहेत.

कानडाची लोकसंख्या ऐंशी लक्ष असून त्या देशांत लोकांच्या बँकेमधील ठेवी रु. तानिशे कोटी रुपयांच्या आहेत. आस्ट्रेलियाची लोकसंख्या साठ लक्ष असून लोकांच्या ठेवी ( न्युझीलंड खेरीज करून ) दोनशें पंचावन कोटींच्या आहेत. विलायतेतील लोक संख्या असून लोकांच्या ठेवी पंधराशें कोटीच्या आहेत व हिंदुस्थानची लोकसंख्या तीस कोटी असून त्यांत फक्त नव्वद कोटी रुपयांच्या लोकांच्या ठेवी आहेत !

आमच्या मतें वर लिहिल्या ब्रिटिश साम्राज्याच्या प्रदेशामध्यें व हिंदुस्थानामध्यें इतका जबरदस्त फरक असण्याचें कारण या सर्व देशांस होमरूल ह्मणजे स्वराज्य आहे व हिंदुस्थानास तें नहीं हेंच एक कारण होय! अशा तऱ्हेनें प्रतिपक्षाचा पाडाव करण्याकरितां हिंदुस्थानचें दैन्य निधड्या छातीनें लोकांपुढें मांडणारे जेकिन्स साहेब अनिबेझंट बाई होमरुलची चळवळ करतात तिला हाणून पाडण्याकारितां आपली बुद्धीमत्ता खर्च करीत आहेत असा जो समज झालेला आहे, ती बुद्धिमत्ता हिंदुस्थानची दैन्यावस्था घालविण्या करितां निघालेल्या होमरूलच्या चळवळीमध्यें खर्च करतील काय? व ही दारिद्रावस्था घालवून टाकण्याचे उपाय सरकारास सुचवून स्वतःही उपक्रम सुरूं ठेवतील काय?

---

## मध्यप्रांतांतले तुरुंग.

तुरुंग ह्मणजे कृतापराधाबद्दल शिक्षा भोगण्याच्या जागा असें कैद्यांना भासविण्यापेक्षां दुर्मार्गाकडे प्रवृत्ति असलेल्यांना सन्मार्गाकडे प्रवृत्ति असलेल्यांना सन्मार्गाला लावण्याच्या शाळा होत असें कैद्यांना वाटूं लागावें असा पाश्चात्य राष्ट्रांतील भूतदयाविशिष्ट लोकांचा प्रयत्न आहे आणि तो हळूं हळूं यशस्वी होत आहे. आमच्या इकडे ही तुरुंगावरले वरिष्ट अधिकाऱ्यांना तुरुंगाची अर्थात कैद्यांना वागविण्याच्या पद्धतीची सुधारणा करण्याची बुद्धि होऊं लागली आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पण त्यांच्या प्रयत्नाला यावें तसें यश येत नाहीं अशीं ही उदाहरणें आढळतात. उदाहरणार्थ, कैद्यांना आपला बंदिवास संपवून जातांना एखादा पोटाचा धंदा हस्तगत करतां यावा, ह्मणजे प्रामाणिकपणानें दोन पैसे कमावतां येऊ लागल्यावर गुन्हा करण्याकडे त्यांची प्रवृत्ति कमी होईल अशा बुद्धीनें त्यांना कांहीं उद्योगधंदा शिकविण्यांत येत असतो. पण असें असून पुष्कळवेळां तो धंदा न करतां कित्येक कैदी पुनः चोऱ्या वगैरे करण्याच्या निंद्य मार्गाला लागून तुरुंगांतल्या आपल्या पूर्वस्थळीं येतात. कैदेंतून मुक्त झाल्यावर काम मिळण्याची अडचण पडते. ती पडूं नये ह्मणून नागपूर येथील सरकारी प्रेसचे अधिकाऱ्यांनीं जेलरच्या शिफारशीच्या कांहीं बंधमुक्त कैद्यांना आपल्या कारखान्यांत घेण्याचें ठरविलें. त्या प्रमाणें १९०७ पासून १९१५ पर्यंत ८ वर्षांत ३२ कैदी छापखान्यांत कामास राहिले. पण त्यांतले ५ काय ते अखेरपर्यंत टिकून राहिले आहेत. बाकीच्या २७ नीं कारखाना कां सोडला त्याचीं कारणें कळलीं असतीं, ह्मणजे त्याबद्दलचा सगळा दोष या कैद्यांकडेसच आहे कीं आणखी कोणाकडे आहे तें कळलें असतें. अशा प्रामाणिकपणानें काम करूं इच्छिणाऱ्या बंधमुक्त कैद्यांना कारखान्यांत ही विशेष भूतदयेची वागवणूक मिळण्याची अवश्यकता आहे असें आह्मांस वाटतें. ती मिळाल्यास काम सोडून जाणारांची संख्या कमी होईल. गुन्हे करून पैसे मिळविण्यापेक्षां निढळाच्या घामानें पैसे मिळविणें हें अखेर फायदेशीर होतें हें तत्त्व केवळ शाब्दिक रीतीनें नव्हे तर प्रत्यक्षतया कैद्याच्या मनावर बिंबविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. नागपूरच्या सरकारी प्रेसच्या अधिकाऱ्यांनीं नाउमेद न होतां आपले प्रयत्न सतत चालू ठेवावे व बंधमुक्त कैद्यांना विशेष भूतदयेची व मायेची वागवणूक देण्याचा यत्न करून पाहावा. तो असा कीं आपण कैदेंत होतों ही गोष्टच ते अजीबात विसरून जातील आणि उद्योगाचा महिमा हाच या जगांत श्रेष्ठ आहे अशी त्यांची खात्री होईल, अशा तऱ्हेचा प्रयत्न झाल्यास तो अधिक यशस्वी होईल असें वाटतें.

तुरुंगांसंबंधानें लिहितांना अल्पवयी कैद्यांच्या वागवणुकी संबंधानें लिहिल्यावांचून पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. या बाबतींत शिकस्तीचे प्रयत्न होण्याची अत्यंत अवश्यकता आहे. पंधरा वर्षाच्या आंतील वयाच्या गुन्हेगारांपैकीं १५ जणांचीं उदाहरणें डेप्युटी कमिशनरांच्या नजरेस आणिलीं गेलीं. या १५ पैकीं फक्त पांचच जणांना जबलपूरच्या रेफरमेटरींत ठेवण्यांत आलें होतें. बाकीच्या दहांना सुद्धां कां पाठविलें नाहीं त्याचें कारण कळत नाहीं. बालवयस्क गुन्हेगारांना शिक्षा करण्याच्या बाबतींत कर्नल लेन यांनीं रिपोर्टांत केलेली सूचना अवश्य विचार करण्यासारखी आहे. एका १० वर्षाच्या मुलाला व दुसऱ्या एका १५ वर्षाच्या मुलाला तिकिटावांचून आगगाडीनें प्रवास केल्याच्या गुह्यांबद्दल अनुक्रमें ५ व ७ दिवसांच्या कैदेची शिक्षा देण्यांत आली होती. पांचसात दिवस तुरुंगांत राहिल्यानें त्या मुलांच्या प्रवृत्तींत नीतिमार्गाला अनुकूळ असा फरक पडणें शक्य आहे काय ? उलट या पांच सात दिवसांत निर्ढावलेल्या कैद्यांच्या सहवासांत राहण्यानें गुन्ह्यांकडेच त्यांची प्रवृत्ति होण्याचा व ते अधिक नीतिभ्रष्ट होण्याची मात्र अधिक भीती आहे. पण शिक्षा सांगतांना म्याजिस्ट्रेटाचें या गोष्टीकडे लक्ष जात नाहीं ही शोचनीय गोष्ट आहे. नरसिंगपूरच्या तुरुंगाला बोर्स्टल जेलच्या सुधारलेल्या पद्धतीचें स्वरूप येत चाललें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. येथें कैद्यांना शेती व विटा करण्याचें काम, हे उद्योग शिकविण्यांत येतात. तसेंच शेतकामाला अवश्य लागणारें सुतारकीचें व लोहारकीचें काम ही शिकविण्यांत येतें. चुना तयार करण्याचें व दुधाचा कारखाना चालविण्याचें शिक्षण देण्याचा विचार आहे. मधल्या वेळीं ११॥ पासून १॥ पर्यंत सुटी असते. त्यावेळीं प्राथमिक शिक्षण व त्या बरोबरच नीतिशिक्षण दिल्यास बरें होईल. कैद्यांना आपल्या गत आयुष्याबद्दल विचार करण्यास एकटे राहू न देतां त्यांचें मन नेहमीं कामांत गुंतविणें अवश्य आहे. सारांश तुरुंगाच्या सुधारणेचा प्रश्न सरकारानें हातीं घेऊन त्या प्रीत्यर्थ प्रयत्न चालले आहेत ही मोठी समाधानाची गोष्ट आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत जर्मनी आणि त्याचे साथीदार यांच्या हिताला बाधक आणि युद्धाचा शेवट अलीकडे ओढून आणण्यास कदाचित् समर्थ होतील अशा राजकीय दृष्टीनें महत्त्वाच्या दोन गोष्टी घडल्या. पहिली ही कीं इटलीनें जर्मनीचे विरुद्ध युद्ध जाहिर केलें. इटली व जर्मनीचा दोस्त आस्ट्रिया यांच्यामध्यें आज इतके दिवस युद्ध चालू असतां इटली व जर्मनी यांच्यामध्यें शत्रुत्व नव्हतें असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, इटलीशीं लढण्यांत आस्ट्रियाला जर्मनीची फूस व मदत असली पाहिजे असें साऱ्या जगाचें मत आहे. पण कांहीं सांपत्तिक अडचणीमुळें ह्मणा किंवा अन्य कांहीं कारणामुळें ह्मणा, इटलीला आतांपर्यंत जर्मनीविषयींचे आपले खरेखरे मनोविकार दाबून ठेवावे लागले होते. युद्धाचा कल आतां बहुतेक निश्चित झाला आहे असें दिसतांच इटलीनें जो हा निर्भीडपणा दाखविला तो अखेर त्याला मंगलदायक होवो असें आह्मी इच्छितों.

---

रुमानियानें युद्धात सामिल होणें ही कांहीं अनपेक्षित गोष्ट नव्हती. या पूर्वींच त्याला युद्धांत पडावयास पाहिजे होतें. पण रुमानियाचा दरबार फार हिशोबी आहे. आपणास कोणताही धोका अगर नुकसान न पोंचतांच खास फायदा होणार असें नक्की झाल्याशिवाय कोणत्याही व्यापारांत पडण्याची घाई न करण्याचा कित्येकांचा धिमा स्वभाव असतो, त्यापैकीं रुमानिया हा आहे. रुमानियानें युद्धांत पडूं नये ह्मणून अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत जर्मनीचे प्रयत्न चालले होते. पण ते व्यर्थ झाले, आणि त्यानें आस्ट्रियाशीं आपलें शत्रुत्व अखेर जाहिर केलें. या गोष्टीचा परिणाम दोस्त राष्ट्रांना खात्रीनें हितकारक होईल. एकतर रुमानियाजवळ ६ लक्ष फौज आहे. तिच्यांतली निदान ४ लक्ष तरी युद्धांत शत्रूंला जर्जर करण्याचे कामीं दोस्त राष्ट्रांच्या उपयोगीं पडेल, आणि दुसरी गोष्ट ही कीं त्याच्या आतांपर्यंतच्या तटस्थवृत्तीचा फायदा कावेबाज जर्मन आतांपर्यंत घेत होते तो यापुढें दोस्त राष्ट्रांना मिळेल.

---

## शत्रूंची अंतःस्थिति.

जर्मनीचा बाह्यरंग सध्या जो उदासवाणा दिसत आहे त्याला कारण त्याची शोचनीय अंतः स्थिति झाली आहे. प्राशियानें चालविलेली अरेरावी बव्हेरियानें आतांपर्यंत मुकाट्यानें सोसली, पण आतां ती त्याला असह्य झाली आहे. हा असंतोषाचा अग्नि कोठपर्यंत आंतल्याआंत धुमसत राहणार? आणि तो जर हल्लींच्या सारख्या संकटाचे वेळीं बंडाचे रूपानें प्रकट झाला तर कसें होईल ही चिंता जर्मनीला ग्रासीत आहे. जर्मनीचा दोस्त आस्ट्रिया हा ही या बाबतींत समदुःखी आहे. कारण तेथें ही हंगेरियन लोक आस्ट्रियासंबंधानें असेच असंतुष्ट आहेत. राशियानें ग्यालिशियांत केलेला प्रवेश आणि ट्रेंटिनोमध्यें झालेली आस्ट्रियाची फजीती या दोन गोष्टींमुळें हंगेरीच्या असंतोषाला अधिक जोर आला आहे. कांहीं हंगेरियन लोकांनीं एक स्वतंत्र पक्ष निर्माण करून आपण तीदुसऱ्या पक्षाला बिलकूल साह्य करणार नाहीं असें साफ सांगितलें आहे. या हंगेरियन बंडाचा परिणाम अखेर काय होईल तें सांगतां न आलें तरी येवढें खास आहे कीं सध्यां तरी आस्ट्रियाचा पक्ष त्यामुळें दुर्बळ झाला आहे. त्यामुळें महायुद्धाचा शेवट जवळ ओढला जाईल कीं नाहीं याची वानवा आहे.

---

## पश्चिम रणक्षेत्र.

दक्षिणेकडे हे प्रकार चाललेले असल्यामुळें जर्मन केसरच्या मनाला सुऱ्या टोचल्यासारख्या वेदना होत असल्या पाहिजेत ही गोष्ट खरी; तरी व्हर्डुनचा नाद त्याला इतका लागला आहे कीं महायुद्धाचा शेवट जणूं काय व्हर्डुनच्या भवितव्यतेवरच अवलंबून आहे. ८।१० मैलांच्या हद्दींत जर्मनीनें आपलें प्रचंड सैन्य एकत्र करून ठेविलें आहे. त्याला पूर्वरणक्षेत्रांतून व दुसरी कडून सैन्य काढून आणावें लागलें. इकडे व्हर्डुनपाशीं निकराची लढाई चालू असतां फ्रेंचांनीं मोरेपास घेऊन क्लेरीच्या संनिध भाग गाठला आहे. ब्रिटिशांनीं आपली सत्ता गिंचीच्या बाजूकडे फैलावली आहे. शत्रूंचीं नुसतीं ठाणीं घेऊन उपयोग नाहीं, त्याचा रक्तपात होऊन तो क्षीण झाला पाहिजे. सॉमकडे हेंच होत आहे.

---

## पूर्व रणक्षेत्र.

ग्यालिशियाकडची राशियनाच्या बाजूची विशेषशी बातमी नाहीं. पण सर्वत्र राशियाचा विजय आहे. झ्लोटालिपे येथें तुर्क लोक पकडण्यांत आले आहेत. राशियाचें पाऊल पुढें पडत पडत तो हंगेरिच्या सरहद्दीपर्यंत जाऊन पोंचला आहे. इटलीकडची

बातमी अलीकडे ऐकूं आली नाहीं; पण त्यांनीं कांहीं शत्रूंचीं ठाणीं हस्तगत करून शत्रूचें आक्रमण एशियोगाच्या मैदानांत होण्यास अटकाव केला ही गोष्ट महत्वाची आहे. गॅलिशियांत इटालियन आपली मजबुती करून राहिले आहेत. कॉकेशन रणक्षेत्रांत रशियानें मुश परत घेतलें व शत्रूचे २३०० लोक कैद केले. ते आतां बिटालिसवर चाल करून जात आहेत.

## तुर्क लोकांची स्थिति.

मेसोपोटेमियांत तुर्कांची झालेली फजिती कांहीं विचारूं नये. 'आह्मी मोसलपाशीं दोन तुर्की पलटणी तोफा व यांत्रिक तोफा यांच्यासह काबीज केल्या' असा संदिग्ध संदेश रूटरनें पाठविला व त्याला दुसऱ्या द्वाराकडून ही पुष्टी मिळाली तेव्हां ती बातमी खरी असली पाहिजे. तुर्कांत आतां बिल्कूल दम राहिला नाहीं. त्यांच्या सैन्यांत जर्मन आफिसरांची गर्दी नसती व पैशाचे बाबतींतही ते जर्मनीचे मिंधे झाले नसते तर तुर्क लोकांनीं हव्या त्या अटीवर तह करण्यास कबूल होऊन आपला प्रांत, द्रव्य आणि जीवित यांचा नाश होण्यापासून स्वतःचा बचाव केला असता. त्याला आशेचा तंतु कोठेंच राहिला नाहीं. तुर्क लोक करड्या स्वभावाचे आणि जिवाची पर्वा न करणारे आहेत ह्मणूनच 'एको देवः केशवो वा शिवोवा' या उक्तीप्रमाणें ते जर्मनीला चिकटून राहिले आहेत, अथवा जर्मनीच्या मगरमिठींत सापडले आहेत असें पाहिजे तर ह्मणा. पण एकंदरींत तुर्क लोकांची ही स्थिति पाहून कोणालाहि त्यांची दया आल्यावांचून राहणार नाहीं.

## ना. रा. ब. मुधोळकर व ना. सर विपिन कृष्ण बोस.

गेल्या आठवड्यांत नागपूर येथें भरलेल्या कायदे कौंसिलाचे बैठकींत बजेटाची चर्चा करतांना आमच्या प्रांताचे प्रतिनिधि ना. रा. ब. मुधोळकर यांनीं अशी वाजवी तक्रार केली होती कीं, वऱ्हाड प्रांताच्या उत्पन्नांतून खर्च वजा जातां बरीच शिल्लक उरते, पण तिचा विनियोग खुद्द वऱ्हाडांतल्या लोकांच्या गरजा भागविण्याकडे व्हावयास पाहिजे तो न होतां मध्यप्रांताला त्याचा फायदा मिळतो हा प्रकार रास्त नाहीं. या त्यांच्या भाषणावर नागपूरचे ना. सर बिपिनकृष्ण बोस यांनीं वर्तमानपत्रांतून चर्चात्मक पत्र प्रसिद्ध केलें. या पत्रांत ना. मुधोळकर यांच्या भाषणाचा विपर्यास झालेला होता. वऱ्हाडप्रांत मध्यप्रांताला जोडल्यापासून एकंदरींत वऱ्हाडचाच फायदा विशेष आहे. तेव्हां त्यानें कुरकुरण्याचें कांहीं कारण नाहीं असें भासविण्यांत आले होतें. वऱ्हाड नागपूर हे प्रांत भोसल्यांचे वेळीं व त्याच्याही अगोदरपासून एक होते अशी परंपरा देऊन आतां वऱ्हाड स्वतःस अलिप्त ठेवूं पाहत असेल तर ती त्याची कोती दृष्टि आहे असें ना. सर बि. बोस यांचें ह्मणणें होतें. या पत्राला उत्तर न दिलें तर लोकांत निष्कारण गैरसमज होईल ह्मणून— शुष्कवाद वाढविण्यासाठीं नव्हे—ना. रा. ब. मुधोळकर यांनीं त्या टीकेस उत्तरादाखल पत्र नागपूरच्या 'हितवाद' पत्रांत प्रसिद्ध केलें आहे. आमच्या मतें या उत्तरांत ना. मुधोळकर यांनीं वऱ्हाडची बाजू किती न्यायाची आहे व सर साहेबांनीं निष्कारण मागील इतिहासांतल्या गोष्टींचा संबंध पूर्णपणें भिन्न अशा सध्याच्या परिस्थितीशीं लावण्यांत कशी हातचलाखी केली आहे तें सुंदर व स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे वऱ्हाड प्रांत मध्यप्रांतातल्या खुद्द नागपूर जिल्हा खेरीज करून इतर सर्व जिल्ह्यांपेक्षां विद्येंत व सुधारणेंत पुढें गेलेला आहे. तेव्हां मुंबई इलाख्याला तो न जोडतां मध्यप्रांताला तो जोडला गेल्यानें वऱ्हाडप्रांताच्या सुधारणेची थोडीशी पीछेहाटच झाली आहे. या नुकसानीला आणखी अन्यायाची जोड मिळणें कदापि रास्त ह्मणतां येणार नाहीं. वऱ्हाड प्रांत सधन व सुपीक असल्यामुळें या प्रांताचें उत्पन्न त्याच्या खर्चापेक्षां पुष्कळ अधिक होतें. या शिलकेचा उपयोग त्या प्रांतांतल्या लोकांच्या वाढत्या गरजा भागविण्याकडे होणें हा न्यायाचा व सरळपक्ष आहे. पण तसें घडत नाहीं. शाळेंतून विद्यार्थ्यांची गर्दी झाल्यामुळें ठराविक संख्येच्या पलीकडे विद्यार्थ्यांना मज्जाव करण्यांत येतो. उत्पन्नांतून राहिलेल्या शिलकेचा विनियोग अधिक हायस्कूलें, अधिक दवाखाने, वगैरे लोकोपयोगी कामाकडे न होतां मध्यप्रांताची राजधानी नागपूर शहर—येथें भव्य इमारती वगैरे बांधण्याकडे होऊं लागला, तर तो उद्देश स्थूल दृष्टीनें कितीही स्तुत्य असला, तरी वऱ्हाडच्या लोकांच्या दृष्टीनें अन्यायमूलकच राहील असा ना. रा. ब. मुधोळकर यांच्या उत्तराचा इत्यर्थ आहे. या उत्तरांत ना. मुधोळकर यांनीं वऱ्हाडची बाजू अगदीं निःपक्षपातानें आणि सरळ रीतीनें मांडली आहे आणि तशाच दृष्टीनें तिचा विचार करावयास पाहिजे. शंभर वर्षांपूर्वींची परिस्थिति आज नसतां त्या वेळचा ऐतिहासिक दाखला आजच्या घटकेला देणें ह्मणजे आपली लंगडी बाजू येनकेन प्रकारेण सावरूं पाहण्या सारखें आहे.

## मद्यपानाशीं झुंज.

हिंदुस्थानात मद्यपानाच्या पायीं होत असलेले अनर्थ बंद व्हावे ही सरकारची मनापासूनची इच्छा एका बाजूस व अबकारीचे उत्पन्नाचा मोह दुसऱ्या बाजूस अशी सध्याची स्थिति आहे, व या घोटाळ्यांत मद्यपान बंद करण्यासाठीं जितके नेटानें प्रयत्न सरकारचे हातून व्हावयास पाहिजेत तितके होत नाहींत, अशी सर्वत्र ओरड आहे. राशियानें उत्पन्न बुडण्याची पर्वा न करतां व्होडका नांवाचें मद्य पिण्याच्या लोकांच्या प्रघातास एकदम प्रतिबंध केला त्या पासून राशियाचें उत्पन्न बुडालें, पण त्याचा मोबदला अन्य रीतीनें इतका मिळाला आहे कीं जरी हा प्रतिबंध राशियन सरकारानें युद्धकाळापुरता प्रथम घतला होता, तरी आतां युद्धकाळानंतर ही तो तसाच चालू ठेवण्याचा विचार चालला आहे. मद्यपानानें मनुष्याच्या अंगची कर्तृत्वशक्ति नष्ट होते. अर्थात् शेतकी कारागिरी, व्यापार वगैरे गोष्टींत ती पूर्णत्वानें न दिसल्यानें जामिनीचा सारा, जकाती, वगैरेचें उत्पन्न एरव्हीं झालें असतें तितकें मद्यपान अप्रतिबद्ध रीतीनें चालू असतां होणें अशक्य होतें. अबकारीचें उत्पन्नापेक्षां हें साऱ्याचें व जकातीचें उत्पन्न इतकें अधिक असतें व तें लोकांच्या नैतिक व आर्थिक उत्कर्षापासून प्राप्त झालें असल्यामुळें त्याची योग्यता इतकी श्रेष्ठ आहे कीं त्यापुढें अबकारी उत्पन्न कःपदार्थ आहे अशी राशियाची खात्री होऊन चुकली आहे. हा राशियाचा अनुभव हिंदुस्थानाला अत्यंत बोधप्रद होईल व मद्यपान प्रतिबंधाविषयींची हिंदुस्थान सरकारची इच्छा त्यामुळें दृढतर होऊन मद्यपान सक्तीनें बंद करण्यास त्यांचें मन कचरत आहे, तो दुर्बलपणा नष्ट होईल अशी आह्मी आशा करतों.

## दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा लाभ

या ह्मणीची सत्यता प्रस्तुतच्या युद्धांत पूर्णपणें दिसत आहे. अमेरिका या युरोपियन युद्धाची संधी साधून आपली तुंबडी कशी खचून भरीत आहे तें पुढील माहिती वरून कळेल. १९१४ च्या आगष्टमध्यें ह्मणजे लढाईला सुरुवात झाली तेव्हांपासून तों १९१६ च्या मार्चपर्यंतच्या २० महिन्यांत सुमारें १०॥ कोट डॉलर (१ डॉलर = ३ रुपये १॥ आणा) किंमतीची बंदुकी दारू, ४। कोट डॉ॰ चीं काडतुसें, ३२ लाख डॉ॰ ची स्फोट करणारी दारू, २ कोट डा॰ च्या बंदुकी, मिळून १६ कोट ६९ लक्ष डा॰ ची युद्धसामुग्री अमेरिकेनें लढणाऱ्या राष्ट्रांना विकली. इतर मालही अशाच मोठ्या प्रमाणावर विकला. उदाहरणार्थ, मोटारगाड्या ८ कोट २७ लक्षांच्या, विमानें ७४ लक्षांचीं, मोटारसायकली ३९ लक्षाच्या, तांब्याचा माल ७१ लाखांचा, रबर टायर वगैरे ३ कोट ८८ लाखाच्या, लष्करी पोषाख ५ कोट ७० लाखांचा, घोडे १२ कोट ५३ लाखांचे, खेचरें ३ कोटींचीं!! या व्यापारांत अमेरिकेनें किती कमाई केली असली पाहिजे याची कल्पनाच केली पाहिजे, एकाचें जळतें घर, आणि दुसरा आपली पाठ फुकटांत शेकून घेतो अशी जी ह्मण आहे ती अमेरिकेनें सार्थ करून दाखविली आहे खरी.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—प्रखर ऊन, अती गर्मी व नंतर जोराचा पाऊस यांचें वर्तन अहर्निश चालू आहे. प्लेग वगैरे रोगराई या तडाक्यांत नाहींशा झाल्या व त्या मानानें सार्वजनीक आरोग्याला तेजस्विता येत आहे ही ईश्वरी कृपाच होय.

**मित्रदर्शन**—नामदार राजश्री स्टँडन साहेब कमिशनर हे सध्या आकोल्यास आहेत. परवा ते येथील मित्र समाजांतही चेंडू फळी खेळण्यासाठीं गेले होते. यांच्या सौजन्यानें व हिंदी उमेदींना कार्यक्षेत्र देण्याच्या ईर्षेनें हे आपला काल सुखसंवादाच्या व मित्रभावाच्या गोष्टी करण्यांत घालवितात, हें त्यांच्या सत्यव्रत स्वभावाला विशेष शोभा देते. त्यांचा लाभ येत्या गुरुवार पर्यंत येथील सर्व संस्थाना परोपरीनें होत आहे.

**हितवाद कर्ते** आपला आनंद प्रदर्शित करीत आहेत कीं श्रीमती सौभाग्यवती ताराबाई मोडक बी. ए. यांस उमरावतीच्या स्त्रियांच्या हायस्कुलांत फर्स्ट असिस्टंट नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. जे. के. बॅटन फर्स्ट आडि. ज्युडिशियल कमिशनर हे रजेवरून परत आल्यानंतर रा. रा. ज्योतिषचंद्र मित्र यांस १ वर्षपर्यंत ४ थे आडिशनल ज्युडिशीअल कमिशनर नेमण्यांत आलें.

रा. रा. शहा महमद इषाक हे आकोल्यास तहसिलदार होऊन येथील तहशिल्दार रा. रा. अब्दुल रहीमखां यांची बदली पांढरकवड्याला झाल्याचे गॅझेटांत प्रसिद्ध आहे. पण या नेमणुका पुनः तहकूब झाल्याचें कळतें.

**श्रीगणेशोत्सव**— या महोत्सवांना जें ज्ञानसत्राचें रूप सार्वत्रिकपणें येत चाललें आहे तें विशेष अभिनंदनीय होय. आमच्या येथील राजेश्वर मंदिरांत दररोज सायंकाळीं व्याख्यानें होत असतात आणि श्रोतृ समाजही चांगला जमत असतो. स्थानिक वक्ते आपल्या वाग्देवीचा लाभ देतातच; पण उमरावतीचे लोकनायक राजश्री खापर्डे साहेब व तसेच यवतमाळचे रा. शामराव देशपांडे यांनीं आपल्या सुरस वक्तृत्वानें चांगलीच भर घातली.

**स्थानिक स्वराज्यें**— रा. रा. मोरो बाळकृष्ण परांजपे यांनीं या विषयावर गेल्या ८ दिवसांपूर्वीं जें व्याख्यान दिलें तें हस्तलिखित आहे. आणि त्यांत त्यांनीं म्युनिसिपालिटीच्या भावी सुधारणा संबधानें मोठ्या बहारीनें व धैर्यपूर्ण अशा अनुभवानें आपले विचार जनतेपुढें मांडले आहेत. हीं स्वराज्यें स्थानिक खरीं पण, लोकसत्तात्मक करण्याकडे त्यांच्या रोख विशेष आहे.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १८ माहे सप्टेंबर सन १९१६ ई० [ अंक ३७

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत (ह्या दोन्ही तारखा धरून) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

ज्या अर्जदारांना पूर्वीचे कर्जरोखे बदलून नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा आपला हक्क चालविण्याची इच्छा नसेल त्यांस तो हक्क चालू बाजार भावानें पोस्ट आफिस मार्फत इतरांस विकतां येतो.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के** दा य **कन्व्हर्शन लोन**
**( मोबदल्याचे कर्जा ) साठीं पोस्ट आफिसमार्फत** र्वां व या दिः
करावा. आपल.
**अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट ा सं निदान २ । ३ म टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.

मी ——————————————— अक्षर वाचतां ये[ईल] असें स्वच्छ लिहावें

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं —————— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये —————— / चेकनें रुपये —————— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये —————— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

——————

रोख रकम किती दिली, चेक[ाची] किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें अ[स]लेल्या ठेवींतून काढून कां[ही] रकम दिली असल्यास तो कि[ती] ती त्या रकमा त्याकरित[ां] रिकाम्या सोडलेल्या जागें[त] वेगवेगळ्या नमुद कराव्यात. [जो] मजकूर अनवश्यक असेल [तो] खोडून टाकावा.

एकूण रुपये.......

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फें ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) —————— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर —————— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधींचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा ).

(२) —————— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज —————— —————— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

(अ) किंवा (ब) ह्या दोहों[पैकीं]तून एक पारिग्राफ भरू[न] दुसरा खोडून टाकावा.

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्[शन] लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३[॥] अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिक[ार] देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ——————————————

पत्ता ——————————————

तारीख ——————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ——————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ——————

( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालावयाचा

नो. नं. २४१

हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## नोटीस

नोटिस बेशमी किसन गोपाळ जीतमल मारवाडी दुकान दानापूर ता. आकोट जि. आकोला

यांसः—

नोटिस देणार नारायण सालीग्राम साहू दुकान हिवरखेड ता. आकोट जि. आकोला नोटिस देतो ऐसाजे कीं तुमची तारीख ९-८-१९१६ ची नोटिस ता. १७-८-१६ इसवी रोजीं पोहचली. आपण लिहिले कीं, आह्मापासून रुपये १००० एक हजाराचा कर्जरोखा लिहून घेतला. आणि त्या दस्तैवजापैकीं रुपये १०० शंभर दिले, बाकीचे रुपये ९०० नऊशें तुह्मी दिले नाहींत, असे बेईमान होऊन असें लिहिले. परंतु आह्मी तुह्मास सर्व रकम देऊन तुमच्यापासून दस्तैवज घेतला. आणि तुह्मी दिला, व या शिवाय आमचे मालकीची नारायण हरी रामजी या नांवाची दुकान आहे. त्या दुकानचे आणखी रुपये १००० एक हजार आहेत. व चिल्हर खात्याचे रुपये घेणें वेगळे आहे. वर लिहिलेले दोन्ही दस्तैवजाचे रुपये २००० दोन हजार व त्याचे व्याज व चिल्हर खात्याची रकम व व्याज तुह्मास तुमचे अंगावर व्याज ज्यास्त चढवून घेणे नसेल तर ही नोटिस पावल्यापासून चार दिवसाचे आंत रकम द्यावी. सही तारीख ९-९-१६ इसवी दस्तुर त्रिंबक जानराव हिवरखेड.

सही

नारायण सालीग्रामजी साहू दुकान हिवरखेड ता. आकोट जि. आकोला तर्फे मु. त्रिंबक जानराव

नो० नं० ३३२

---

## जाहिर नोटीस

नोटिस बेशमी बिठोबा वा॥ लालजी बारी रा. खामगांव (बरवार पुरा)

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देते कीं, मी तुह्मास हस्तलिखित व वर्तमानपत्रांतून नोटिस दिली. इतकेंच नव्हे समक्ष घरीं आले तरी आपण स्वीकार करीत नाहीं. या करितां आजपर्यंत मी वाट पाहिली. व आपण दोन बायका करून संसार केला, त्यामुळें माझे जन्माची गैरसोय झाली. या करितां ही नोटिस देते कीं आजपासून १९ दिवसांत मला घेऊन जावे. या प्रमाणें न केल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क माझेवर चालणार नाहीं कळावें. ता. ९-९-१६

सहीची निशानी आंगठा

पार्वती मर्द बिठोबा आडबाल बारी मु. व्याळ ता. बाळापूर हिचा खुद

नो० नं० ३३३

---

## नोटीस

बिस्मिल्लाबी मर्द सेखसुपडू मुसलमान रा० पोष्ट धामणगांव ता. मल्कापूर जि. बुलढाणा हल्लीं राहणार लोणवाडी ता. भुसावळ जि. पूर्व खानदेश

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ता. २३ माहे जून सन १९१६ इ॥ रोजीं वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून नोटिस दिली होती तिचें उत्तर आजपावेतों तूं दिलें नाहीं. व तुला मी निराळे राहण्यास घर दिलें होतें. तें ही घर तूं दुसऱ्यास भाड्यानें दिल्याचें समजते. वरुन तूं मझे जवळ असलेली स्थावर व जंगम मालाची अफरातफर करीत असल्याचे मला कळलें. करितां तूं कशी आहे हे मला समजले, व तूं दुसरे चावट लोकांचे नादीं लागून धामणगांव सोडून लोणवाडीस गेली. करितां आपले जाती रिवाजाप्रमाणें तूं आमचे पंथांत नसून आमचे पासून दूर गेली. माझा चुलता तो तुझा नवरा मरण्यास अजमास ८-१० महिने झाले. त्यापासून तुला कांहीं संतती ही नाहीं. परंतु आपले जातीचे चार पंच लोकांनीं मिळून मला सांगून मी तुला एक वर्षाचा खर्च दिला होता. तो तूं दुसरें लोकांचे नादीं लागून सर्व अफरातफर केला आहे असें मला पूर्ण माहीत झाले वरुन मी दरवर्षी देणारा खर्च तो तुला देणार नाहीं. व माझे जवळ असलेली इष्टेट स्थावर व जंगम यावर तुझा हक्क नाहीं व ती गहाण अगर खेरेदी ही तुला देण्याचा अधिकार नाहीं. अगर कोणी सेठ साहुकार यांनीं माझे इष्टेटीवर तुला कर्ज दिल्यास तो मी मंजूर करणार नाहीं. कारण तुझी एक दुसरी सवत आहे तिचें प्रतिपाळण मी करीत आहे. व तूं मला न विचारतां घर सोडून गेली वरुन मला संशय झाला आहे कीं कोणतेवेळेस काय करशील याचा नेम नाहीं. करितां तूं आपली चालचलन खराब केल्याचे समजले वरुण तुला मी माझे वारसांतून मुक्त केले आहे कळावें. ता. ८-९-१६

सही

सेखवजीर वा। सेखजमाल मुसलमान राहणार पोष्ट धामणगांव ता. मल्कापूर जि. बुलढाणा नि॥ खुद हा. रेव द. राहिमखां वा॥ गुलाबखां मु. रा. धामणगांव

नो० नं० ३३४

---

## नोटीस

रा. लक्ष्मुमण माधोबा जात कानव ब्राह्मण उपनांव चोंडके रा. जनूने तालुके खामगांव

यांसः—

नोटीस देणार सारजी मर्द पुंजाजी कोळी राहणार जनूने तालुके खामगांव कारणें नोटीस देते ऐसीजे का तुह्मीं माझे घर संसाराचा नाश करून अजमास २० वर्षे झालीं साल गुदस्त सालीं मजला भूल थाप दिली कीं माझे मुलीचे लग्न होणें आहे. तूं थोडे दिवस दुसरे कडे राहा. असें सांगून माझे जवळचे नगदी रुपये २०० दोनशे घेतले व शिवाय माझे १०० रुपयांची गाडी रुपये २९ व जोडी रुपये ७६ असे रुपये ३०० दाबून बसले. याजबद्दल मी बरेच वेळां मागणी केली परंतू तुह्मी जनूने येथे सावकारी धंदा करीत असल्यामुळें सर्व गांवकरी लोक तुझे कडून बोलतात मजला कोणीच साक्ष पुरावा होऊं शकत नाहीं. करितां तुह्मी हिंदु धर्मा प्रमाणें चार पंचांत इमान करावे. नाहींतर रुपये ३०० तीनशे नोटीस पावले पासून ८ आठ दिवसांत मजला देऊन माझे सहीची रसीद घेऊन जावी. तसें न केल्यास मी तुझेवर दिवाणी कोर्ट मधें दावा करून हल्ली नोटीस खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेईन करितां नोटिशीनें कळविलें आहे ही नोटीस दिली सही तारीख ७-९-१६ इसवी दस्तुर रामचंद्र बल्लाळ खामगांव

सही.

१ सारजी मर्द पुंजाजी कोळी रा. जनूने तालुके खामगांव इचे हातचा आंगठा.

नो. नं. ३३५

---

## जाहिर नोटीस

नारायण माधो सोनार आडगांव खुर्द ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आज अजमास दीडमहीना झाला कीं तुमचे पासून रुपये १९ पंधरा कर्ज घेण्यासाठीं चार आण्याचा स्टांप कोरा तुमचे स्वाधीन केला. तुह्मी ह्मटले कीं तूं परवाचे दिवशीं येऊन कागद लिहुन देऊन रुपये घेऊन जाणे. तुमचे ह्मटल्या प्रमाणे कागद लिहिण्या करितां आलें. तुह्मी ह्मटले कीं लिहीणार आतांच गेला तूं ऊशीरानें आला तर तूं आतां असें कर कीं या स्टांपावर आंगठा करुन दे मग मी लिहून घेईन व उद्या रुपये देइन ह्या प्रमाणें मी पांच सहा वेळा आले तरी तुह्मी ह्मणाले कीं कागद लिहीला नाहीं. असे मला चकावीता. तरी आतां आठदिवसाचे आंत रुपये द्यावे अगर रुपये न देत असल्यास माझा आंगठा केलेला कोरा कागद माझे स्वाधीन करावा. तरी मजला असे वाटते कीं तुमचे मनांत कांहीं कपट आहे तरी आतां आठ दिवसाचे आंत माझा स्टांप परत द्यावा. तसें न केल्यास तुमचेवर फौजदारी केली जाईल व नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे तारीख ९-९-१६ इसवी.

सही.

१ मारुती वा॥ लक्ष्मण मवजाळ रा. आडगांव खुर्द निशाणी आंगठा

नो. नं ३३६

---

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीशीनें खालीं सही करणार यांजकडून उद्योग वल्द रामजी माळी कुरणखेडक[illegible] इकडे [illegible]ंव मंजू ता० आकोला [illegible] महिन्याचा [illegible]न। [illegible] योग्य [illegible] व सर्व [illegible] त येते कीं

तुह्मांस अजमास तीन महिने झाले माझी सवत जनी मर्द सखाराम इचा व माझा नवऱ्याचे जिनगीसंबंधानें तंटा चालू होता ह्मणून कोर्टांत माझे तर्फे सर्व काम करण्यास तुह्मांस कुलमुखत्यार पत्र दिलें आहे. ते आतां मजला कामाची कांहीं जरुर नसल्यामुळें आज तारखेपासून रद्द केलें आहे. तर आतां तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे मालकीचे तुमचे पाशीं असलेले कागदपत्र आणि कोर्टाचें कामासाठीं धरवर ठेविलेले रुपये २०० दोनशें माझे स्वाधीन करून माझे सहीची पावती घ्यावी व त्याचप्रमाणें तुह्मी कोणापासून कर्ज वगैरे योग्य कामासाठीं व माझे स्वतःकरितां काढलें असल्यास त्याची माझी रुजवात करून द्यावी. शिवाय तुह्मी आजपासून माझे नांवानें कोणतेही कर्ज वगैरे काढण्याचा व्यवहार करू नये. केल्यास त्याचा कोणतेही प्रकारें बोजा मजवर अगर माझे स्थावर जंगम जिनगीवर राहणार नाहीं ही नोटीस दिली. सही मुक्काम आकोला फौजदारी कोर्ट ता० १२-९-१९१६ इ.

सही

सारजा मर्द सखाराम इची नि० आंगठा रा. आळंद रुस्तमाबाद पो० गर्शीटाकळी ता० व जि. आकोला.

नो. नं. ३३७

---

## नोटीस

रा. चंद्रभान वा बिठोबा दारमोडे रा. कदमापूर ता० खामगांव व रा. परभू मोरे रा० कदमापूर ता० खामगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमचे येथें ता० ३-९-१६ इ. रोजीं आलो होतो. व तेथून मी माझे गांवाकडेस परत जाण्यास निघालो त्यावेळेस संध्याकाळ झाली असल्यामुळें तुह्मी मजला परभू मोरे याचें घोडे बसून जाण्याकरितां मागुन आणून दिलें व त्या घोड्यावर मी बसून गावाकडेस परत गेलों व दुसरे दिवशीं सकाळीस घोडे परत केलें असतां तुह्मी उभयतांनी संमनमत करून ते घोडें मी विकत घेतलें अशी खोटीच आफवा उठवून तें घोडें जबर दस्तीनें माझे मस्तकीं मारण्याचा विचार केला. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मी ते घोडे विकत घेतलें नसून फक्त त्या दिवशीं बसून जाण्याकरितां घेतलें होतें. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तें घोडे खावटीचे पैसे देऊन परत घेऊन जावे. तसें न केल्यास त्या घोड्याची मोडतोड किंवा कांहीं नेकीबदी झाल्यास मी जबाबदार नाहीं. घोड्याचे खावटीचे पैसे तुह्मी न दिल्यास तुमचेवर दिवाणींत फिर्याद करून पैसे वसूल करून घेईन. कळावें ही नोटीस दिली सही ता०

सही

सोनाजी तुकाराम रा. तामसी

नो. नं. ३३८ द० खु०

---

## पत्रव्यवहार

### औद्योगिक कमिशन.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. हिंदुस्थान सरकारनें औद्योगिक कमिशन ( Industrial Commission ) नेमून त्या कमिशनचे कामास येत्या आक्टोबरचे पहिल्या तारखेपासून सुरुवात होणार आहे ही गोष्ट आतां बहुतेक सुशिक्षित लोकांस माहीत झाली आहे. या कमिशन करितां सुशिक्षित समाजानें काय करावें याच्या बद्दल फर्ग्यूसन कॉलेजचे प्रोफेसर काळे यांनीं टाईम्स ऑफ इंडियाचे ता० ८ एप्रील १९१६ चे अंकांत सूचना केल्या आहेत त्यांच्याकडे आपल्या वऱ्हाड प्रांतातील सुशिक्षित व लोक नायक ह्मणवून घेणाऱ्या लोकांचें लक्ष्य गेलें आहे असें दिसत नाहीं. गेल्या पंधरा दिवसांत येथील सुशिक्षित लोकांमध्यें राजकीय विषयासंबंधानें बरीच चळवळ उत्पन्न झाली आहे व अकोला व उमरावती येथें नामशेष झालेल्या डिस्ट्रिक्ट कांग्रेस कमिट्यांचें पुनरुज्जीवन करण्याची सुशिक्षित पदवीधरांस जरूरी वाटली आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं "डिस्ट्रिक्ट असोशिएशन्स" स्थापन झाल्या आहेत व एखाद्या ठिकाणीं राजकीय विषयासंबंधानें चर्चा करण्यासाठीं किंवा कांग्रेसनें सुरु केलेल्या राजकीय चळवळी लोकांत सुरू ठेवण्यासाठीं संस्था नसेल तर तेथील लोकांनीं ती अवश्य स्थापून घ्यावी अशा तऱ्हेच्या खटपटी चालल्या आहेत. अशा स्थितींत खालीं लिहिलेल्या सूचनांचा अवश्य विचार व्हावा! व अशा तऱ्हेनें औद्योगिक कमिशन यांस उपयोगी पडून लोकांचेही उपयोगी पडण्याचे श्रेय सदर्हू राजकीय संस्थांनीं घ्यावें.

सदर्हू संस्थांनीं आपल्या वऱ्हाडप्रांतातील लहान मोठ्या सर्व धंद्याच्या स्थितीची, त्यांच्या यशाची किंवा अपयशाची माहिती मिळवावी व स्वतः जाऊन मिळविलेल्या हकीकतीचा व आकड्यांचा फायदा घेऊन स्वतः रिपोर्ट तयार करून व त्यावर आपलें मत देऊन तें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करावें. असल्या रिपोर्टीचा औद्योगिक कमिशनास अतिशय फायदा होईल व आपल्या वऱ्हाडतर्फे साक्ष देण्या करितां जे गृहस्थ जातील त्यांचें कामही सुलभ केल्याचें श्रेय आपल्यास मिळेल.

गेल्या पंचवीस वर्षांत वऱ्हाड नागपूर प्रांतांत बरेच उद्योग धंदे निघाले. त्यापैकीं कांहीं नुसते जिवंत आहेत, कांहीं मृत होऊन त्यांची आठवण ही नाहींशी झाली आहे, व कांहीं थोडे भरभराटीमध्यें आहेत, अशा सर्व धंद्याची अस्सल माहिती मिळवून त्यांचा इतिहास, त्यांची बुडण्याचीं किंवा नाहींशीं होण्याचीं कारणें, कांहीं धंदे चांगले चालले असल्यास ते उत्तम तऱ्हेनें चालण्याची कारणें, कोणते लोक या धंद्यांत होते व आहेत, लोकाश्रयांच्या अभावीं हे धंदे बुडाले कां चालविणारांच्या अप्रामाणिकपणामुळें बुडाले, त्यास सरकारची मदत मिळाली किंवा नाहीं. नसल्यास तिच्या अभावी ते धंदे बुडाले किंवा काय, सुशिक्षित लोकांनीं चांगले धंदे चालविले किंवा अशिक्षित लोकांनीं चालविले, हे धंदे पुरेसे भांडवल न मिळाल्यामुळें बुडाले, किंवा लोकांत चांगले शास्त्रीय ज्ञान नसल्यामुळें बुडाले, कां धंदा करण्याची हातोटी लोकांनीं नसल्यामुळें धंद्यांत बूड आली, कां सरकारची पूर्ण मदत असल्याशिवाय धंदे चालणें अशक्यच आहे, या गोष्टी रिपोर्ट करतांना मुख्य लक्ष्यांत घ्याव्या, तसेच स्वदेशी मालाला चांगली मागणी आहे किंवा नाहीं व तो माल खपण्याकरितां लोकांमध्यें आवड उत्पन्न केली होती किंवा नाहीं या सर्व गोष्टींचा रिपोर्टमध्यें अवश्य विचार करावा.

स्वदेशीची जी लाट १९०६।०७ सालीं होती ती आतां इतकी कां थंडावली आहे. लोकांमध्यें त्यावेळची कळकळ असल्यास तिचा कोणत्या मार्गाकडे विनियोग करावा याचा ही विचार केल्यास वावगें होणार नाहीं.

आपल्या खुद्द वऱ्हाड नागपूर प्रांतांतच पाहिलें तर अकोला येथील "नवीन मिल" मुधोळकर यांचे "वरार आईल वर्क्स," एलिचपूर येथील मॅच फॅक्टरी पुलगांव व नागपूर येथील "स्वदेशी मिल्स" हे चांगले कां चालत नाहींत, व त्यांची कारणें काय आहेत; तसेंच भागवत यांची तेलाची गिरणी व नागपूरच्या व हिंगणघाटच्या कापडाच्या गिरण्या यांची कां भरभराट आहे यांची जर सोपपत्तीक माहिती लोकांपुढें व कमीशन पुढें मांडण्यांत येईल तर ती बरीच बोधप्रद व उपयुक्त होईल, तसेच येथें एवढ्या मोठ्या प्रमाणावर कापसाचे जिनिंग व प्रेसींग चालले असतांना खुद्द वऱ्हाडचे ज्यास रहिवासी ह्मणता येतील ते लोक कां पडत नाहींत त्यांनीं आपलें भांडवल या धंद्यांत घालून देशांतले भांडवल देशांत ठेवण्या करितां कोणती खटपट करावयास पाहिजे याचेंही दिग्दर्शन व्हावें.

या पत्राचा उद्देश इतकाच आहे कीं जे आजमितीला धंदे बुडाले आहेत किंवा चालले आहेत त्यांची माहिती त्या ठिकाणच्या लोकां शिवाय परक्या गांवच्या फारच थोड्या लोकांना माहिती असते व अशा तऱ्हेनें प्रयत्न करून प्रत्येक ठिकाणच्या लोकांनीं मिळविलेली माहिती व दिलेलीं मतें ही जास्त विश्वासास पात्र होतील व हा जो विषय ह्मणजे औद्योगिक धंदे याजकडे हल्लीं लोक ज्या बेफिकीरीनें व निराशेनें पाहतात ती बेफिकीर व निराशा घालवून लोकांचें लक्ष वेधण्यास फार उपयोगी पडतील असें माझें मत आहे.

सरकारनें या बाबतींत पूर्वी माहिती मिळवून रिपोर्ट प्रसिद्ध केले आहेत त्याचा ही फायदा घेण्यांत यावा व हल्लीं चालत असलेल्या धंद्यांखेरीज इतर आणखी दुसरे धंदे निघण्यासारखे असल्यास ते कोणते व ते कोणत्या ठिकाणीं काढावे व सरकारनें त्या संबंधांत काय करावें या चाही या राजकीय चळवळीच्या संस्थांनीं रिपोर्ट करावा. डिस्ट्रीक्ट बोर्डीतील व तालुका बोर्डीत सुशिक्षित असे बरेच लोक आहेत त्यांनीं सुद्धा या पत्राकडे लक्ष देऊन विचार करावा व या दिशेनें उद्योग करण्यास प्रारंभ करावा. आपल्या इकडे कमीशन येण्यास निदान २ । ३ महिन्याचा तरी अवधी लागेल, तेवढ्या अवधींत वऱ्हाडचे लोक आपल्या अंगची कर्तबगारी दाखविण्यास खास माघार घेणार नाहींत अशी आशा आहे.

आकोला
११-९-१६

आपला
त्र्यंबक सिताराम दिघे
वकील.

---

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ७ शके १८३८

### व्हाइसराय साहेबांचें भाषण.

ना. व्हाइसराय लॉर्ड चेम्सफोर्ड यांचें गेल्या आठवड्यांत वरिष्ट कायदेकौंसिलापुढें झालेलें भाषण जरी अतिशय वादग्रस्त मुद्यांनीं परिपूर्ण होतें, तथापि सरकारच्या धोरणाचें यत्किंचित् दिग्दर्शन त्यांत असल्यामुळें व विशेषतः त्यांत सरळपणा, प्रांजलता आणि असंदिग्धता यांच्या बरोबर कित्येक विचार करण्यासारख्या सूचना असल्यामुळें आह्मी त्या भाषणाचें अभिनंदन करतों. लॉर्ड हार्डिंज सारखे हिंदी लोकांचें ह्रद्गत पूर्णपणें ओळखून त्यांच्या भावनाशीं स्वतःचें पूर्ण तादात्म्य करून घेणारे व्हाइसराय सततं लाभणें ही दैवाधीनचीच गोष्ट आहे. तसें भाग्य सतत लाभण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आहे या स्थितींत समाधान मानूनच नामदार साहेबांच्या उद्गारांचा विचार करणें हा शहाणपणाचा मार्ग आहे. हिंदुस्थानच्या राजनिष्ठेची दृढता आमच्या नव्या व्हाइसरायसाहेबांना पूर्णपणें पटली आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. बंगालच्या स्थितीमुळें अधिकाऱ्यांच्या मनांत काळजी उत्पन्न झालेली दिसते व तेथें जी काय अराजकता आहे ती नाहींशीं करण्याचे कामीं सरकार योग्य मार्गानें लोकांच्या पुढाऱ्यांची मदत घेईल तर ती देण्यास ते कधीं ही माघार घेणार नाहींत अशी आमची खात्री आहे. सरकारनें पुढाऱ्यांवर विश्वास ठेवूनच हें कार्य साधलें पाहिजे. पंजाबची स्थिति सुधारली आहे हें ऐकून कोणाला ही समाधानच वाटेल. युद्ध संपल्याबरोबर पंजाबाला हायकोर्ट मिळणार आहे. मेसोपोटेमियांत घडलेल्या प्रकारावरून इंग्रजी पत्रांतून जी कडक टीका आली आहे तिच्यावरून पाहतां कोणाच्या तरी हातून ढोबळ चुका खास घडल्या असाव्यात असें दिसतें. आतां चौकशीसाठीं कमिशन नेमिलें गेलेंच आहे, तेव्हां खरा प्रकार बाहेर येईलच. या युद्धामुळें पुष्कळ हिंदी लोकांना रिक्रूट ह्मणून सैन्यांत भरती होण्याची संधी मिळाली व त्याचप्रमाणें सैन्याच्या निरनिराळ्या शाखांतून व्यवस्था उत्तम तऱ्हेची राखण्यांत प्रगति व दक्षता दिसून आली याबद्दल नामदार साहेबांनीं प्रदर्शित केलेला संतोष योग्य होता. यावेळीं हिंदुस्थाननें राजनिष्ठापूर्वक केलेलें साह्य त्यांना अभिमानास्पद आहे असे उद्गार व्हाइसराय साहेबांसारख्या पूर्णपणें जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांनीं कढल्यावर तरी कराचीचा विशिष्ट आंग्लो-इंडियन कंपू स्वस्थ बसेल अशी आह्मी उमेद बाळगतों. युद्धाच्या गोष्टीशिवाय इतर ही अनेक महत्त्वाचे मुद्दे त्यांच्या भाषणांत होते. सरकारनियुक्त मेंबरांच्या जागा वरिष्ट कौंसिलांत थोड्या आहेत या बद्दल ना० साहेबांनीं खेद प्रदर्शित केला. असा खेद त्यांना कां वाटावा तें कळत नाहीं. सरकारनियुक्त सभासद सगळे होशीं हो लावणारे असतात असें ह्मणणें मूर्खपणाचें आहे. तसें लोकांचें हित व सरकारचें हित यांच्यांत विरोध आहे असें मानणें हें ही असमंजसपणाचें आहे. वस्तुतः इंग्लंड सारख्या देशांत लोकमताला जो मान आहे त्याच्या मानानें हिंदुस्थानांत शतांश ही नाहीं. लोकमत दृढ करण्याकडे सरकारची प्रवृत्ति असावी ह्मणून तर मॉर्ले—मिंटोचें सुधारणेचें तत्त्व अंमलांत आलें. हल्लीं ज्या मंदगतीनें लोकमताला दृढता येत आहे त्या गतीनें हिंदुस्थानचें लोकमत विलायतेंतल्या इतकें दृढ होण्याला एक शतक तरी लागेल. असें असतां इतक्यांतच लोकमताशीं सरकारी मताची स्पर्धा लावूं पाहणें हें प्रगतीला हितावह होणार नाहीं. १९१४ च्या मार्च महिन्यांत फौजदारी कायद्याच्या सुधारणेच्या बिलाला लोकमताकडून विरोध करण्यांत आला व पुढें लढाई सुरू झाल्यामुळें तें बिल माघारी घेण्यांत आलें. तें पुनः कोणत्या स्वरूपांत परत कौंसिलापुढें आणावें याचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमावी असें नामदार साहेब ह्मणाले. यावर लोकांचें इतकेंच ह्मणणें आहे कीं कमिटी नेमावयाची तर नेमा, पण तींत हिंदी कायदेपंडित बरेचसे असूं द्या व बिलाचें स्वरूप निश्चित झाल्यावर त्यावर चर्चा करण्याची लोकांना संधी द्या ह्मणजे झालें. मुदतबंदी मजुरासंबंधानें नामदार साहेबांनीं जें धोरण सूचित केलें आहे तें लोकांच्या प्रशंसेला पात्र होईल असें आह्मांस वाटत नाहीं. मुदतबंदी कराराचें तत्त्वच मुळीं विचारी माणसाला—स्वातंत्र्यप्रिय माणसाला—पसंत होण्यासारखें नाहीं. नामदार साहेब सुचवितात कीं स्टेट सेटलमेंट व मलाया येथें ज्या पद्धतीनें मजूर नेऊं देतात ती पद्धति अंमलांत आणावी. ह्मणजे मजुराला तेथली वागवणूक पसंत न पडल्यास त्यानें एक महिन्याची नोटीस देऊन नौकरी सोडावी. आह्मी ह्मणतों कीं हिंदुस्थानांतल्या मजुरांसाठींच विशेष शर्ती घालण्याचें कारण काय आहे? ज्या शर्तीवर ब्रिटिश साम्राज्यांतल्या इतर भागांतून तिकडे मजूर जाऊं दिले जातात, त्याच शर्ती हिंदी मजुरांना लाविल्या ह्मणजे वादच तुटला. वसाहतवाले हिंदी मजुरांना इतर ब्रिटिश प्रजेचे हक्क देण्यास तयार असतील तरच त्यांना इकडून मजूर नेऊं द्यावे ही शर्त सर्वांना सोईस्कर व हिंदुस्थानाला ही अपमान व उपमर्द यांचे पासून बचावणारी ३ प्रांतिक आणि हिंदुस्थान सरकार खुद्द उत्पन्नाची व्यवस्था लावण्याची

असावी असाही एक मुद्दा नामदार साहेबांच्या भाषणांत होता. पण ही सूचना किती हानिकारक होणार आहे याचा लोकांच्या दृष्टीनें विचार करण्यांत आलेला दिसत नाहीं. या व्यवस्थेनें प्रांतिक सरकार लोकांना हल्लीं जबाबदार नाहींतच, पण यापुढें हिंदुस्थान सरकारला ही ते जबाबदार रहणार नाहीं. युद्धानंतर शत्रूला या देशांत आपला व्यापार फैलावूं देण्यास प्रतिबंध व्हावा या सरकारच्या सादिच्छेला लोकमताचें पूर्ण पाठबळ आहे हें सांगावयास नकोच. स्त्रीशिक्षण व आंधळ्या मुक्याचें शिक्षण यांकडे सरकारचें लक्ष गेलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण त्या बरोबरच इतर अवयवांनीं पंगु असलेल्या असंख्य लोकांच्या व कोणतें ही व्यंग नसतां ही केवळ गरिबीमुळें अज्ञानांत लोळावें लागत आहे अशांच्या शिक्षणासंबंधानें सरकार काय विचार करीत आहे त्याचा ही उल्लेख व्हावयास पाहिजे होता. शेतकी खात्याकडून प्रयोगक्षेत्रांचें जाळें देशभर पसरलें जाऊन शेतकी शाळा व शेतकी कॉलेजें यांतून शिकून तयार झालेलीं शेतकऱ्यांचीं मुलें देशांत सर्वत्र दिसूं लागतील, सुधारलेल्या आउतांचा उपयोग करण्यास शेतकरी शिकतील, शास्त्रीय कृषिकर्माचें महत्त्व लोकांना कळेल, आणि रासायनिक खतें इकडे तयार होऊन स्वस्त मिळूं लागतील तेव्हां शेतकींची उन्नति होईल. यांपैकीं कोणकोणत्या गोष्टी किती प्रमाणानें नामदार साहेब आपल्या कारकीर्दींत करून दाखवितात तें पहाणें आहे. तूर्त शेतसुधारणेकडे त्यांचें लक्ष आहे इतकेंच म्हटलें पाहिजे. पब्लिक वर्क्स खात्याच्या व्यवस्थेंत बरीच उलथापालथ व्हावयाचें ठरलें आहे. लोकांवर सोपवितां येण्यासारखीं पुष्कळ कामें या खात्याकडून सरकार करवून घेतें, व त्यामुळें लोकांना आपली कर्तृत्वशक्ति दाखविण्याची संधी मिळत नाहीं अशी तक्रार नुकतीच सर राजेंद्रनाथ मुकर्जी यांनीं केली होती, तिचा हा परिणाम असेल असें दिसतें. युद्धामुळें शिक्षणावरचा खर्च सरकारला कमी करावा लागत आहे या बद्दल नामदार साहेबांनीं खेद प्रदर्शित केला. तथापि नवीन स्थापन होणाऱ्या युनिव्हर्सिट्या हे सरकारच्या उत्तेजनाचेंच फळ आहे असें ही त्यांनीं सुचविलें. यावर आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं शिक्षणावरचा खर्च कोणत्याही कारणामुळें कमी करणें या काटकसरीनें होणाऱ्या थोड्याशा फायद्याच्या मानानें पाहतां लोकांना अज्ञानांत ठेविल्यामुळें होणारी हानि फारच मोठी आहे. तेव्हां बाकी कोणत्याही खर्चाला कातरी लाविली तरी हरकत नाहीं, पण शिक्षणाप्रीत्यर्थ अमुक एक रकम खर्च करावयाची हा युद्धाच्या पूर्वीं केलेला संकल्प सरकारनें सध्याच्या वेळीं ही पूर्ण करावयास पाहिजे होता. सारांश, नामदार साहेबांच्या या पहिल्या जाहिर भाषणानें कारकीर्दीसंबंधाच्या लोकांच्या समजुतीवर बराच नवा प्रकाश पडला आहे, ना. साहेबांच्या कारकीर्दीचें धोरण अंतरी समजून आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## मुदतबंदी मजुरी.

मुदतबंदी मजुरीची पद्धत बंद करण्याचा सरकारचा विचार आहे ही गोष्ट जाहिर होऊन कित्येक महिने लोटले तरी सरकारनें याबद्दल काय नक्की तजवीज करण्याचें योजिलें आहे त्याबद्दल कांहींच कळत नाहीं. या बाबतींत जितकी ज्यास्त दिरंगाई होईल तितकी वसाहतवाल्यांची दांडगाई अधिक होईल असा रंग दिसतो. कारण, मुदतबंदीची व्यवस्था बंद न व्हावी अशा प्रकारची चळवळ सुरू करण्यास मळेवाल्यांना अधिक काळ मिळेल. मुंबईच्या क्रॉनिकल पत्रांत फिजी बेटांतल्या एका माणसाचें पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यांत वर्णिलेली स्थिति खरी असेल तर वर दर्शविलेली भीती खरी होण्यास आतांच प्रारंभ होऊं लागला आहे असें म्हणावें लागेल. फिजी बेटांतल्या मळेवाल्यांनीं ही मुदतबंदीची व्यवस्था आणखी पांच वर्षें तरी निदान चालावी अशा बद्दल चळवळ सुरू झाली असल्याचें सदर लेखक म्हणतो. ही बातमी खरी असेल तर मुदतबंदी एकदम बंद न करतां दिरंगाईवर टाकल्यानें या चळवळीला जोर मिळून पांचच नव्हे तर कदाचित् दहावीस वर्षें सुद्धां हिंदुस्थान सरकारचा स्तुत्य उद्देश नुसता कागदावर राहून हिंदी मजुरांचीं दुःखें मात्र कायम होऊन बसण्याची भीती वाटते.

---

## आंकडेशास्त्राचें महत्त्व.

जीं शास्त्रें पाश्चात्य देशांतून बरींच परिणतावस्था पावून तेथील विद्वानांकरवीं देशाच्या स्थितीचें यथार्थ ज्ञान करून देत आहेत, त्या शास्त्रांचा परिचय आमच्या इकडे विद्वान् मंडळी नुकता कोठें करून घेऊं लागली आहे. हिंदुस्थान विषयक अर्थशास्त्राच्या अध्ययनावर जोर देण्याची शिफारस न्या. मू. रानडे यांनीं पंचवीस वर्षांपूर्वीं केली होती. ती आतां कोठें अंमलांत येऊं पाहत आहे व प्रत्येक युनिव्हर्सिटींतून एकॉनॉमिक्स या विषयाकडे अधिक लक्ष देण्यांत येऊं लागलें आहे. अलाहाबाद युनिव्हर्सिटीमार्फत सदर विषयावर एक त्रैमासिकही प्रसिद्ध होऊं लागलें असून प्रत्येक फर्स्ट क्लास कॉलेजांत या विषयाचा प्रोफेसर नेमिला जात आहे. आंकडे शास्त्रांत निपुण असे प. वा. नामदार गणेश व्यंकटेश जोशी हे एकटेच महाराष्ट्रीय होऊन गेले. त्यांच्या खालोखाल प. वा. नामदार गोखले झाले, व विद्यमान पुढाऱ्यांत ना. मि. वाच्छा हे एक आहेत. तथापि पुष्कळांना अद्याप या शास्त्राचा गंधही नाहीं. खानेसुमारीच्या किंवा सरकारच्या प्रत्येक खात्याच्या रिपोर्टावरून देशस्थितीविषयीं व समाज स्थितीविषयीं बिनचूक सिद्धांत कसे काढावे ती विद्या बहुतेक अज्ञातच आहे. पण ज्यांना त्या विद्येची एकदा माहिती होऊन गोडी लागली आहे ते आंकड्यांच्या साह्यानें समाजस्थितीचें कसें यथार्थ चित्र पुढें मांडतात तें खरोखर पाहण्यासारखें असतें. उदाहरणार्थ, जन्ममृत्यूंची संख्या व्या व त्या संबंधाचें पुढील कोष्टक किती महत्वाचें आहे तें पहा—

| प्रांत | मृत्यु | जन्म | मृत मुलें |
|---|---|---|---|
| | (दर हजारी) | | |
| संयुक्त प्रांत | ४३.४ | ३०.०४ | २०९ |
| मुंबइ | ३७.१० | २६.१२ | १७२ |
| मद्रास | ३१.९ | ३१.९७ | १८६ |
| बंगाल | ३१.८ | ३२.८ | २१८ |
| बहार | ४०.४ | ३२.२ | १८९ |
| आसाम | ३३.६ | ३०.८ | २०१ |
| मध्यप्रदेश व वऱ्हाड | ४७.९ | ३९.९ | २९९ |
| पंजाब | ४३.६ | ३६.३ | १८८ |
| दिल्ली | ४८.३ | २९.२ | २२० |

या वरून दिल्ली व पंजाब यांत मृत्यूंचें प्रमाण दर हजारी सर्वांत ज्यास्त व मद्रासेंत सर्वांत कमी दिसतें. मृत्यूंच्या प्रमाणापेक्षां जन्माचें प्रमाण जेथें ज्यास्त तो देश अधिक आरोग्यकारक असला पाहिजे. या दृष्टीनें दिल्ली व पंजाब यांचा नंबर सर्वांत खालीं लागला पाहिजे. कारण तेथें मृत्यूचें प्रमाण ज्यास्त आहे. पण लोकांत कशी उलटी समजूत आहे पहा! लोक समजतात कीं, पंजाबी लोक सर्वांत अधिक निरोगी आणि सदृढ! उलट बंगाली लोक दुबळे आणि अशक्त अशी समजूत आहे, पण तेथेंच हिंदुस्थानांतल्या इतर सर्व प्रांतापेक्षां जन्माचें प्रमाण अधिक आहे!

---

## महायुद्धाची प्रगति.

सध्या बाल्कन रणक्षेत्राला लष्करी व राजकारणी अशा दोन्ही दृष्टींनीं महत्व आहे. रुमानिया दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें प्रस्तुत युद्धांत पडल्यापासून जर्मनी, आस्ट्रिया व बलगेरिया यांचें धाबें विशेषच दणाणलें असलें पाहिजे. हीं राष्ट्रें रुमानियावर चिडतील यांत कोणालाही आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण, रुमानिया युद्धांत पडल्यामुळें रशियाला जितका अधिक जोर आला, तितकेंच आस्ट्रियाहंगेरीचें धैर्य खचलें. रुमानियानें थोड्याच काळांत आस्ट्रियाच्या मुलखांत कशी धामधूम मांडली आहे तें सर्वश्रुतच आहे. इतक्या लवकर रुमानिया युद्धांत आपला प्रभाव दाखवील अशी अपेक्षा नव्हती. त्यांनीं थोड्या अवकाशांत ट्रान्सिल्वहानिया व बनात प्रांत यांच्या सगळ्या खिंडी रोखून धरल्या आहेत. इतकेंच नाहीं तर हंगेरीमध्यें आंत सुमारें २९ मैल पर्यंत प्रवेश केला असून आस्ट्रियन सैन्याचा त्यांच्यापुढें बिलकुल टिकाव लागत नाहीं. रुमानियाचा पराक्रम पाहून सार्वियाला पुनः नवा आवेश आला आहे. त्यांचे घोडेस्वार ग्रीसमध्यें शिरून पाहतात तों बल्गेरियन फौजेनें ग्रीसमधून पलायन केलेलें त्यांना आढळून आलें. ग्रीसची स्थिति तर अगदीं विलक्षण नाटकांतल्या सारखी झाली आहे. तेथील राजा पळून गेला अशी मागें बातमी होती. आतां असें कळतें कीं, तो जरी गेला तरी त्यानें मागें आपलें राज्य युवराजाचे स्वाधीन करून तूं झेमिस व वेने झुलॅस या उभयतांच्या सल्लयानें वाग असा अखेरचा उपदेश मुलाला केला असल्याची बातमी आहे. या बातमीवर एकाएकी श्रद्धा बसत नाहीं. कारण युवराजाच्या मनाचा ओढा त्याच्या बापापेक्षांही ज्यास्त प्रमाणांत जर्मनीकडे आहे व व्हेनेझुलास तर उघड उघड बंडखोर ठरलेला मनुष्य! त्याच्या सल्लयानें वागण्यास युवराज तयार होणार कसा तें कळत नाहीं. ही बातमी खरी असण्याचा संभव येवढाच दिसतो कीं, ग्रीसमधल्या सैन्याची अरेरावी आतां थंडावली आहे, व अलीकडे घडलेल्या गोष्टीमुळें राजाचें व युवराजाचें भणभणलेलें डोकें कदाचित ठिकाणावर आलें असेल. तीस ब्रिटिश व फ्रेंच लढाऊ जहाजांचे पिरियस येथें येऊन उतरणें व सालोनिका, व्होडेना वगैरे चार ठिकाणच्या ग्रीक शिबंदीला व्हेनेझुलासच्या पक्षाला मुकाट्यानें मान द्यावा लागणें यांत खास कांहीं तरी गूढ असलें पाहिजे.

---

## पश्चिम रणक्षेत्र.

ब्रिटिश सैन्याच्या सरहद्दीकडच्या स्थितींत विशेष फरक पडलेला नाहीं. दोन्ही पक्षांकडून तोफांचा भडिमार करण्याची शिकस्त चालली आहे. गिन्चिीच्या आग्नेयीकडच्या शत्रूच्या खंदकावर इंग्रजांनीं हल्ला केला व कांहीं लोकांना मारलें. व्हर्डुनकडे फ्रेंच लोकांनीं कांहीं मुलुख परत घेतला, तो त्याला परत द्यावयाचा नाहीं या निश्चयानें जर्मनी खूप भांडला, पण फ्रेंच आपला निग्रह सोडीत नाहींत. थिऊमाँटकडे ही फ्रेंचांचें पाऊल पुढेंच आहे.

---

## पूर्व रणक्षेत्र.

रशियन फौजा द्विन्स्कच्या उत्तरेकडच्या ठाण्यांपर्यंत जाऊन पोंचले आहेत; इतकेंच नाहीं तर द्वीना नदी उतरून त्यांनीं शत्रूचीं कांहीं ठाणीं ही हस्तगत केलीं आहेत. हालिक्झ पाशीं फार जंगी निकराची लढाई झाली. तेथें रशियनांचा अपूर्व पराक्रम पाहून शत्रूंनीं रणांतून पलायन केलें. पण तें करण्यापूर्वीं त्यांनीं नीस्तर नदीवरच्या पुलाचा नाश करून टाकला. व त्याचप्रमाणें हालिक्झ येथील किल्यांचा ही नाश केला; त्यांना आग लाविली. या ठिकाणीं रशियनांच्या हातीं ५६०० कैदी लागले. त्यांतले ३००० जर्मन व ६९० तुर्क आहेत. कार्पेथियन पर्वतांतून रशियन लोक बिनहरकत आक्रमण करीत चालले आहेत. आस्ट्रियन लोक ब्रिकाहून माघार घेत आहेत. मुशच्या वायव्येस ही रशियनांची प्रगति आहे. तेथें रशियन व इंग्रज या दोघांनीं तुर्कांचा पिच्छा पुरविला आहे.

---

## इतर बातम्या.

युद्धाच्या सध्याच्या रंगावरून आगष्ट १९१७ च्या आंत युद्धाचा अखेरचा निकाल होईल असें जनरल ब्रुसिलॉफ यांचें मत झालें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

अन्नाचा पुरवठा करणाऱ्या खात्यावरील मुख्य जर्मन आफिसर हर वॉन बँटोकी ह्मणतात कीं अन्नाचा तुटवडा आल्यामुळें जर्मन शिपायाला रोज दिल्या जाणाऱ्या अन्नाचें प्रमाण निंमें करण्यांत आलें आहे.

तुर्क सरकारानें लष्करी नौकरीची वयोमर्यादा ५५ व्या वर्षापर्यंत वाढविली आहे.

मि. लॉइड जॉर्ज हे व्हर्डुनला गेले आहेत. व्हर्डुनचें रक्षण करणाऱ्या शिपाई बहाद्दरांनीं दाखविलेल्या चिकाटीमुळें फ्रान्सचेंच नव्हे तर एकंदर मनुष्य जातीचें रक्षण केलें असें उद्गार मि. जॉर्ज यांनीं नुकतेच काढले.

## क्षयरोग आणि समाजसुधारणा.

ता. १० च्या इंडियन सोशल रिफॉर्मर पत्रांत या विषयावर एक लेख आला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं गेल्या पंचवीस वर्षांत प्रत्येक समाजसुधारणेला शास्त्रवचनाचा पाठिंबा आहे हें दाखविण्याचा यत्न झाला, पण तो निष्फळ झाला, तेव्हां आरोग्यशास्त्र वगैरे भौतिक शास्त्रांच्या आधारें समाजसुधारणेचा उपदेश करण्यांत येऊं लागला आहे. शास्त्रांचे आधार दाखविण्याची खटपट फुकट गेली हा कबुलीजबाब सुधारणावादी पत्राकडून आतां येत आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. ज्या सुधारकांची शास्त्रवचनावर श्रद्धा नाहीं त्यांनीं लोकांना मोह पाडण्यासाठीं त्या खटपटींत पडणें हाच मुळीं अप्रामाणिकपणा किंवा स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीशीं केलेला द्रोह आहे. तो करण्याचें पाप आपल्या माथीं सुधारकांनीं अगोदर कां घ्यावें तें कळत नाहीं. आतां ही मंडळी आरोग्यशास्त्राचा आधार शोधूं लागली आहे. आह्मी समाज सुधारणेच्या बिलकुल विरुद्ध नाहीं. ती व्हावयास पाहिजे आहे व झाल्याशिवाय राहणार नाहीं, न झाल्यास आमचा समाज नष्ट होईल असें ह्मणणाऱ्यापैकींच आहों. पण आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ वडाची साल पिंपळाला लावून लोकांत कसा तरी सुधारणेचा प्रसार करूं पाहणें हा मार्ग आह्मास अगदीं नापसंत आहे. लोकांची खात्री पटविण्याच्या प्रामाणिकपणाचे मार्ग थोडथोडके नाहींत. ते न स्वीकारतां अप्रमाणिकपणानें बुद्धिवाद करणारांच्या नशीबीं अपेशच यावयाचें अशी आमची दृढ समजूत आहे. स्त्रियांना पडद्यांत ठेवणें वाईट आहे, स्त्रियांत दुर्बलता व क्षय यांची वाढ होत आहेत, व अर्भकें अल्पायु होत आहेत ही शोचनीय स्थिति आह्मांस दिसत नाहीं असें नाहीं. पण समाजसुधारणा न स्वीकारल्यामुळें क्षयरोगाचा प्रसार होत आहे हें तत्त्व आह्मांस मान्य नाहीं. उल्ट समाजसुधारणेच्या नांवाखालीं हल्लीं जे चोंचले आमच्या स्त्रीसमाजांत प्रविष्ट होत आहेत ते या हानीच्या मुळाशीं आहेत असें आह्मांस वाटतें. सोशल रिफार्मर पत्रकर्ते डॉ० ल्यांकेस्टर नांवाच्या एका परदेशी शास्त्रज्ञाच्या विधानावर अंधश्रद्धा ठेवून असें ह्मणतात कीं अविभक्त कुटुंब पद्धति या हानीच्या मुळाशीं आहे. आमच्या मतें खरा प्रकार अगदीं उलट आहे. अविभक्त कुटुंबपद्धतीनें अर्थात् जुन्या गरीबीच्या साध्या राहणीनें राहणाऱ्या कुटुंबांत क्षयरोगाचें प्रमाण कमी आहे. उल्ट नवरा व बायको असे दोघेच जेथें स्वतंत्र राहत आहेत अशा कुटुंबांत स्त्रियांना ऐदीपणानें राहण्याची संवय लागते, मोलानें सगळी कामें दिल्यामुळें पाणी आणण्यास, किंवा धुणी धुण्यास नदीवर जावें लागत नाहीं, चहापान, नाटकें पाहणें, कामोत्तेजक कादंबऱ्या वगैरे वाचणें वगैरे गोष्टींची संवय लागते, आत्मसंयमन बारंवार भंग पावतें, वगैरे प्रकार घडतात, आणि हे क्षयरोग आणण्यास कारण होतात. अविभक्त कुटुंबांत सर्वांच्या बरोबर घरांतलीं कामें करावीं लागल्यामुळें शारीरिक व्यायाम घडून आत्मसयमन अधिक व्यवस्थेनें पाळणें भाग पडतें, अर्थात् स्त्रीपुरुषांच्या शक्तीची हानि कमी प्रमाणांत होते हा सर्वांचा अनुभव आहे. असें असतां जेव्हां सुधारणावादी उलट भासविण्याचा प्रयत्न करतात, तेव्हां ते अप्रामाणिक किंवा भोळे तरी असले पाहिजेत असें ह्मणण्याची पाळी येते.

## सद्विद्यार्थी संघ.

गेल्या बुधवारीं येथील हायस्कुलांत रा. रा. आर. ए. बी. चॅपमन यांच्या यशस्वी हातानें आकोल्यास हा संघ प्रस्थापित झाला. येथील हायस्कुलांतील सुमारें २० विद्यार्थ्यांनीं या संघाच्या सुंदर अभिवचनांचा उच्चार करून संघाचे सभासद झाल्याची शपथ घेतली थोड्या दिवसापूर्वीं आह्मी विद्यार्थी चमू संबंधानें होणाऱ्या या नव्या क्रांतीचें अभिनंदन पूर्वींच केलेलें आहे. या बुधवारच्या समारंभासाठीं हायस्कुलांत नामदार स्टँडन साहेब, राजश्री डिक्स्, राजश्री जठार साहेब रावबहादूर केळकर आदि करून थोर थोर गृहस्थ जमले होते. हा संघ स्थापन करतांना राजश्री चॅपमन साहेबांनीं जें संभाषण केलें तें फार प्रेमळ अंतःकरणाचें असून विचारोद्दीपक असें होतें विद्यार्थ्यांनींच काय किंबहुना सर्व लोकांनीं या जगाच्या संसाराकडे आनंदी दृष्टीनें कसें पहाण्यास शिकावें हें सांगतांना त्यांनीं मनाचा आरसा स्वच्छ व प्रसन्न ठेवण्याची गुरुकिल्ली सांगितली. त्या समयाला नामदार स्टँडन साहेब व राजश्री जठार व राजश्री रामभाऊ महाजनी, नाना साहेब डांगे व जोशी मास्तर यांनीं ही या संघाचा चित्रपट इतका सुंदर रेखाटला आहे कीं विद्यार्थी जनांची भावितव्यता खरोखरच फार मनोहर, भव्य व रमणीय अशी डोळ्यापुढें उभी राहते. राजश्री चॅपमन यांनीं या स्वयंप्रेरित व स्फूर्तिदायक सत्कार्याची जी उठावणी आरंभिली आहे ती त्यांच्या मनोराज्यांतून इतकी मूर्तिमंत व दृश्य होत चालली आहे हें पाहून आह्मी त्यांचें मनोमय स्वागत करितों. आणि आमच्या आमदानींत ज्या गोष्टी आकांक्षेच्या कक्षेंत होत्या त्या आमच्या तरुण विद्यार्थी जनांना दृश्य स्वरूपानें अनुभवण्यास मिळतील असा आमच्या मनाला या प्रस्तुतच्या संघामध्यें नव्या बीजशक्तीचा जोम दिसतो. या संघाचे उद्देश इतके सुंदर आहेत कीं आह्माला तर असा भास होतो कीं गुरुगृहीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपनयनाच्या समयाचाच हा ब्रह्मोपदेश होय.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— एकंदर ३६ इंच पर्जन्यानंतर उत्तरा नक्षत्रानें जें अवर्षण केलें त्यानें फारच बहार झाली. शेतीचीं पीकें पुनः चांगलीं लाभण्याची आशा उत्पन्न केली. रोगराई ही पावसानें वाहून नेऊन आरोग्य संपदा वाढीस लाविली आहे. सायंकाळचें रंगीत व चित्रित पश्चिम क्षितिज व पूर्वेकडील इंद्रधनुष्यें हीं प्रस्तुतचें हवामान अधिक दिवस टिकेल असा भरंवसा देतात.

**इंडीयन बहादूर सर्कस**— कंपनीचे खेळ येथें टेंपल बगीचांत चालू असून हत्ती घोड्यांच्या खेळापेक्षां ही मनुष्यांच्या कसरतीची प्रेक्षक मंडळी फारच वाहवा करीत असतात, हें शोकी व हौशी लोकांस आह्मी मुद्दाम सुचवितों.

रा. रा. एफ. डब्ल्यु ट्विडेल एम. बी. यांस बुलढाणा जिल्ह्याचे सिव्हील सर्जन नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. रामनारायण त्रिवेदी सबजज्य फर्स्ट ग्रेड खामगांव यांस हुशंगाबाद येथें पुढील महिन्या पासून डिस्ट्रिक्ट जज्य नेमण्यांत आलें आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. राजश्री त्रिवेदी हे निस्पृह व बाणेदार असून चांगले कायदेपंडित आहेत. त्यांच्या चांगल्या कामगिरीमुळें त्यांस आकोल्याप्रमाणें खामगांवासही लोक फार फार चाहतात.

रा. रा. रामराव माधव वाठोडकर सबजज्य यवतमाळ यांस खामगांव कोर्टावर बदलण्यांत आलें आणि रा. रा. कृष्ण गोपाळ खांडेकर सबजज्य यांची रजा संपल्यामुळें त्यांस यवतमाळ येथें नेमण्यांत आलें.

रा. रा. रुस्तुमजी फर्दुमजी डिपटी कामिशनर रायपूर यांस येत्या महिन्याच्या २१ तारखेपासून १॥ महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे.

खान बहादुर हाफीज महमद वलायतुल्ला एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर आकोला यांस ६ महिन्यांची हक्काची व आजारीपणाची रजा मिळाली आहे. आणि ते या महिना अखेर रजेवर जातील. खानबहादूर साहेबांच्या कामाची उत्कृष्ट पद्धती विशेष अनुकरणीय आहे. लहान मोठीं सरकारी कामें हे प्रसन्न मुद्रेनें करतात. त्यांच्या न्यायदानांत दयेचा अंश जागृत असतो, यांच्या पवित्र वर्तनांत काव्यरसाची झांक चांगली खुलते.

## नोटीस

स. स. नंबर १६ सन १९१६

चौ० ता० ११।११।१९१६

विद्यमान सिनिअर सबजज्ज साहेब बाहादूर आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार

(१) दुलबी मर्द शेख यासीन (२) उमरावबी मर्द शेख यासीन मुसल्मान रा० बाळापूर ता मजकूर जि० आकोला.

या नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यांनीं मैत शेखयासीन वा। शेखइमाम मुसल्मान राहणार बाळापूर याचे लोकांकडून घेणें असलेले कर्ज वसूल करण्यासाठीं सकसेशन सर्टीफिकीट मिळण्याबद्दल कि० अर्ज नंबर १६ सन १९१६ चा कोर्टांत ता. १०-८-१९१६ इ० रोजीं दाखल केला आहे. त्या अर्जाची सुनावणीची ता. ११-११-१९१६ इ० ची नेमली आहे. त्या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर वकीला मार्फत आपला लेखी जबाब वरील तारखेस या कोर्टांत दाखल करावा. याप्रमाणें न केल्यास अर्जदारांस वरील तारखेला सार्टीफिकीट दिलें जाईल. व मग पुढें या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकली जाणार नाहीं.

सही

Sd/ D. K. Kolatkar.

सिनिअर सब जज्ज साहेब कोर्ट आकोला.

नो० नं० ३३९

## नोटीस

नोटीस बेशभी ढाकू वा। रेऊबा धनगर रा. मुबारकपूर ता. मुर्तजापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा मयत भाऊ मारुती वल्लद दादा वाडकर रा. मुबारकपूर यानें तुमचे जवळ सन १९०९ सालीं रोख नगदी रुपये २०० दोनशे धरवर ठेवले. त्यानें परतानां तुह्माला गेलाऊन सदर्हु धरवर ठेविलेल्या रकमे बद्दल तुमची मजबरोबर रुजुवात केली तेंव्हा सदर्हु धरवर ठेवलेले रुपये तुह्मी कबूल केले. मारोती मेल्यानंतर तुह्मास रुपये मागितले असतां सन १९१३ सालीं दिवाळी नंतर तीन वेळ मिळून एकंदर ४० रुपये तुह्मी मला दिले. त्याबद्दल मी तुह्मास तीन अलग पावत्या दिल्या आहेत. सदर्हु धरवरीचे रुपयापैकीं हल्ली तुमच्याकडे १६० रुपये घेणें आहे. ते सन १९१३ सालचे नागादिवाळी पासून बरेच वेळ मागितले परंतु तुह्मी आज देतो उद्या देतो अशी चाळवा चाळवी करून ते रुपये दिले नाहींत या मुळें माझे दरमहा २ रु. प्रमाणें व्याजाचें नुकसान झालें. तरी ही नोटिस देऊन तुह्मास मुद्दाम कळवितो कीं ही नोटिस मिळेल तेंव्हां पासून ८ दिवसाचें आंत धरवरीचे रु. १६० सन १९१३ सालचे नागादिवाळी पासून दरमहा दरशेकडा २ रु. प्रमाणें नुकसानी दाखल व्याजासुद्धां आणून देऊन माझी पावती घेऊन जावी. असें तुह्मी न केल्यास तुमच्या पासून फिर्याद करून या नोटीसीचे खर्चासुद्धा व कोर्ट खर्चासुद्धा सर्व रक्कम वसूल केली जाईल. ही नोटीस दिली ता० २९-८-१९१६ इ. दस्तुर दामोदर देवमनसा गुलालकर पिटीशन रायटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला.

सही.

यशवंता वल्लद दादा वाडकर दस्तुर खुद.

नो० नं० ३४०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्द्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें हीं नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावीत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवस्तृित ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकरितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बनु येथें आहे.

नो नं २४२

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०१ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार नाबडतोब दूर होतात किं रु. १॥८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ४४ हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुले, बिल्वदळी टीका, मुद अम्रफुलें साखी व बाजूच्यांचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या माळोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निवण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १॥, १॥, २, २॥ ते ५ रु. प. बुद्धीबळ जोड लांकडी— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प सोंगट्या जोड— किंमत ।, ।॥, ।॥।, १, १॥, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान चाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्चाचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर


## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4 1/2 CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 |
| 1915 | 64738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager
Bombay.

or

A. C. Lal,
Branch Secratary
C. P. Berar & Khandesh
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख २५ माहे सप्टेंबर सन १९१६ ई० [ अंक ३८

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

ज्या अर्जदारांना पूर्वीचे कर्जरोखे बदलून नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा आपला हक्क चालविण्याची इच्छा नसेल त्यांस तो हक्क चालू बाजार भावानें पोष्ट आफिस मार्फत इतरांस विकतां येतो.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्जा ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.

मी ———————————— अक्षर वाचतां येई असें स्वच्छ लिहावें

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

———— 

एकूण रुपये.......

रोख रकम किती दिली, चेक किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें सलेल्या ठेवींतून काढून क रकम दिली असल्यास तो ती त्या रकमा त्याकारि रिकाम्या सोडलेल्या ना वेगवेगळ्या नमुद कराव्यात. मजकूर अनवश्यक असेल खोडून टाकावा.

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

(अ) किंवा (ब) ह्या दो तून एक पारिग्राफ भ दुसरा खोडून टाकावा

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अ देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————————

पत्ता ————————————

तारीख ————

पोस्ट आफिसांत दाखल — रजिस्टर नंबर ————

केल्याची तारीख ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची ) — ( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालावया

नो. नं. २४१ — हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## NOTICE

Applications are invited by the Army Department of the Government of India for posts of Urdu, Hindi and English interpreters for the censor staff in East Africa. the terms of service are--

(a) Pay Rs. 150 per mensem and free rations.

(b) free passages from their homes to East Africa and similar free return passages after not less than six months service in East Africa.

(c) advance of one month's pay if desired.

Applicants must be fit and willing to undertake field service. Applications should be made through the Deputy Commissioner of the District in which the applicant resides and in the case of persons in Government service through their superior Officer.

Sd/ F. S. A. Slocock.
Chief Secretary to
the Chief Commissioner.
Central Provinces.

Nagpur
18-9-1916.

N. N. 341

## नोटीस

रा. रा. (१) नथु वा शामाजी कोळी
(२) यशवंत जयकृष्ण पांडे
उभयतां राहणार पळसोद ता. आकोट

यांसः—

आह्मी खालीं सह्या करणार या नोटिशीनें कळवितो कीं, आमच्या वडिलाच्या मालकीचें शेत पळसोद येथील सर्व्हे नंबर २२ एकर गुंठे १४८२३ आकार रुपये ३३ वारसाच्या नात्यानें आमच्या मालकीचें आहे. बापाच्या हयातींतच हे पद्यानेंच दुसऱ्यास वहितीस दिलें होतें. पुढें बाप मयत झाल्यानंतर आमचा विभक्त व वेगळे असलेले चुलतभाऊ हिरामण व दीनाजी यांनीं आह्मास तें शेत वाहूं दिलें नाहीं आणि हक्क नोंदणींत उलटी आपलीच मालकी दाखवीत आहे ह्मणून दिवाणींत दावा घालून सर्व खर्च लावण्याच्या कबुलीवर तुह्मी उभयतांनीं आह्माकडून पट्टेखत पांच वर्षांचें लिहून घेतलें आहे. या ता. २३ जून १९१६ च्या पट्टेखतांत पोकळ भरणा पांचशे रुपयांचा दाखविला आहे पण खरा प्रकार असा कीं, ५ वर्षांच्या भोगवट्याच्या शर्तीवर तुह्मी आह्माला ही शेती दिवाणींत भांडून मिळवून देण्याच्या करारानें घेतली आहे. शेती दिवाणींतून मिळाली नाहींतर सर्व खर्च तुमचा डुबेल असें ही तुह्मी कबूल करून इतक्या भानगडी दाव्याच्या समर्थनासाठीं मुद्दाम पट्टेखतांत नोंदून घेतलेल्या नाहींत.

पट्टेखत होऊन आजपर्यंत ३ माहिने होत आले तरी तुह्मी दावा घातला नाहीं. इतकेंच नाहींतर उलट पक्षाला मिळून तुह्मी आमचा दावा मुदती बाहेर घालवूं पाहात आहां. ही नोटिस पोचल्यानंतर ८ दिवसाच्या आंत पट्टेखत रद्द केल्याचा उलट लेख लिहून नोंदून द्यावा. आणि तसें न केल्यामुळें किंवा या पूर्वींच योग्य मुदतींत दावा न झाल्यामुळें जी नुकसानी होईल ती तुह्मा उभयतांकडून या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतली जाईल. कळावें. ता. ११ सप्टेंबर १९१६ इसवी.

सह्या

१ जानकी मर्द हिरामण वाघाडे तेली नि. खुद

२ माणकी मर्द नरसाजी पाद्रे तेली नि. खुद

३ बनी मर्द ईष्णाजी वानखेडे तेली नि. खुद

तिघीही रा. येवदें ता. दर्यापूर

४ जनी मर्द बळीराम भालगे तेली राहणार कुंभारगांव ता. दर्यापूर नि खुद

नो० नं० ३४२

## नोटीस

नोटिस बेशमी गुणवंतराव सोनाजी देशमूख राहणार कजबे मनभा ता. मुर्तिजापूर जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुमचे जवळून पाउणशे रुपये ७५ कर्ज काढले होते. व त्याबद्दल तुह्मास मी दस्तैवज लिहून दिला होता. मी तुमचे शेत नि. पिंपरी शिवीचे सन १९१४ सालीं बटईनें केले होते. त्यांतील माझे निंमे हिश्याचे पीक कापूस मण ६ व जवारी मण ६ तुरी मण ५ कडबा पेंड्या ४५० व सन १९१५ साली तुमचें शेतें नि॥ पिंपरी शिवीचे व कलाली असे दोन्ही शेतें मी व खुशालगीर यानें बटाईनें वाहिले. त्यांतील निम्म पीक कापूस मण ५ तुरी मण ८२॥ व जवारी १ खंडी ४ मण कुटार २५ डाले येणें प्रमाणें माझे हिश्याचे पिक तुह्मी दस्ताऐवजाचे फेडीत घेतलें असून माझा दस्ताऐवज दिला नाहीं. तरी ही नोटीस पावल्या पासून आंठ दिवसाचे आंत माझा दस्ताऐवज काढून देणें व माझ्या दोन सालच्या पीकांच्या किंमतीचा हिशोब देऊन माझी निघत असलेली बचत परत द्यावी. असें न केल्यास तुह्मावर १५ दिवसांची मुदत झाल्यानंतर दिवाणींत व फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल कळावें ता० ११ सप्टेंबर सन १९१६ इ.

सही

भगवानपुरी गुरु शामपुरी गोसावी रा० मनभ ता० मुर्तिजापूर नि० खु०

नो. नं. ३४३


# विक्रीस तयार.

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस जाहीर करितो कीं, माझे मालकीचें घर दोन मजली शहरांत अगर वेसी जवळ रा. व्यंकटराव देसाई वकील यांचे घराजवळ आहे. तें घर विकावयाचे आहे. ज्यांना गरज असेल त्यांनीं खालील पत्यावर येऊन भेटावें.

पत्ता

सुभानखां व॥ उसमानखां राहणार आकोला अगर वेस

नो० नं० ३४४


## नोटीस

रा. रा. लालाजी गणपतराव (२) त्र्यंबकराव गुलाबराव (३) आनंदराव बापुराव (४) हिंमतराव गंगाराम सर्व देशमुख सर्व रा. तुदगांव ता. आकोट जि. अकोला

यांसः—

मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं, आमचे पक्षकार शेट गोविंदराम भीकमदास लखोटे मारवाडी हल्लीं राहणार कोथळी तालुका मलकापूर यांनीं तुह्मांस तारिख ५-६-१९१३ रोजीं मौजे वाकोडी प्र. अडगांव येथील स्थावर माल दरसाल रुपये १६१४ स्वामित्वानें पांच वर्षा करितां १३२७ फसली अखेर पावेतों वहितीस दिला तो स्थावर माल येणें प्रमाणें.

| स. नं. | ए. गुं. | शेतसारा | हिस्सा |
|---|---|---|---|
| ३९ | २९८३७ | ५८ | सालीम |
| ३६ | १९८३९ | ४१ | " |
| ३७ | ३६ | ७४ | यांतील पूर्वेकडील एक द्वितीयांश हिस्सा |
| ३८ पैकीं ८ | | १६८८ | सालीम |
| ४० पैकीं १-८१ | | १९८४ | सालीम |
| २९ पैकीं ११८३२ | | २१ | सालीम |
| २६ पैकीं ९८३२ | | १४ | " |

या वहिती संबंधानें तुह्मी आमचे पक्षकार सदर्हु गोविंदराम यांस पट्टेखत लिहून नोंदून दिलें होतें. या पट्याच्या व्यवहारांत गोविंदराम यानें आपला पांचवा हिस्सा ठेवण्याचा इरादा दर्शवून तह्मांसह पट्टेखत करून देण्याचे इराद्यानें त्या पट्टेखतावर रीणको ह्मणून सही देखील करून दिली होती. पण हें पट्टेखत झाल्यावर कांहीं दिवस गोविंदराम यानें तुह्मी बरोबर जमानीची किस्तकारी केली पण तुमची नियम त्यांचेवर सर्व खर्चाचा भार टाकण्याची दिसतांच त्यानें या वहितीतून आपलें आंग काढून घेतलें व तुह्मांसही ही गोष्ट मानवली व तुह्मी चौघे इसमच सदर्हू सालीम जमीन आजपर्यंत वहात आलां आहांत.

पहिल्यासालीं तुह्मांकडून रुपये ११०० स्वामित्वाच्या रकमेपैकीं आले व दुसरे सालीं रुपये ५२०८६८९ हा वसूल आला व या सालांत नगदी रुपये ४६७ हा वसूल आलेला आहे. या शिवाय जास्त वसूल तुह्मांकडून आमचे पक्षकारास मिळालेला नाहीं. शेतसारा तुह्मीं सन १९१५-१६ चा भरलासें दर्शवतां. पण त्याबद्दलची पावती तुह्मांकडून आलेली नाहीं. तरी आजपर्यंत हिशोबानें तुमचेकडे सदर्हू शेतसाऱ्याची रक्कम वसूल धरून मुदलापैकीं रुपये २५१३ निघतात व यावर व्याज दस्ताऐवजाप्रमाणें अदमास रुपये ६०० होतात. येवढी रक्कम तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे पत्यावर मानिऑर्डर करून पाठवावी. मनीआर्डरचा खर्च आह्मी देऊं नाहींतर नगदी आमचे पक्षकारास अथवा आह्मांस देऊन पावती घ्यावी. असें न केल्यास तुह्मापासून सदर्हु रक्कम व्याजासमेत कोर्ट मार्फत भरून घेऊं कळावे ता. १७-९-१६

सही

A. V. Khare
Pleader for
Govindram Lakhotya Kothali.

N. N. 345

## नोटीस

विश्वनाथ नागाप्पा तडकसे लिंगाईत वाणी दहीसात मठाजवळ उमरावती यांसः—

या नोटिशीद्वारें कळविण्यांत येते कीं, तुमचे मजजवळ कांहीं दागदागीने किंवा कपडालत्ता नाहीं. मला घरांतून घालवून देतेवेळीं तुह्मी माझे अंगावरील एक दोन जिनसा होत्या त्या काढून घेऊन घरांतून काढून दिले. लग्नास रुपये ५०० खर्च लागला नाहीं. व त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. तो मज जवळ मागण्याचा कोणताही हक्क नाहीं. माझे अन्नवस्त्राबद्दल तुह्मी अजून तजवीज केली नाहीं. जोपर्यंत तुमचा व माझा संबंध तुटला नाहीं तोंपर्यंत तुह्मास मला अन्न वस्त्र देणें भाग आहे. वं त्या प्रमाणें ह्या तारखेपासून दहा दिवसाचे आंत तुह्मी नोटिशीचें उत्तर न दिल्यास अथवा कोणतीही तजवीज न केल्यास हीच फारकत समजली जाईल. तारीख १७-९-१६ इ.

सही

पार्वती विश्वनाथ तडकसे निशाणी हातचा आंगठा असे

नो. नं. ३४६

## नोटीस

सिताबाई मर्द धणु खाटीक राहणार कारंजा तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

राघो वल्लद भुऱ्या खाटीक राहणार कामरगांव नोटीस देतो अशी कीं, तूं वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांत तारीख १५-८-१६ इसवी रोजीं नोटीस दिली ती पोंचली. नो. नं. ३२९

२ नोटिशींत लिहिलें आहे कीं आकुकच्छी राहणार कारंजा यांस भाड्यानें दुकान १०० शंभर रुपये भाडे १ सालाचे घेऊन १ एक वर्ष पर्यंत त्याच्या ताब्यांत दिलें आहे. त्या दुकानामध्यें बलु खाटीक याचा एक त्रितीयांशचा हिस्सा असून एक त्रितीयांशचा हिस्सा तुझा आहे असें लिहिलें आहे. हिश्याचे कारण वर लिहिलेले दुकान वडिलोपार्जीत आहे.

३ सदर्हू दुकान मी स्वतः विद्यमान डे. क. साहेब उमरावती यांचा हुकुम १२-५-१९०३ इसवी रोजीं सेक्रेटरी म्युनिसिपालीटी शहर कारंजा यांजकडून मिळविलें आहे. पहिली जागा पडीत होती मी स्वतः नवीन इमारत बांधली आहे. इमारत बांधण्याचे पूर्वींच तूं मजपासून वेगळी जाहली आहेस मग तूं ह्मणतेस कीं दुकान वडिलोपार्जीत आहे, हें ह्मणणें खोटें आहे.

४ दरसाल ३३८५८४ रुपये तुह्मी आह्माला मागत आहा हें मला देणें नाहीं व ६ वर्षाचे २०० दोनशे रुपये ही मी देत नाहीं. नोटिशीचा खर्च तुजपासून घेणें असून लोकांच्या सांगण्यावरून खोट्या नोटीसा देऊन कांहीं फायदा होत नाहीं. नोटीस दिली कळावें ता० १६-९-१६ इ.

दस्तुर गोविंदराव लक्ष्मणराव पाटणकर
राहणार कामरगांव
सही
राघो वल्लद भुराजी खाटीक
राहणार कामरगांव तालुका
मूर्तिजापूर जि० आकोला
याची निशाणी रेघ

नो. नं. ३४७

---

वऱ्हाडसमाचार

मित्ति भाद्रपद वद्य १३ शके १८३८

## शूर मर्द हिंदी शिपाई.

सांप्रतच्या युद्धांत हिंदी शिपायांनीं बजाविलेली कामगिरी कांहीं सामान्य नाहीं. या युद्धांत धारातीर्थी देह ठेवणाऱ्या शिपाई बहादुरांनीं हिंदुस्थानची अढळ राजनिष्ठा व शूरत्वाची कीर्ति यांचें पूर्ण समर्थन केलें आहे. कोठें युरोपखंड आणि कोठें हिंदुस्थान ! हवा पाणी, भाषा, पेहराव, परिस्थिति, सर्वच भिन्न असतां अशा भिन्न परिस्थितींत थंड हवेमुळें होणारे हाल सोसून हिंदी शिपायानें आपलें कर्तव्य पुरें पुरें बजाविलें. हिंदी शिपायांनींच नाहीं तर ट्रान्सपोर्ट मधले लोक, खेचरवाले, सहीस, भिस्ती, वगैरे हलक्या दर्जाच्या लोकांनीं ही आपापल्या परीनें राजनिष्ठेची व कर्तव्य परायणतेची कमाल केली. डॉ. हरनामसिंग व डा. अटोल या दोघा हिंदी डाक्तरांनीं मिलिटरी क्रॉम्स पदकें मिळवून लढतां लढतां स्वर्गलोकीं प्रयाण केलें. असंख्य शिपायांना खंदकांतून गुडघाभर पाण्यांत दिवसचे दिवस व रात्रीच्या रात्री काढाव्या लागल्या. पण त्याबद्दल कुरकुरीचें नांव नाहीं. इतकेंच नाहीं, तर अशा स्थितींत राहण्यानें अखेर यशःप्राप्ति होणें असेल तर ही आपत्ति आनंदानें आणखी सुद्धां कांहीं दिवस सोसण्यास ते तयार होतील! पूर्वी पाहिल्या कर्नाटक युद्धाचे वेळीं क्लाइव्ह साहेबाच्या हाताखालचे शिपाई नुसती भाताची पेज पिऊन लढाईला तयार होते अशी गोष्ट इतिहासांत आह्मीं वाचली आहे. त्याहून ही विचित्र आणि हिंदी शिपायांसंबंधानें अभिमानास्पद प्रसंग या युद्धांत अनेक घडून आले. एकदां शीख शिपायांना देण्याच्या चपात्या संपल्या. आतां काय करावें हा प्रश्न ब्रिटिश अधिकाऱ्यांना येऊन पडला. इंग्रज रोटीवाल्यांनीं तयार केलेली डबलरोटी ऊर्फ पाव धार्मिक हरकतीमुळें शीख शिपाई घेणार नाहींत, तेव्हां त्यांना ती देऊन त्यांचा मनें दुखवावीं हें अधिकाऱ्यांना बरें वाटेना. अशा अडचणींत अधिकारी सापडले आहेत हें शिपायांना कळलें तेव्हां रणक्षेत्रावर शत्रूला मारणें हा एक धर्म आपण ओळखतों, दुसरा तिसरा धर्म आपण ओळखत नाहीं असा बाणेदारपणाचा जबाब शीख शिपायांनीं देऊन वरिष्ठांना बिकट अडचणींतून मुक्त केलें. शीख गुरूंनीं ही या वेळीं राजनिष्ठा हाच मुख्य धर्म आणि तत्प्रीत्यर्थ आपद्धर्म ह्मणून हवें तें करण्यास शीख धर्माची आडकाठी नाहीं असें जाहिर केलें, तेव्हां शिपायांनीं डबलरोटीचा आनंदानें स्वीकार केला. जखमी झालेल्या शिपायांचे वाहक व खेचरवाले यांच्या वर्तनाबद्दल ही असेच प्रशंसापर उद्गार लष्करी अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं काढले आहेत. निकराचें युद्ध चाललें आहे, गोळ्यांचा वर्षाव होत आहे, अशा गर्दींत जखमी झालेल्यांना उचलून आणण्यासाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घालण्याचें हिंदी लोकांना कांहींच भय वाटत नाहीं. हे लोक अशा वेळीं जीव धोक्यांत न घालते तर कोणी ही त्यांना दूषण लाविलें नसतें अशी स्थिति होती. पण नाहीं कर्तव्य तें कर्तव्य. तें करतांना प्राणाची सुद्धां पर्वा न करण्याचें विलक्षण धाडस हिंदी लोकांनीं दाखविलें. एका खेचरवाल्याचें खेचर उधळून शत्रूच्या छावणींत शिरलें. त्याच्या मागोमाग जाऊन त्याला परत आणण्यासाठीं आपला जीव धोक्यांत घालण्याचें यत्किंचित् ही भय त्या खेचरवाल्याला वाटलें नाहीं. कारण, खेचर सरकारी आहे, आपण त्याचे रक्षक आहों, आणि आपल्या ताब्यांत असतां जर तें गेलें तर त्याबद्दलची जबाबदारी आपणावर आहे ही तीव्र जाणीव त्या यःकश्चित् क्षुद्र गणिल्या जाणाऱ्या खेचरवाल्याला सुद्धा होती! जेव्हां त्याचा हा गुण वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नजरेस आला व ते त्याला बक्षीस देऊं लागले तेव्हां तो ह्मणाला, 'महाराज, मी आपलें काम केलें, यापलीकडे कांहीं एक नाहीं. त्यांत चुकलों असेन तर कृपा करून माफी करा! अहाहा! किती ही नम्रता! ज्या हिंदी लोकांतल्या हलक्या दर्जाच्या वर्गांत अशा प्रकारचीं नररत्नें अजून निर्माण होत आहेत ते लोक उच्च प्रतीच्या व जबाबदारीच्या सरकारी नोकरीच्या जागांवर नेमले जाऊं नयेत, त्यांचे हातीं मोठाले अधिकार देण्याची भीती सरकारी अधिकाऱ्यांना वाटावी, आणि स्वतःच्या देशाच्या राज्यकारभारांत आपलें अंग असावें ह्मणून आज तीस वर्षें हक्कासाठीं कायदेशीर रीतीनें भांडतां भांडतां उगाच कोठें एखादा तुकडा त्यांचे तोंडावर टाकण्यांत यावा ही किती शोचनीय गोष्ट आहे!

---

## संयुक्त प्रांतांतली औद्योगिक प्रगति.

संयुक्त प्रांतांतील उद्योगधंद्यांच्या व कारखान्यांच्या प्रगतीसंबंधानें तेथील सरकारनें काढलेला ठराव अत्यंत बोधप्रद व वाचनीय आहे वनस्पतींपासून रंग काढण्याचे बाबतींत शोध सुरू आहेत. युद्धसंपल्यानंतर हा उद्योग कितपत किफायतशीर ठरेल तो पुढचा प्रश्न आहे. पण सध्या तरी कानपूर येथें रंगाचें काम शिकविण्यासाठीं काढलेली शाळा व खेडेगांवच्या रंगाऱ्यांना शिकविण्यासाठीं फिरते शिक्षक ठेवण्याची योजना फार उपयुक्त काम करीत आहे यांत शंका नाहीं. काचेच्या कामांतला तज्ञ युरोपियन नुकताच आला आहे व तपासणीचें काम चालू झालें आहे. कातडीं रंगविण्याच्या द्रव्याची तूट बाभळीच्या सालीच्या उपयोगानें तूर्त भरून काढण्यांत आली आहे. बायक्रोमेट ऑफ पोट्याश व एपसम क्षार हीं द्रव्यें व्यापारी प्रमाणावर कानपूर येथें तयार होऊं लागलीं आहेत. बरेलीच्या आगकाड्यांचे कारखान्याला सरकारनें लाकडाचे संबंधांत सवलती दिल्यापासून जपानी स्पर्धेपुढें या कारखान्याचा टिकाव लागला आहे. आतां फक्त रासायनिक द्रव्यांची महर्घता ही अडचण आहे. लखनौ आणि बरेली येथील औद्योगिक शाळांना मदततीस देण्यांत आले आहेत व या शाळांचा स्थानिक व्यापाऱ्यांशीं संबंध जोडण्यांत आला आहे. तेल गाळणें व सुगंधि तेलें तयार करणें यांकडेही लक्ष दिलें जात आहे. देशी मालाच्या बनावटींत सुधारणा करणें व देशी मालाला गिऱ्हाईक मिळवून देणें वगैरे कामसाठीं कानपूर येथें एक मध्यवर्ती संस्था उघडण्यांत आली आहे. सरकारी रिपोर्टांतली ही हकीकत निःसंशय मनोरंजक आहे, तथापि प्रत्यक्ष कार्य अद्यापपर्यंत फार थोडें झालें आहे व बरेंचसें होऊं घातलें आहे इतकाच त्यापासून निष्कर्ष काढतां येतो. हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याची वाढ व सुधारणा करण्याची अशी सोन्याची संधी आली असतां सरकारी अधिकारी व सुशिक्षित आणि भांडवलवाले यांनीं दिरंगाई न करतां याहून पुष्कळ अधिक कार्य करून दाखविण्यास हवें आहे. तथापि 'अकरणान्मंद करणं श्रेयः' या उक्तीप्रमाणें संयुक्त प्रांताचें सरकार जें कार्य करीत आहे त्याबद्दल आह्मी त्यांस धन्यवाद देतों, व याहून अधिक कार्य केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्याचा सुप्रसंग आह्मांस लवकर लाभो असें इच्छितों.

---

## साक्षीभत्ता कां दंड?

कोणत्याही कायद्याचा चांगूलपणा त्याचे अंम्मलबजावणीवर अवलंबून असतो. व जर एखादा कायदा किंवा कायद्यानुरोधानें केलेला नियम प्रजाजनास जाचक होऊं लागला तर तो नाहींसा करणें किंवा त्यांत दुरुस्ती करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. दिवाणी कोर्टाकडे न्याय मिळण्यास अतिशय दिरंगाई होते व लोकांना त्रास होतो सबब वऱ्हाड नागपूर प्रांतांतून न्याय खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून दिवाणी मुकदम्यांचे निकाल होतां होईल तों लवकर करण्यासंबंधानें खालील अधिकाऱ्यांस जे हुकूम करण्यांत येतात ते एका तऱ्हेनें स्तुत्य आहेत. परंतु या करितां वादी व प्रतिवादी या दोघांचे पुराव्या करितां एकच तारीख नेमली जावी असें जें एक सरक्युलर निघालें आहे त्यामध्यें खालच्या दर्जाच्या कोर्टांना इकडे तिकडे प्रसंगानुसार फरक करण्याची मुभा नसल्यामुळें ह्मणा किंवा अलीकडे या सरक्युलरचा जो अर्थ करण्यांत येतो त्यामुळें ह्मणा सरकारचे दरवाज्याशीं न्याय मिळविण्याकरितां आलेल्या प्रजाजनावर किती अन्याय होतो याची गोष्ट न्याय खात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कानावर कोणी घातली नाहीं असें दिसतें. थोडक्या खर्चांत, थोडक्या परिश्रमांत, व थोडक्या वेळांत प्रजाजनांना न्याय मिळावा असें ब्रिटिश न्याय देवतेचें ध्येय आहे. व या ध्येयाचे विरुद्ध एखाद्या नियमाची कशी अम्मलबजावणी होते हें कोणास पाहणें असल्यास त्यानीं दिवाणी मुकदमे हे वादी प्रतिवादीच्या दोघांच्या पुराव्याकारितां एकाच दिवशीं घेतले जातील हें सरक्यूलर व या सरक्यूलरच्या अंमलबजावणीकडे अवश्य पहावें. ज्या हेतूमुळें हें सरक्यूलर केलें आहे तो स्तुत्य आहे. परंतु या मध्यें ज्यावेळेस वादीचे १५।२० व प्रतिवादीचे ४०।५० असे साक्षिदार असतात, असला मुकदमा पुराव्या करितां आला व कोर्टानें या सरक्यूलर प्रमाणें वादीला व प्रतिवादीला दोघांनाही पुराव्या करितां एकाच दिवशीं आपले एकंदर ६०।७० साक्षीदार हजर ठेवण्यास सांगितले तर हे ६०।७० साक्षीदार एकाच दिवशीं तपासून मनुष्य प्राण्यास अशक्य अशी एखादी कसरत कोर्टानीं करून दाखवावी असाच या सरक्यूलरचा उद्देश आहे, असें एखाद्यास वाटल्यास त्यांत आश्चर्य आहे काय? आमच्यामतें प्रजाजनांना असला हुकूम करणें ह्मणजे केवळ अन्याय होय. न्याय मागण्यास आलेल्या इसमांना साक्षी भत्त्याच्या खर्चाच्या रूपानें न्याय मागण्यास येण्याचा भयंकर गुन्हा केल्याबद्दल त्यांस शिक्षा करणेंच होय. दिवाणी कोर्टाकडे ज्यावेळेस भानगडीचे मुकदमे असतात त्यावेळेस संबंध दिवसांत ४ किंवा ५ साक्षिदार संपवितां येत नाहींत असा अनुभव आहे. तर अशा वेळेस ६० ७० साक्षिदार हजर ठेवण्याचा कां हुकूम करण्यांत येतो? आमचे मतें सरक्यूलर करतांना ही गोष्ट मुळींच लक्षांत घेतलेली दिसत नाहीं. न्याय खात्याचे वरिष्ठ अधिकारी ना. मे. ड्रेक ब्रॉकमन साहेबांनीं या सरक्यूलरचा पुन्हा अवश्य विचार करून भानगडीचे जे मुकदमे आहेत त्यामध्यें कोर्टास जितक्या साक्षीदारांचा पुरावा एका तारखेस संपविणें शक्य वाटत असेल तितकेच साक्षिदार वादीचे अगर प्रतिवादीचे बोलवावेत व या गोष्टीकडे लक्ष देऊन आपआपले साक्षीदार निरनिराळ्या तारखास हजर ठेवावेत अशा तऱ्हेचा हुकूम खालील कोर्टानीं वादीस व प्रतिवादीस नेहमीं करीत जावा अशा तऱ्हेचा दुरुस्ती या सरक्यूलर मध्यें जरूर करावी अशी आमची त्यांस विनंति आहे.

---

## सार्वजनिक चारित्र्याची शुद्धता.

हिंदुस्थानच्या लोकांत सार्वजनिक चारित्र्याची शुद्धता विरळा दिसते, असा आक्षेप पुष्कळ वेळा केलेला आढळतो. हिंदुस्थान देश बोलून चालून अशिक्षित असल्यामुळें त्याचे ठायीं अशा आक्षेपाला जागा राहण्याचें आश्चर्य नाहीं. पण सुधारणेंत अग्रेसर

अशा कित्येक पाश्चात्य राष्ट्रांतून या संबंधांत जे विचित्र घोटाळ्याचे प्रकार पुढें आले आहेत ते पाहिलें ह्मणजे दिव्याखालीं अंधेर या ह्मणीची सत्यता पटते. फ्रान्समध्यें एका प्रेसिडेंटाचा मुलगा लोकांजवळून पैसे घेऊन त्यांना मोठाले किताब विकत देतांना आढळला. इंग्लंडमध्यें एखाद्या राजकीय पक्षाच्या फंडाला मोठी वर्गणी दिली कीं त्या पक्षाचे हातीं सत्ता आल्यावर त्या दानशूराला नाइटहुडचा किंवा ब्यारोनेटचा मान मिळावयाचा अशीं उदाहरणें घडलीं असल्याचें सांगतात. अमेरिकेंतली तऱ्हा कांहीं निराळीच आहे. तेथें पदव्या विकत मिळत नाहींत, पण सरकारी नोकऱ्यांची विक्री होते. प्रेसिडेंट विल्सन यांच्या कारकीर्दींत अशा प्रकारची विक्री चालत असल्याचें खुद्द सेनेटच्या एका मेंबरानें ( सेनेटर पेनरोज ) मोठ्यानें ओरडून सांगितलें. डिप्लोम्याटिक अथवा परराष्ट्रीय खात्यांत नेमले गेलेल्या २२ नवीन माणसांपैकीं एकालाही त्या कामाचा अनुभव नव्हता, पण त्यांनीं प्रेसिडेंटच्या फंडांत दोनशें पासून दहा हजार पौंडापर्यंत रकमा भरल्या व त्याबद्दलचा मोबदला ९० लक्ष पौंड उत्पन्नाच्या जागांच्या रूपानें त्यांना मिळाला ! रशियाला नेमिलेले वकील मि. क्रेन यांनीं १० हजार पौंड, तुर्कस्थानचे वकील मि. मार्गेन थॉ यांनीं ६ हजार, आस्ट्रियाचे वकील मि. पेनफील्ड यांनीं ४॥ हजार, या प्रमाणें युराग्वे, स्पेन, नेदरल्यांडस, वगैरे ठिकाणच्या वकिलांनींही फंडांत पैसे भरल्याचें मि. पेनरोज यांनीं उघडपणें सांगितलें. अशा रीतीनें आपल्या कृपेंतल्या लोकांना जागा देण्याची पद्धति सुरू झाल्यानें २० हजार लोकांचें नुकसान झालें आहे असें मि. पेनरोज यांचें ह्मणणें आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतून इतका अंधार खरोखर असेल तर त्या देशांत लोकमताचा जोर, स्वातंत्र्य, सच्चारित्र्य, स्वदेशाभिमान, नीतिमत्ता, सुधारणा वगैरे शब्दांचा जो घोष ऐकूं येतो, त्याचा अर्थ काय ?

## महायुद्धाची प्रगति.

### पश्चिम रणक्षेत्र.

गेल्या आठवड्यांत युद्धाचें विशेष चित्ताकर्षक स्वरूप ह्मणजे सॉम प्रदेशांत ब्रिटिश आणि फ्रेंच या दोघांनीं मिळून जर्मनीचा पुरविलेला पिच्छा हें होतें. इकडे ब्रिटिश गिलिमॉंट घेत आहेत. तर तिकडे त्याच वेळीं फ्रेंच कॉंब्लसपर्यंतचीं जर्मन ठाणीं एकामागून एक घेत आहेत. फ्रेंच पूर्वेकडून रेटीत आहेत, तर ब्रिटिश गिंची हस्तगत करीत आहेत. जर्मन शत्रू एक तडाखा खाऊन अंमळ वर डोकें उचलीत आहेत तोंच दुसरा अधिक जोराचा तडाखा ठेवलेलाच आहे. इंग्रजांचा तोफखानाच जर्मनांना भारी आहे असें नाहीं तर पायदळही तसेंच आहे हें सर डग्लस हेग यांनीं दिलेल्या वर्णनावरून स्पष्टपणें व्यक्त होत आहे. एक जर्मन ब्रिगेड आणि दोन इंग्रज बटालीयन ( पलटणी ) यांच्यामध्यें झालेल्या हातघाईच्या लढाईंत इंग्रजच अखेर यशस्वी झाले. जर्मन लोकांना यांत्रिक शक्तीच्या श्रेष्ठत्वाची मोठी घमेंड होती, पण आतां ती जिरलेली दिसते. नुकत्या झालेल्या सॉमच्या लढाईंत इंग्रजांनीं एका सशस्त्र ‘ केटरपिलर ’ नांवाच्या यानाचा उपयोग केला. हें यान कुलपी गोळ्यांनीं उध्वस्त झालेल्या किंवा जेथें खंदकांचें जाळें पसरलें आहे अशा प्रदेशांतही खुशाल संचार करूं शकतें. शत्रूनीं यांत्रिक तोफा कोठें कोठें कशा लावून ठेविल्या आहेत हें पाहण्याचें काम या यानाचें असतें. विमानांच्या उपयोगाचे संबंधांतही ब्रिटिशांनीं जर्मन शत्रूवर वर्चस्व मिळविलें आहे. जर्मन पायदळावर वारंवार केलेले हल्ले, व शत्रूच्या दारूगोळ्यांच्या कोठारांवर अचानक तुटून पडणें, अथवा शत्रूच्या विमानांचा नाश करणें या गोष्टी विमानकलेंतल्या इंग्रजांच्या श्रेष्ठत्वाशिवाय कधीं साध्य झाल्या नसत्या. फ्रेंचांनीं २१ व इंग्रजांनीं १९ जर्मन विमानांचा नाश केल्याची खबर या श्रेष्ठतेची साक्ष देण्यास पुरे आहे. सॉमच्या लढाईंत शत्रूचे १३००० लोक कैद करण्यांत आले अशी खबर आहे. यांत तथ्य किती असेल तें असो, पण येवढें खरें कीं अजिंक्य ह्मटल्या जाणाऱ्या ठाण्यांना सुद्धां इंग्रजांच्या हातांत जावें लागलें. सॉमच्या लढाईचें महत्त्व येवढ्यावरून दिसून येईल कीं त्यासाठीं एस्ने व व्हर्डुन येथून फौजा काढून जर्मनीला तिकडे न्याव्या लागल्या. आतां तिकडची जर्मन शत्रूची फळी फोडल्यापासून आस्ट्रियाला कुमक पाठविणें हिंडेनबर्गला अशक्यच होईल.

## इटालियन रणक्षेत्र.

इटालियन लोकांनीं अलीकडे ट्रेंटिनो प्रांतांत बरेच जय मिळवून आस्ट्रियाचे हल्ले परतविले व मॅांट कारिओल हें ८ हजार फूट उंचीचें ठिकाण हस्तगत केलें आहे. व इतर ही कांहीं ठिकाणीं त्यांना यशःप्राप्ति झाली आहे. तथापि जोंपर्यंत गॉरिझियाच्या पूर्वेकडील टेकड्यांवरून आस्ट्रियन लोकांना हाकललें नाहीं तोंपर्यंत ट्रिएस्टकडे पुढें पाऊल पडणें अशक्य आहे. इटालियन लोकांना चोहोंकडून अडचणी आहेत. असें असतां ही ते आस्ट्रियन लोकांना पुरे पडत आहेत. यां पासून दोस्त राष्ट्रांना कांहीं सामान्य साह्य होत आहे असें नाहीं.

## रशियन रणक्षेत्र.

हालिक्झ आतां रशियाच्या हातीं लागल्यासारखेंच आहे असें मागच्या आठवड्यांत वाटलें होतें, पण तें अद्याप रशियाच्या हातीं लागलें नाहीं. रशियानें माउंट कापुल या ठिकाणीं ९०० शत्रु कैद करून तें ठिकाण घेतलें आहे. वाटेल तें करून लेंबर्गचा बचाव केला पाहिजे असें जर्मनी व आस्ट्रिया, या दोघांनाही वाटत असलें पाहिजे. ह्मणून ते तिकडे कुमकेवर कुमक पाठवीत आहेत. अर्थात जनरल ब्रुसिलफ यांची प्रगति थोडीशी कुंठित झाली आहे. रुमानियांतल्या रेल्वेचा उपयोग करण्याची अमोल संधी मिळाल्यामुळें रशियाचा मोठाच फायदा झाला आहे. आणि लवकरच कांहीं तरी शुभवार्ता कानीं येईल असा रंग दिसत आहे. डोब्रुडजाकडे म्याकेनसनची प्रगति बंद होऊन शत्रूला सिलिस्ट्रियामधून हटावें लागलें अशी बातमी आली आहे घाईघाईनें कूच करून रुमानियन व रशियन यांना अचानक गांठावें असा म्याकेनसनचा बेत होता, पण सिलिस्ट्रिया सोडून यावें लागलें यावरून तेथें त्यानें चांगलाच मार खाल्ला असला पाहिजे.

## बाल्कन रणक्षेत्र.

सर्बियन लोक ब्रोडी नदीपर्यंत तर जाऊन पोचले. ते आतां आपल्या राज्याच्या हद्दींत गेले आहेत. ग्रीक हद्द ओलांडून जात असतां त्यांना किती आनंद व उत्साह वाटला असेल त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. स्ट्रमाच्या पलीकडेस ब्रिटिश व फ्रेंच मधून मधून जातात, पण ग्रीक लोकांनीं दुर्बलतेच्या भरांत बल्गेरियाच्या स्वाधीन केलेला प्रदेश स्वतः बळकावून बसावें अशी दोस्त राष्ट्रांची इच्छा दिसत नाहीं.

## तुर्कांची चळवळ.

कॉकेशसकडे रशियनांना पुढें येऊं द्यावयाचें नाहीं ह्मणून तुर्क लोकांचे यत्न सारखे सुरू आहेत; तरी रशियन त्यांना चेपीत नेतच आहेत. मुशच्या पश्चिमेस तुर्क लोकांना त्यांच्या खंदकांतून रशियानें हाकून लाविलें, व बाना हें ठिकाण घेतलें. तुर्क लोक यावर स्वस्थ बसणार नाहींत. लवकरच त्यांचा हल्ला येईल. तो कोणीकडून व किती जोराचा येतो तेवढें आतां पहावयाचें आहे.

## आमचे डोळे कधीं उघडणार?

स्वदेशी ब्यांकांचा दिवाळखोरपणा आतां युरोपियन व्यापाऱ्यांना थट्टेचा विषय होऊन बसला आहे. इंडियन स्पीसी ब्यांकेचा जो व्यवहार चव्हाट्यावर आला आहे त्यावरून पहातां आमचे लोकांनीं स्वतःला थट्टेला व उपहासाला काय, पण तिरस्काराला सुद्धां पात्र करून घेतलें आहे असें ह्मणतां येईल. पण येवढी ठेंच लागल्यावर तरी आमचे लोकांनीं शहाणे होऊं नये काय? ब्यांका बुडल्यापासून सरकारनें कांहीं कडक नियम ही केले आहेत. पण ते नियम तितक्या कडक रीतीनें पाळण्यांत आले तर कांहीं उपयोग होईल. बंगालमधील संयुक्त भांडवलाच्या कंपन्यांचे रजिस्ट्राराची अशी तक्रार आहे कीं कंपन्यांचे म्यानेजर सरकारकडे जे तक्ते वक्तशीर भरून पाठवावयास पाहिजेत ते वेळेवर पाठवीत नाहींत. कांहीं तरी सबबी सांगून मुदत मागतात. चार वर्षांपूर्वी स्वदेशी ब्यांकांचा जसा सुळसुळाट लुच्चे लोकांनीं करून सोडला होता, तसा हल्लीं बंगालप्रांतीं प्रॉव्हिडंट फंड व विम्याच्या कंपन्या यांचा झालेला आहे. गरीब बिचारे कारकून, दुकानदार किंवा मजूर आपल्या पश्चात् आपले कुटुंबाला दारोदार भिक्षा मागण्याची पाळी येऊं नये ह्मणून स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन प्राव्हिडंट फंडाचे प्रीमियम भरतात, आणि फंडाचे व्यवस्थापक व एजंट ते पैसे स्वाहा करून खुशाल ढेंकर देतात! बंगालच्या वर्तमानपत्रांतून अशा फंडाच्या व्यवस्थापकांवर कपटानें फसविल्याबद्दल फौजदारी खटले नेहमीं चालू असल्याबद्दल वाचण्यांत येतें. सारांश, व्हॉल्टेरनें जगाच्या इतिहासाबद्दल जें ह्मटलें आहे तें अशा लबाडीचा व्यवहार करणाऱ्या कंपन्यांना अक्षरशः लागू पडते. या कंपन्या ह्मणजे निर्ढावलेल्या फौजदारी गुन्हेगार होत.

## मध्यप्रांतांतले कारखानदार.

कलकत्त्याच्या ‘ कॅपिटल ’ पत्रांत ह्मटलें आहे कीं मध्यप्रांतांतले कारखानदार माहितीचीं पत्रकें सरकारकडे पाठविण्याचे कामीं कधीं वक्तशीर नसतात. कधीं कधीं तर ते म्याजिस्ट्रेटाच्या धाकाला ही जुमानीत नाहींत. यंदा कांहीं तरी सक्तीचे उपाय अंमलांत आणण्याचा सरकारचा विचार आहे. कारखानदाराचा वेडेपणा पद्धतशीर आहे हें बायका व मुलें यांना कामावर लावण्यासंबंधाच्या त्यांच्या बेकायदेशीर वर्तनावरून दिसतें. कारखान्यांचे इन्स्पेक्टर मि. पॉवेल यांनीं १९१५-१६ सालच्या रिपोर्टींत एक विलक्षण उदाहरण दिलें आहे. कायद्याचे विरुद्ध कारखानदार बायकाकडून काम घेत असतो, आणि आपलें कृत्य उघडकीला येऊं नये ह्मणून इन्स्पेक्टर येतो कीं काय याची टेहळणी करण्यासाठीं त्यानें प्रत्येक नाक्यावर माणसें ठेविलीं आहेत. एकदां या माणसाची नजर चुकवून ( वेषांतर करून ह्मणा किंवा कसे ही ह्मणा ) इन्स्पेक्टर साहेबांची स्वारी आंत जाऊन पोहोंचली. तों तेथें बेकायदेशीर रीतीनें कामास लाविलेल्या ३२ बाया त्यांना आढळल्या. त्या बाया जवळून जितकें काम घेतलें जाई त्या मानानें त्यांना मजूरी देण्यांत येत नसे. रीतीप्रमाणें खटला होऊन दंड झाला. कारखानदाराला त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं. सदर दंडामुळें आपल्या कारखान्याची बदनामी झाली आहे असें त्याला मुळींच वाटत नाहीं. तो दंड म्यानेजराला झाला, कारखान्याला नाहीं, असें ह्मणून तो आपली बेअब्रू झांकण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्या कायद्याचा भंग अशा रीतीनें सहज करतां येतो त्या कायद्याचा उपयोग काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

**आगस्ट १९१५ व आगस्ट १९१६**

या दोन तारखां दरम्यानच्या एका वर्षाच्या अवधींत युद्धाचें स्वरूप किती पालटलें आहे तें पुढील तुलनेवरून चांगलें ध्यानांत येईल—

**१९१५ मध्यें**

१ जर्मन रशियांत जोरानें घुसत होते.

२ आर्गानवर जर्मन लोक निष्फळ हल्ला करीत होते.

३ सार्वियावर हल्ला करण्याची शत्रूची तयारी होती, व त्यांना अटकाव करण्यास मित्र राष्ट्रें असमर्थ होते.

४ ग्यालीपोली मध्यें तुर्क लोक प्रबळ होते.

५ इटालियन लोकांची प्रगति.

६ जर्मन आरमार अखंडित होतें.

७ राशिया, फ्रान्स, व सर्विया या तिन्ही ठिकाणीं जर्मन आवेशानें लढत होते.

८ दारू गोळा व लष्कर यांची जर्मनांची जय्यत तयारी.

९ जर्मनांनीं हल्ले करावे व मित्रांनीं फक्त बचाव करावा अशी स्थिति होती.

१९१६ मध्यें

१ राशिया जर्मनीला मागें हटवूं लागला आहे.

२ फ्रेंच व ब्रिटिश जर्मनीवर हल्लें करून यशस्वी होत आहेत.

३ सालोनिकामध्यें मित्रराष्ट्रांचें जंगी सैन्य गोळा झालें आहे.

४ काकेशसमध्यें राशियनांच्या हातून आणि सुएझकडे ब्रिटिशांच्या हातून तुर्कांनीं मार खाल्ला आहे.

५ इटलीच्या रणक्षेत्रावर आस्ट्रियाच्या हल्ल्याला इटली तोंड देत आहे

६ जटलंडच्या दर्यांत जर्मनीच्या आरमाराचा फडशा पडून तें आरमार लपून बसलें आहे.

७ वर्डुनपाशीं जर्मनीचे हल्ले निष्फळ झाले आहेत.

८ जर्मनीची उमेद खचत आहे. तुर्क तह करण्याच्या विचारांत आहे व बल्गेरियाचा आवेश थंड पडला आहे

९ ब्रिटिश, फ्रेंच व राशियन यांचा तोफखाना जोरांत असून दारू गोळा वगैरे सामानाची विपुलता आहे.

१० जर्मन हार खात आहेत.

११ जर्मनी हल्ले न करतां आतां स्वतःचा बचाव करण्यांत गुंतला आहे.

---

## मुलांचे बैठे खेळ.

परदेशांतल्या प्रवासापासून आपल्या प्रजेचा फायदा करून देण्याचें कंकण जर कोणी संस्थानिकानें बांधिलें असेल तर तें बडोद्याच्या महाराजांनींच होय. शिक्षणाचे बाबतींत अमरिकेचा नमुना येथें उठवून देण्याचा त्यांचा कृतनिश्चय दिसतो. सेंट्रल लायब्ररी सारखें खातें त्यांनीं मोठा खर्च करून मुद्दाम उघडलें आहे. ही लायब्ररी म्हणजे इतर लायब्ऱ्यांप्रमाणें नुसता पुस्तकांचा संग्रह नसून एक नव्या तऱ्हेची शिक्षणसंस्थाच आहे. या संस्थेच्या द्वारें लहान मुलांना ज्ञानाची अभिरुचि लावण्यासाठीं नानातऱ्हेचे उपाय योजण्यांत येत आहेत. म्याजिक ल्यांटर्न, सिनेमा, वगैरे बालचित्तांचें आकर्षण करणारे उपाय आहेतच. पण यां शिवाय मुलांना नवीन तऱ्हेचे बैठे खेळ ही येथें शिकावण्यांत येतात. ज्यांची उपयुक्तता शिक्षणाचे दृष्टीनें विशेष आहे असेच खेळ येथें ठेविले असून ते कसे खेळावे म्हणजे त्यापासून काय लाभ होईल हें दाखविणारें एक लहानसें पुस्तकही सेंट्रल लायब्ररीचे उत्साही वरिष्ठ अधिकारी रा. जनार्दन सखाराम कुडाळकर एम ए. यांनीं मराठींत नुकतें प्रसिद्ध केलें आहे. उत्तर ध्रुवाची शर्यत, राज्यारोहण, ब्रिटिश साम्राज्य आणि वसाहतींशीं व्यापार अशीं कित्येक खेळांचीं नांवें आहेत. हे खेळ खेळतां खेळतां प्रचलित राजकारण, समाजसुधारणा वगैरे प्रश्नांचें ही सोपपात्तिक ज्ञान व्हावें अशी या खेळाची योजना दिसते. अशा शिक्षणालाच खरें राष्ट्रीय शिक्षण हें नांव शोभतें. असें शिक्षण देणाऱ्या श्री. गायकवाड सरकारास धन्यवाद द्यावे तेवढे थोडे आहेत. सद्विद्यार्थी संघाचे प्रेसिडेंट रा. चॅपमन साहेब हे मोठ्या उत्सुकतेनें वरील गोष्टी आपल्या वऱ्हाडांत प्रचलीत करितील असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

---

## मद्यपाननिषेधार्थ यत्न.

मध्यप्रांत आणि वऱ्हाड येथील अबकारी खात्याच्या १९१४-१५ सालच्या रिपोर्टांत सदर प्रांतांत मद्यपाननिषेधार्थ झालेल्या प्रयत्नांचीं नोंद आहे ती अशी- मद्याचा खप कमी व्हावा अशी लोकांची इच्छा आहे हें सुचिन्ह आहे, पण त्यांच्या प्रयत्नाला विशेषसें यश आलेलें नाहीं. नागपूर जिल्ह्यांत मानभाव लोक व धापेवाडा येथील कोलबाचे शिष्य हे मद्याला शिवत नाहींत. पण यांची संख्या सगळी ४०० आहे उमरेड तहशिलींत बेला येथें एका संन्याशानें मद्यपान निषेधावर व्याख्यानें देऊन ५० लोक आपल्या बाजूला वळविले. भंडारा येथील कांहीं उच्च दर्जाच्या व सुशिक्षित लोकांनीं मद्यपानाला आळा घालण्याचा यत्न केला. कोसरे कलार व तेली या जातींनीं दारू पिणारास बहिष्कार घातला. चिचगडचे जमीनदार आपल्या जातींत मद्यपान बंद करण्याचे खटपटांत आहेत. चांदा जिल्ह्यांतल्या पुष्कळ माळ्यांनीं दारूचें व्यसन सोडलें आहे, व जे पितात त्यांचे पासून दंड घेण्यांत येतो. हा दंड सामान्य नाहीं. त्यानें एक मिशी व दाढी उतरावी. भांडीं कुंडीं फेंकून द्यावी, व भद्रजलि दोन रुपये दंड द्यावा असें ठरलें आहे. बालाघाट जिल्ह्यांत मद्यपाननिषेधाची चळवळ तेल्यांपासून सुरू झाली व ती अद्याप चालली आहे. कित्येक गोंड लोक लग्नाच्या उत्सवांत दारूच्या ऐवजीं गुळाचा उपयोग करूं लागले आहेत. छिंदवाडा येथील तेल्यांनीं दारू सोडली. तिच्याबद्दल ते मिठाई व गूळ खातात. उमरावती येथें गुलाबदास नांवाचा रजपूत साधु महारांना दारू पिणें सोडून द्या असा उपदेश करीत असतो व त्याच्या प्रयत्नाला यश आलें आहे. आकोल्याच्या प्रमुख मुसलमानांनीं मद्यपाननिषेधाची चळवळ हातीं घेतली आहे, पण अद्याप त्यांना निश्चित यश प्राप्त झालें नाहीं. या शिवाय मधून मधून असे मद्यपाननिषेधाचे प्रयत्न जागोजाग होत आले; त्यांच्या योगानें येवढें झालें कीं दारू पिऊन झिंगणें हें वाईट आहे, दारू सोडली पाहिजे असें पुष्कळांना आतां कळूं लागलें आहे.

सरकारी रिपोर्टांत मद्यपाननिषेधार्थ होत असलेल्या चळवळी विषयीं इतका आस्थापूर्वक आणि सहानुभूति पूर्वक केलला उल्लेख या पूर्वीं कोणाच्याही पाहण्यांत क्वचित्‌च आला असेल. आमचे प्रांताधिपति मद्यपाननिषेधाचे पूर्ण साह्यकर्ते व रयतेचे हितचिंतक मित्र असल्यामुळें त्यांच्या वृत्तीचा परिणाम सर्व अधिकाऱ्यांवर थोडा बहुत झालेला दिसणें अपरिहार्य होतें, व तो झाला हें पाहून आह्मांस फार फार संतोष वाटतो हें येथें सांगितलें पाहिजे.

---

## स्वराज्य संघ.

गेल्या १४ व्या तारखेला मद्रास येथें या संस्थेचा सांवत्सरिक पुण्यदिन ह्मणून महोत्सव करण्यांत आला. क्रमाक्रमानें अनुभव असे सांगूं लागला आहे कीं राष्ट्रीय सभेचे विचार कर्तृत्ववान नाहींत. तेव्हां वस्तुस्थितीच्या ज्ञानाचा उपयोग करून कांग्रेसचे कर्णधार आतां **स्वराज्यवादी बनत** चालले आहेत. स्वराज्य हा शब्द विद्यमान कालाचा मुख्य गंगौघ आहे. स्वराज्याच्या माहिम्यानें सर्व इंडियन राष्ट्राची कार्यगती बदलण्यांत येणार आहे. **श्रीमान चक्रवर्ती** जार्ज बादशहा यांची साम्राज्यशक्ती आह्मां इंडियनांमध्यें पूर्णपणें प्रतिबिंबभावानें उदयास आणावयाचा हा सर्व प्रयत्न आहे. आह्मी स्वराज्यवादी ह्मणजे ब्रिटिश साम्राज्याच्या सूर्यप्रकाशामध्यें आह्मी राजसत्ता प्रत्यक्षपणें चालवूं पहात आहों. हल्लीं विलायतचे विचार आह्मांला मागेंपुढें ढकलतात आणि इंडियाचा राज्यकारभार चालतो. हीच स्थिती पालटून त्याऐवजीं इंडियन विचाराचे आह्मीं राज्य चालवूं इच्छित आहों. व्हॉइसरायपासून सर्व इंग्लिश अधिकारी इंडियांत राज्यकर्ते ह्मणून हल्लीं नांदतात, त्यांच्या ऐवजीं हिंदी राज्याचे त्यांना नम्र सेवक बनवावयाचे आहे. इंग्लिश व इंडियन यांचे सम्राट् शक्तीनें जें एकोन्मीलन होत चाललें आहे तें आह्मास बहुगुणित करावयाचें आहे. पाश्चिमेकडील राज्यकारभाराचें वळण लावण्याला जशीं विलायतचीं अधिकारी मंडळें इकडे येतात, तद्वत्‌ आह्मीं स्वराज्यवादी हिंदी लोक आमचें पौर्वात्य वळण व कल्याण दृष्टी हीं विलायतच्या राज्य कारभाराला सुसंस्कार देण्यासाठीं मुद्दाम तिकडे धाडूं इच्छितों. विलायतचे सुसंस्कार आह्मास अवश्य पाहिजे आहेत, पण ते आमच्या स्वराज्याच्या अनुपानानेंच आह्मी ग्रहण करूं. ब्रिटिश प्रजा या संज्ञेखालीं जी राजशक्ती आह्मामध्यें विकास व्हावयाला पाहिजे तीच आमच्या स्वराज्याची कामधेनू होय. आपल्या हिंदी कल्याण दृष्टीनें सर्व इंडियन राज्य कारभाराला परिचालन देणें हाच स्वराज्यसंघाचा मुख्य काय भाग आहे. जशी हिंदुस्थानांत मोठमोठीं संस्थानें आहेत त्याच पद्धतीवर सर्व ब्रिटिश इंडियाचें आह्मांस एक मोठें देशी संस्थान बनवावयाचें आहे. आणि असें हें देशी संस्थान बनविण्याकरितांच कांग्रेसच्या विचारछत्राखालीं हा स्वराज्यसंघाचा प्रयत्न अहर्निश वाढत्या प्रमाणावर चालू आहे. या स्वराज्याच्या विचारक्रांतीनें आमचे नामदार चीफ कमिशनर खरे पहिले पगारी स्वयंसेवक होतील अशी आह्मांस मोठी आशा आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— पश्चिमेपेक्षां पूर्व समुद्रावर वादळ होत असल्यामुळें आमच्या प्रांतांत मेघांची इतकी गर्द छाया पडली आहे कीं सर्व नील आकाशमंडप कृष्णवर्ण बनला आहे. कदाचित्‌ हा आगंतूक पर्जन्य लोकांच्या व पीकांच्या आरोग्यासाठीं न येईल तर मोठीच कृपा होय.

प्लेग— मुंडगांव, दहिहंडा, चांगलवाडी जामठी बुजरुक, चिखलदरा, असतपूर उंदरी, चयगांव. अंजनी बुजरुक, शिलोडी व पळशी हीं गांवें वऱ्हाडांत प्लेगदूषित आहेत.

पांच नवे डिपटी इन्स्पेक्टर स्थानिक विद्याखात्याला देण्यांत आल्यामुळें त्या फेरफारांत रा. रा. जनार्दन रामचंद्र जहागीरदार यांना ब्रह्मपुरीहून बदलून उमरावती जिल्ह्याला नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. बाळकृष्ण विष्णू भागवत असि. शिक्षक हायस्कूल यवतमाळ यांस ६० रुपयांवर बुलढाण्यास डिपाटि इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें.

रा. रा. अब्दुल अजीमखां यांस एलिचपूर इंग्लिश उर्दू शाळेवरून बुलढाण्याला हिंदुस्थानी डिपाटि इन्स्पेक्टरच्या बढतीवर पाठविण्यांत आलें आहे.

श्री शीलनाथ प्रासादिक सं. नाटक मंडळी आपले नीतिवर्धक खेळ येथें करीत असते. या कंपनीचे मुख्य चालक राजश्री नेवाळकर हे प्रस्तुतच्या नाटकाचें निवळ विनोदपर रूप बदलून त्यांना चांगली निराळी दिशा देत आहेत हें त्यांस भूषणावह होय. यांचे खेळ आबालवृद्धांनीं पहाण्याइतके बोधपर व कर्मणुकीचे असतात.

**इंडियन बहादुर सर्कस**—चे खेळही लोकाभिरुचीला विशेष आवडते असून तींतील माणसांच्या कांहीं कसरती विद्याखात्याला घेण्यासारख्या आहेत.

---

## नोटीस

सक्सेशन नंबर १५ सन १९१६

विद्यमान सब जज्ज सा. कोर्ट खामगांव

मयत बापुजी रामचंद्र डांगे स्टॅंपव्हेंडर रा. शेगांव ता. खामगांव याचे जिनगीचे वारसाचे सर्टिफिकीटासंबंधी अर्ज.

अर्जदार

धोंडो रामचंद्र बंदिष्टे सबरजिष्ट्रर रा. शेगांव ता. खामगांव

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें सक्सेशन सार्टीफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत ता. ७-९ १६ रोजीं केला आहे. त्याची चौकशीची ता. १८-११-१६ नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानीं वरील तारखेस सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावे. तसें न केल्यास पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं.

आज ता. २१ माहे सप्टेंबर सन १९१६ इ. रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिलें.

R. N. Trivedi
Sub Judge
Khamgaon

नो. नं. ३४८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटींशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

-:❀:❀:❀:-

## ब्राम्हण लोकांकरितां

—:*:0:*:0:*:—

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालूं असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आर्वस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पल्टण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बनु येथें आहे.

नो नं २४२

---


## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लॅबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशीजोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुद अग्रफुलें साखळी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान धाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी


## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---


# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid $4\frac{1}{2}$ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63,407 |
| 1915 | 64738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPE[illegible] FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted. Terms Liberal***

:0

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay. or *A. C. Lal,* Branch Secretary, *C. P. Berar & Khandesh* Nagpur.

N. N. 22


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.